राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.

तक्रार क्र.२०१०/५३४/०२

श्री.एस.आनंदनटराज
बी-७०६, राजेश्री अपार्टमेंट,
महावीर नगर, कांदीवली (प),
मुंबई ४०० ०६७. **.... तक्रारदार**

विरूध्द

जन माहिती अधिकारी तथा उप मुख्य अभियंता (इमारत प्रस्ताव)
व कार्यकारी अभियंता (इ.प्र) डब्ल्यू.एस.आर. विभाग,
म्युनिसिपल गार्डन इमारत,
सी-विंग, दुसरा मजला,
९० डि.पी.रोड, संस्कृती कॉम्प्लेक्स जवळ,
ठाकूर कॉम्प्लेक्स, मुंबई १०१. **.... उत्तरवादी**

विवेचन

तक्रारदार श्री.एस.आनंदनटराज यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयेागाकडे दि.२५.०२.२००९ रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.०२.०२.२०१० रोजी सुनावणी आयेाजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता तक्रारदार हजर नव्हते. गैरतक्रारदार हजर होते. सुनावणीचेवेळी गैरतक्रारदार यांचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच तक्रारीवरील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे दि.२४.१०.२००८ रोजी अर्ज करून अंतीम मंजूर नकाशा व अंतीम मंजूर अहवालाची छायाप्रत टी.डी.आर. करारपत्र आणि भोगवटा प्रमाणपत्राची छायाप्रत इत्यादी अनुषंगीक माहिती मागीतली होती. तक्रारदाराने मागणी केलेल्या माहिती संबंधीची कागदपत्र फार जुनी आहेत. शोध घेउनही संबंधीत फाईल सापडत नाही. यामुळे तक्रारदारास मागणी केलेली माहिती पुरविता येत नाही असे गैरतक्रारदाराने ०१.१०.२००८ च्या पत्रान्वये तक्रारदारास कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने तक्रारदाराने प्रथम अपील दाखल

केले. तक्रारदाराने मागणी केलेल्या माहिती संबंधीचा पुन्हा कसून शोध घ्यावा. तक्रारदारास माहिती पुरवावी. फाईल शोध घेउनही सापडली नाही तर तसे तक्रारदारास कळवावे अशा गैरतक्रारदारास दि.०८.१०.२००८ च्या पत्रान्वये प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सूचना दिल्या. त्यानंतरही माहिती पुरविण्यात आली नसल्याने तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे तक्रार दाखल केली. तक्रारीवरील सुनावणीकरिता गैरतक्रारदार तथा सहाय्यक निबंधक (इमारत प्रस्ताव) आर विभाग श्री.डी.आर.लबडे हे हजर होते. तक्रारदाराने मागीतलेल्या माहिती संबंधीची फाईल कार्यालय स्थलांतरित कालावधीत इतर कागदपत्रात मिसळून गेली होती. सदर संबंधीत इमारतीशी संबंधीत धारीणी महतप्रयासाने तपास केल्यावर सापडली आहे. तक्रारदारास आवश्यक असलेल्या दस्ताऐवजाच्या प्रती संबंधीत धारीणीत सापडताच विनामुल्य त्वरीत उपलब्ध करून देण्यात येतील असा गैरतक्रारदाराने आयोगास लेखी अहवाल सादर करून प्रतिपादन केले. या परिस्थितीत सदर प्रकरणी मी असे आदेश देतो की, गैरतक्रारदाराने हे आदेश प्राप्त झाल्यापासून न चुकता तक्रारदारास १५ दिवसाचे आत माहिती पुरवावी.

<u>आदेश</u>

तक्रार मान्य करण्यांत येत आहे.

मुंबई
दिनांक १५.०२.२०१०

(रामानंद तिवारी)
राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई

राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.

तक्रार क्र.२०१०/५३५/०२

श्री.पी.पी.तलाठी
अदरबाद, प्लॅट क्र.४३,
३४, एन.एस. पाटकर मार्ग,
मुंबई ४०० ००७. **.... तक्रारदार**

विरूध्द

जन माहिती अधिकारी तथा उप निबंधक सहकारी संस्था,
पी-वार्ड, मुंबई, ३१५/३१६, ए-१ इमारत,
वडाळा ट्रक टर्मिनल, मुंबई ४०० ०३७. **.... उत्तरवादी**

विवेचन

तक्रारदार श्री.पी.पी.तलाठी यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयेागाकडे दि.१३.०४.२००९ रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.०२.०२.२०१० रोजी सुनावणी आयेाजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता तक्रारदार व गैरतक्रारदार हजर होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच तक्रारीवरील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे दि.३१.१०.२००८ रोजी अर्ज करून, अदरबाद सहकारी गृहनिर्माण संस्थेने, नोंदणीकरीता सादर केलेल्या अर्जाची प्रत. अदरबाद सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या byelows ची मुळ प्रत इत्यादी अनुषंगीक माहिती मागीतली होती. माहितीपोटी शुल्क रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया, मुंबई येथे भरणा करून कार्यालयाकडून माहिती प्राप्त करून घ्यावी असे गैरतक्रारदाराने तक्रारदारास दि.०६.११.२००८ च्या पत्रान्वये कळविले. किती शुल्काचा भरणा करावा याबाबत रक्कम कळविली नसल्याच्या कारणावरून तक्रारदाराने प्रथम अपील दाखल केले. उपनिबंधक डी विभाग यांनी तक्रारदारास किती पैसे भरणा करावयाचे आहे हे कळविले नाही. एकूण माहिती किती पाने आहेत. त्याप्रमाणे एकूण रूपये किती भरावे हे

गैरतक्रारदाराने तक्रारदारास कळविले नाही. माहितीचा खर्च तक्रारदारास कळविणे आवश्यक आहे. त्यामुळे सदर प्रकरणी तक्रारदाराने मागणी केलेली माहिती तक्रारदारास मोफत द्यावी असे प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी दि.१०.१२.२००८ रोजी आदेश पारित केले. त्यानंतरही गैरतक्रारदार तथा उपनिबंधक, सहाकारी संस्था ड विभाग यांनी तक्रारदारास माहिती पुरविली नाही. यामुळे व्यथीत होउन तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे तक्रार दाखल केली.

गैरतक्रारदाराच्या प्रतिनिधीने तक्रारीवरील सुनावणीचेवेळी प्रतिपादन केले की, तक्रारदारास मागणीप्रमाणे माहिती पुरविण्यात आली आहे. माहिती प्राप्त झाली असल्याने तक्रार मागे घेण्यास तक्रारदाराने आयोगास विनंतीकरून परवानगी मागीतली. तक्रार मागे घेण्यास तक्रारदाराने आयेागास केलेली विनंती मान्य करण्यात येत आहे. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

<u>आदेश</u>

तक्रार निकाली काढण्यांत येत आहे.

मुंबई
दिनांक १५.०२.२०१०

(रामानंद तिवारी)
राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई

राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.

तक्रार क्र.२०१०/५३९/०२

श्री.सिराजुद्दीन उस्मान शेख
श्री.गणेश कृपा सोसा,
२०२, ए विंग, कदम हॉल, मुब्रा,
ठाणे. **.... तक्रारदार**

विरूध्द

जन माहिती अधिकारी तथा आस्थापना अधिकारी
मुंबई बोर्ड, म्हाडा, गृहनिर्माण भवन (म्हाडा),
४ था मजला, बांद्रा (पू), मुंबई ४०० ०५१. **.... उत्तरवादी**

विवेचन

तक्रारदार श्री.सिराजुद्दीन उस्मान शेख यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयोगाकडे दि.०२.०५.२००९ रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.०२.०२.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीचेवेळी तक्रारीवरील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे अर्ज करून, आवश्यकती माहिती मागीतलेली नाही. तक्रारदाराच्या नावाचा समावेश परिशिष्ट-II मध्ये करण्यात आला नसल्याच्या कारणावरून तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे थेट तक्रार दाखल केली आहे. माहितीच्या अधिकारानुसार प्रथम तक्रारदाराने गैरतक्रारदाराकडे अर्ज करून तक्रारदारास हवी असलेली माहिती मागीतली पाहिजे. कोणत्याही संदर्भाशिवाय उक्त अधिनियमातील कलम १८ खाली राज्य माहिती आयोगाकडे तक्रारदारास तक्रार दाखल करता येणार नाही. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

आदेश

तक्रार निकाली काढण्यांत येत आहे.

मुंबई **(रामानंद तिवारी)**
दिनांक १५.०२.२०१० **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.

तक्रार क्र.२०१०/५७२/०२

श्री.व्ही.के.राजभार
१२४/ए, परेरा हाउस कंम्पाउंड,
पाली नाका, डॉ.अंबेडकर रोड,
बांद्रा (प), मुंबई ४०० ०५०. **.... तक्रारदार**

विरूध्द

जन माहिती अधिकारी तथा सहा.आयुक्त (इ व का)
बृहन्मुंबई महानगरपालिका,
एच/वेस्ट वार्ड, बांद्रा (प),
मुंबई ४०० ०५०. **.... उत्तरवादी**

विवेचन

तक्रारदार श्री.व्ही.के.राजभार यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयेागाकडे दि.१७.११.२००९ रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.०४.०२.२०१० रोजी सुनावणी आयेाजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता तक्रारदार हजर नव्हते. गैरतक्रारदार हजर होते. सुनावणीचेवेळी गैरतक्रारदार यांचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच तक्रारीवरील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे दि.२७.०२.२००९ रोजी अर्ज करून, प्लॉट क्र.१२४ (सी.टी.सर्व्हे क्र.सी-८८७/८८८) यावर कोणते आरक्षण आहे काय? कोणत्या आरक्षन झोन मध्ये आहे काय? याबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. तक्रारदाराने मागणी केलेली माहिती देण्याचे गैरतक्रारदाराने नाकारले. तक्रारदाराने मागणी केलेली माहिती कार्यालयात उपलब्ध नसल्याच्या कारणावरून नाकारली. कार्यालयात गैरतक्रारदाराकडे माहिती उपलब्ध नसल्याच्या केवळ एवढया कारणास्तव माहिती अपीलकारास नाकारता येत नाही. म्हणून Development Plan (DP) कडून माहिती गोळा करून अपीलकारास माहिती पुरवावी असे व्दितीय अपील

क्र.२००९/३२२८/०२ मध्ये आयेागाने आदेश पारित केले होते. त्यानंतर वारंवार माहिती प्राप्त करून घेण्याकरिता गैरतक्रारदाराकडे कार्यालयात गेले असता गैरतक्रारदाराने माहिती पुरविण्यास टाळाटाळ केली. या कारणावरून तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे तक्रार दाखल केली.

तक्रारीवरील सुनावणीकरिता तक्रारदार अनुपस्थित होते. गैरतक्रारदार हजर होते. तक्रारदारास मागणीप्रमाणे दि.०८.१२.२००९ च्या पत्रान्वये अर्जातील मुध्दा क्र.१ ते ४ व आणि ९ बाबत माहिती पुरविली. डॉ.आबेडकर रस्त्याच्या रूंदीकरणाण्यतिरिक्त बांद्रा (प) परेरा हाउस पाली नाका येथील सी.टी.सर्व्हे क्र.सी. ८८७-सी-८८८ हया मालमत्तेवर कोणत्याही सार्वजनिक कारणास्तव आरक्षण नाही इत्यादी अनुषंगीक माहिती तक्रारदारास कळविण्यात आली असल्याचे गैरतक्रारदाराने आयेागासमोर प्रतिपादन केले. गैरतक्रारदाराने दि.०८.१२.२००९ च्या पत्राची छायाप्रत आयोगास सादर केली. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

<u>आदेश</u>

तक्रार निकाली काढण्यांत येत आहे.

मुंबई
दिनांक ११.०२.२०१०

(रामानंद तिवारी)
राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई

राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.

तक्रार क्र.२०१०/५४९/०२

श्री.सरोजकुमार तिवारी
रूम नं.१०६, इमारत बी-१,
गावदेवी वसाहत, गोरेगांव (प),
मुंबई ४०० ०९०. **.... तक्रारदार**

विरूध्द

जन माहिती अधिकारी,
बृहन्मुंबई महानगरपालिका,
पी/दक्षिण विभाग,
मिठानगर, महानगरपालिका शालेय इमारत,
मिठानगर, गोरेगांव (प),
मुंबई ४०० ०६२. **.... उत्तरवादी**

विवेचन

तक्रारदार श्री.सरोजकुमार तिवारी यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयेागाकडे दि.०६.१०.२००९ रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.०३.०२.२०१० रोजी सुनावणी आयेाजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता तक्रारदार तसेच गैरतक्रारदार हजर होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच तक्रारीवरील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे दि.२४.०३.२००६ रोजी अर्ज करून, गावदेवी कॉलनी येथील पात्र झोपडपट्टीधारकांची, झोपडपट्टी सुधार प्राधिकरण यांचेकडे सादर केलेल्या प्रस्तावाची प्रत तसेच श्री.विजयकुमार जयस्वाल यांना पर्यायी सदनिका देणेबाबत पात्रतेसाठी त्यांनी सादर केलेल्या कागदपत्राच्या प्रतीची मागणी केली होती. तक्रारदारास अपूर्ण माहिती मिळाली असल्याच्या कारणावरून तक्रारदाराने राज्य माहिती आयेागाकडे क्रक.२००८/१०५७/०२ हे व्दितीय अपील दाखल केले होते. तक्रारदारास संबंधीत फाईल

तपासणीकरिता प्रथम उपलब्ध करून द्यावी. त्यानंतर उपलब्ध कागदपत्राच्या प्रती तक्रारदारास पुरवाव्यात असे दि.२०.१०.२००८ रोजी आयेागाने आदेश पारित केले होते. त्यानंतर माहिती मिळाली नसल्याच्या कारणावरून तक्रादाराने राज्य माहिती आयोगाकडे दि.०६.१०.२००९ रोजी तक्रार दाखल केली.

तक्रारीवरील सुनावणीचेवेळी गैरतक्रादाराने प्रतिपादन केले की, आयोगाच्या दि.२०.१०.२००८ च्या आदेशानुसार तक्रारदारास संबंधीत फाईल निरीक्षणासाठी उपलब्ध करून दिली. त्यानंतर तक्रारदाराच्या मागणीनुसार निवडक कागदपत्राच्या छायाप्रती तक्रारदारास पुरविण्यात आल्या. यावरून सदर प्रकरणी राज्य माहिती आयोगाच्या दि.२०.१०.२००८ च्या आदेशाचे गैरतक्रादाराने पालन केले आहे. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

आदेश

तक्रार निकाली काढण्यांत येत आहे.

मुंबई
दिनांक ११.०२.२०१०

(रामानंद तिवारी)
राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई

राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.

तक्रार क्र.२०१०/५२९/०२

श्री.गुलाम मो.अब्दुल अजिज बनानी
तबेला नं.८११/१/२ कलेक्टर चाळ,
यू.पी.रेस्टोरेटच्या मागे, चिरागनगर,
घाटकोपर (प), मुंबई ४०० ०८६. **.... तक्रारदार**

विरूध्द

जन माहिती अधिकारी तथा उप जिल्हाधिकारी
(निवडणूक कार्यालय शाखा), मुंबई उपनगर जिल्हा,
प्रशासकीय इमारत, ९ वा मजला, शासकीय वसाहत,
बांद्रा (पू), मुंबई ४०० ०५१.

जन माहिती अधिकारी तथा उप जिल्हाधिकारी आणि निवडणूक निर्णय अधिकारी
विधान सभा, घाटकोपर (प), मुंबई. **.... उत्तरवादी**

विवेचन

तक्रारदार श्री.गुलाम मो.अब्दुल अजिज बनानी यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयेागाकडे तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.०१.०२.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता तक्रारदार तसेच गैरतक्रारदार हजर होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच तक्रारीवरील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे दि.०९.०३.२००९ रोजी अर्ज करून, सन १९९९ आणि २००४ या वर्षीच्या निवडणूकीमध्ये श्री.अरीफ नसीम खान यांनी स्वत:ची संपत्ती किती जाहीर केली होती. निवडणूकीचा अर्ज भरला त्याची प्रत, श्री.खान यांचे शिक्षण किती याबाबत माहिती मागीतली होती. गैरतक्रारदाराने, तक्रारदारास संकेतस्थळाचा पता देउन संकेतस्थळावरून माहिती प्राप्त करून घ्यावी असे कळविले होते. तक्रारदारास माहिती मिळाली

नसल्याने राज्य माहिती आयेागाकडे क्र.२००९/३३५९/०२ हे व्दितीय अपील तक्रारदाराने दाखल केलेम होते. सदर प्रकरणी तक्रारदारास १५ दिवसाचे आत माहिती पुरवावी असे आयेागाने दि.२६.१०.२००९ रोजी आदेश पारित केले होते. त्यानंतरही गैरतक्रादाराने तक्रारदारास माहिती पुरविली नाही. यामुळे तकारदाराने व्यथीत होउन राज्य माहिती आयेागाकडे तक्रार दाखल केली.

१६९ घाटकोपर (प) विधानसभा मतदार संघ, निवडणूक निर्णय अधिकारी यांचेकडे सन १९९९ चे निवडणूकीचे अभिलेख्र आहेत. अभिलेख्र कक्षात दुबार पाहणी केली असता स्पष्ट झाले असा गैरतक्रारदार तथा सहा.निवडणूक अधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा श्री.अ.वि.कदम यांनी आयोगास लेख्री अहवाल सादर करून प्रतिपादन केले. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, उप जिल्हाधिकारी आणि निवडणूक निर्णय अधिकारी, विधानसभा, १६९, घाटकोपर (प) यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत तक्रारदारास आवश्यकती माहिती पुरवावी.

<u>आदेश</u>

तक्रार मान्य करण्यांत येत आहे.

मुंबई
दिनांक १५.०२.२०१०

(रामानंद तिवारी)
राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई

राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.

तक्रार क्र.२०१०/५३६/०२

श्री.प्रकाश सी.शेठ
११०३- सुल्सा अपार्टमेंट,
२५४-राईग रोड, मुंबई ४०० ००६. **.... तक्रारदार**

विरुध्द

जन माहिती अधिकारी तथा सचिव,
बार कौन्सील ऑफ महाराष्ट्र ॲण्ड गोवा,
मुंबई उच्च न्यायालय, मुंबई. **.... उत्तरवादी**

विवेचन

तक्रारदार श्री.प्रकाश शेठ यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयेागाकडे दि.१३.११.२००८ रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.०२.०२.२०१० रोजी सुनावणी आयेाजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता तक्रारदार हजर नव्हते. गैरतक्रारदार हजर होते. सुनावणीचेवेळी गैरतक्रारदार यांचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच तक्रारीवरील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे दि.२५.०९.२००८ रोजी अर्ज करून, १) ॲड.श्री.आर.पी.सिंग आणि एमडीएन अहमद यांनी बार कौन्सील ऑफ महाराष्ट्र ॲण्ड गोवा यांच्याकडे नोंदविलेला नोंदणी क्रमांक, त्यांचा पत्रव्यवहाराचा पत्ता व इतर सविस्तर माहिती मागीतली होती. २) ॲडव्हेकिट स्टँम्प पेपर स्वत:चे नावे खरेदी करून नंतर इतर व्यक्तींना स्टँम्प पेपरची विक्री करण्याची त्यांना परवानगी आहे काय? इत्यादी माहिती मागीतली होती. ॲड.एमडीएम अहमद आणि आर.पी.सिंग यांचे पूर्ण नाव, पत्ता आणि इतर सविस्तर तपशिल पुरविल्या शिवाय माहिती उपलब्ध करून देता येत नाही. संबंधीत ॲडव्होकेटचे पूर्ण नाव दिल्यानंतर तक्रारदारास माहिती पुरविता येईल असे गैरतक्रारदाराने दि.१५.१०.२००८ च्या पत्रान्वये तक्रारदारास कळविले.

गैरतक्रारदाराने तक्रारदारास माहिती पुरविली नाही. आवश्यक माहिती प्राप्त करून घेण्याकरिता प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे अपीलकरण्याची तक्रारदारास एक संधी होती. पंरतू तसे न करता तक्रारदाराने राज्य माहिती आयेागाकडे थेट उक्त अधिनियमातील कलम १८ अन्वये तक्रार दाखल केली.

बार कौन्सील ऑफ महाराष्ट्राकडे हजारोच्या संख्येनी ॲडव्होकेटनी नोंदणी केली आहे. तक्रारदाराने मागणी केलेली माहिती देण्याकरिता संबंधीत ॲडव्होकेटचे संपूर्ण नाव पत्ता इत्यादी तपशिल तक्रारदाराने पुरविल्यास तक्रारदारास आवश्यकती माहिती उपलब्ध करून देणे सोइचे होईल असा गैरतक्रारदाराने लेखी अहवाल आयेागास सादर केला. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, तक्रारदाराने मागणी केलेली माहिती पूर्णत: लोकहितास्तव मागीतलेली दिसून येते. तरी कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती गैरतक्रारदाराने तक्रारदारास पुरवावी.

<u>आदेश</u>

तक्रार निकाली काढण्यांत येत आहे.

मुंबई
दिनांक १५.०२.२०१०

(रामानंद तिवारी)
राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई

राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.

तक्रार क्र.२०१०/५२८/०२

श्री. किशोर मेहता
ज्योती लिटील होम,
फ्लॅट नं.३ व ४, पहिला मजला,
प्लॉट न.३०५, तिसरा मोगल लेन,
महिम, मुंबई ४०० ०१६. **.... तक्रारदार**

विरूध्द

जन माहिती अधिकारी तथा निबंधक
सहकारी संस्था,
फोर्ट, मुंबई ४०० ००१. **.... उत्तरवादी**

विवेचन

तक्रारदार श्री.किशोर मेहता यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयेागाकडे दि.२१.०४.२००९ रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.०१.०२.२०१० रोजी सुनावणी आयेाजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता तक्रारदार हजर नव्हते. गैरतक्रारदार हजर होते. सुनावणीचेवेळी गैरतक्रारदार यांचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच तक्रारीवरील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे दि.२५.०९.२००८ रोजी तक्रार करून, १) एम-२० बंधपत्र रद्द करण्याबाबत २) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियमातील कलम ७३ (१एबी) ची अमंलबजावणी ३) संस्थेच्या बँक खात्याबाबत ४) देयकाची रक्कम भरल्यानंतर संस्था पावती देत नाही इत्यादी अनुषंगीक बाबी संबंधी तक्रार केली होती. सदर तक्रारीवर केलेल्या कारवाईची माहिती मागीतली होती. गैरतक्रारदाराने विहित कालावधीत माहिती पुरविली नाही. यामुळे व्यथीत होउन तक्रारदाराने राज्य माहिती आयेागाकडे तक्रार दाखल केली.

गैरतक्रारदाराने सदर प्रकरणी तक्रारदारास माहिती पुरविली नाही. गैरतक्रारदाराची सदर कृती निश्चितच योग्य नाही. राज्यात माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची काटेकोरपणे अमंलबजावणी करणे आवश्यक आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, गैरतक्रारदाराने हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत तक्रारदारास कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती पुरवावी.

आदेश

तक्रार मान्य करण्यांत येत आहे.

मुंबई
दिनांक १५.०२.२०१०

(रामानंद तिवारी)
राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई

राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.

तक्रार क्र.२०१०/५३०/०२

श्री. झेड.एच.सय्यद
ए-३०४, किल्लेदार सोसा,
इमारत क्र.३, १६५-१७२, एस.व्ही.रोड,
एम.टी.एन.एल. विरुध्द,
जोगेश्वरी (प), मुंबई ४०० १०२. **.... तक्रारदार**

विरुध्द

जन माहिती अधिकारी,
सह निबंधक यांचे कार्यालय,
सहकारी गृहनिर्माण संस्था,
मल्होत्रा हाउस, ६ वा मजला,
जी.पी.ओ समोर, मुंबई ४०० ००१. **.... उत्तरवादी**

विवेचन

तक्रारदार श्री.झेड.एच.सय्यद यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयोगाकडे दि.२७.०८.२००९ रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.०१.०२.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता तक्रारदार तसेच गैरतक्रारदार हजर होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच तक्रारीवरील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे दि.०८.०७.२००९ रोजी तक्रार करून, विकासकाने शासनाच्या आदेशाचे उल्लघंन केले असल्याचे विक्रीखताबाबत असलेल्या त्रुटी आणि विकासकाविरुध्द दंडात्मक कारवाई करण्याबाबत मागणी केली होती. गैरतक्रारदाराने सदर प्रकरणी विहित कालावधीत कारवाई करून माहिती पुरविली नसल्याच्या कारणावरून तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे तक्रार दाखल केली.

सदर प्रकरणी Matter सह निबंधक, सहकारी गृहनिर्माण संस्था यांच्या न्यायालयात निर्णयाकरिता प्रलंबित असल्याचे गैरतक्रारदार तथा विभागीय सहाय्यक निबंधक श्री.संदीप आमने यांनी तक्रारीवरील सुनावणीचेवेळी आयेागासमोर प्रतिपादन केले. यावरून सदर प्रकरण महाराष्ट्र सहकारी संस्था कायद्यांतर्गत न्यायप्रविष्ठ आहे. प्रकरण न्यायप्रविष्ठ असल्याने तक्रारदारास माहिती देण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

आदेश

तक्रार निकाली काढण्यांत येत आहे.

मुंबई
दिनांक १५.०२.२०१०

(रामानंद तिवारी)
राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई

राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.

तक्रार क्र.२०१०/५१६/०२

डॉ.एन.शेखर
डेस्टुप टेकनोलॉजि डिपार्टमेट,
युनिवरसिटी इंन्टीटयूट ऑफ केमिकल टेकनोलॉजि,
माटुंगा, मुंबई ४०० ०१९. **.... तक्रारदार**

विरूध्द

जन माहिती अधिकारी तथा सहा.निबंधक
युनिवरसिटी इंन्टीटयूट ऑफ केमिकल टेकनोलॉजि,
माटुंगा, मुंबई ४०० ०१९. **.... उत्तरवादी**

विवेचन

तक्रारदार डॉ.एन.शेखर यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयेागाकडे दि.१९.०१.२००९ रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.०१.०२.२०१० रोजी सुनावणी आयेाजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता तक्रारदार हजर होते. गैरतक्रारदार हजर नव्हते. सुनावणीचेवेळी तक्रारदार यांचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच तक्रारीवरील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे दि.०६.१२.२००८ रोजी अर्ज करून, तेली समितीने बोर्ड ऑफ गव्हर्नरला सादर केलेल्या अहवालाच्या प्रतीची मागणी केली होती. तेली समितीने सादर केलेला अहवाल कार्यालयात उपलब्ध नाही. तेली समितीने सादर केलेला अहवाल बोर्ड ऑफ गव्हर्नरच्या विचाराधीन आहे. सदर अहवाल प्रसिध्द झाल्याशिवाय त्याची प्रत तक्रारदारास उपलब्ध करून देता येत नाही असे गैरतक्रारदाराने दि.०६.०१.२००९ च्या पत्रान्वये तक्रारदारास कळविले. यामुळे व्यथीत होउन तक्रारदाराने राज्य माहिती आयेागाकडे उक्त अधिनियमातील कलम १८ अनुसार तक्रार दाखल केली.

सदर तक्रारीवरील सुनावणीचेवेळी तक्रारदाराने आयेागास लेखी अर्ज सादर करून, दि.१९.०१.२००९ ची तक्रार मागे घेण्यास परवानगी मागीतली. तसेच सदर प्रकरण बंद करण्याबाबत आयोगास विनंती केली. सदर प्रकरण बंद करण्याबाबत तक्रारदाराने आयेागास केलेली लेखी विनंती विचारात घेउन याप्रकरणी मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

<u>आदेश</u>

तक्रार निकाली काढण्यांत येत आहे.

मुंबई
दिनांक १५.०२.२०१०

(रामानंद तिवारी)
राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई

राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.

तक्रार क्र.२०१०/५५०/०२

श्री.आर.पी.यजुर्वेदी
३०२/ए, नव आसावरी को.ऑ.हो.सोसा,
१८२, जे.पी.नगर, अंधेरी (पू),
मुंबई ४०० ०५९. **.... तक्रारदार**

विरूध्द

जन माहिती अधिकारी,
मुख्य अभियंता रस्ते यांचे कार्यालय,
मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण,
बांद्रा-कुर्ला संकुल, बांद्रा (पू), मुंबई ४०० ०५१. **.... उत्तरवादी**

विवेचन

तक्रारदार श्री.आर.पी.यजुर्वेदी यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयोगाकडे दि.१७.०२.२००९ रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.०३.०२.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता तक्रारदार हजर नव्हते. गैरतक्रारदार हजर होते. सुनावणीचेवेळी गैरतक्रारदार यांचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच तक्रारीवरील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे दि.०७.०४.२००८ रोजी अर्ज करून, पश्चिम उपनगरात साकी विहार पवई रोड, सहार रोड, ए.के.रोड खणून टी.टी.एम.एल. चे केबल टाकण्यास एम.एम.आर.डी.ए. ने परवानगी दिली असल्याबाबतची एकूण ६ मुद्यावर अनुषंगीक माहिती मागीतली होती. गैरतक्रारदाराने विहित कालावधीत तक्रारदारास माहिती पुरविली नाही. यामुळे व्यथीत होउन तक्रारदाराने आयोगाकडे क्र.२००८/१४५७/०२ हे व्दितीय अपील दाखल केले होते. अपीलकारास १५ दिवसात गैरतक्रारदारांनी माहिती पुरवावी असे राज्य माहिती आयोगाने

दि.३१.१२.२००८ रोजी आदेश पारित केले होते. त्यानंतरही तक्रारदारास माहिती प्राप्त झाली नसल्याच्या कारणावरून राज्य माहिती आयोगाकडे दि.१७.०२.२००९ रोजी तक्रार दाखल केली.

तक्रारदारास मागणीप्रमाणे माहिती पुरविण्यात आली असल्याचे गैरतक्रारदाराने आयोगास लेखी अहवाल सादर करून प्रतिपादन केले. यावरून असे दिसून येते की, गैरतक्रारदाराने, तक्रारदारास माहिती पुरविली आहे. परंतू विलंबाने माहिती पुरविली असल्याचे दिसते. याबाबत गैरतक्रारदाराने सुनावणीचेवेळी खुलासा केला की, राज्य माहिती आयोगाचे दि.३१.१२.२००८ चे आदेश गैरतक्रारदारास दि.३१.०१.२००९ रोजी प्राप्त झाले. सदर प्रकरणी तक्रारदारास माहिती पुरविण्यात आली असल्याने या प्रकरणी मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

आदेश

तक्रार निकाली काढण्यांत येत आहे.

मुंबई
दिनांक १५.०२.२०१०

(रामानंद तिवारी)
राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई

राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.

तक्रार क्र.२०१०/५४७/०२

श्री.सुर्यकांत बंडू सुणगार
१६/१३६८, डॉ.ढवले हॉस्पीटल मागे,
इचलकरंजी. ता.हातकणंगले,
जि.कोल्हापूर. **.... तक्रारदार**

विरूध्द

जन माहिती अधिकारी,
सामान्य प्रशासन विभाग (सेवा)
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२. **.... उत्तरवादी**

विवेचन

तक्रारदार श्री.सुर्यकांत सुणगार यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयेागाकडे दि.२१.०१.२०१० रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.०३.०२.२०१० रोजी सुनावणी आयेाजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता तक्रारदार हजर नव्हते. गैरतक्रारदार हजर होते. सुनावणीचेवेळी गैरतक्रारदार यांचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच तक्रारीवरील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे दि.१९.०९.२००९ रोजी अर्ज करून, १) शासनाने निवृत्त कर्मचारी / अधिकारी यांना सेवानिवृत्तनंतर दिलेली मुदतवाढ रद्द करणे कामी अथवा मुदतवाढ न देणे कामी माजी आमदार जगन्नाथ ढोणे यांनी उच्च न्यायालयात दाखल केलेल्या याचिकेची शासनास प्राप्त झालेली साक्षांकित प्रत मिळाली. २) सदर याचिकेवर मा.उच्च न्यायालय यांनी दिलेल्या निर्णयाची शासनास प्राप्त झालेल्या आदेशाची प्रत. तदनंतर शासनाने उच्च न्यायालयात दाखल केलेली कैफीत प्रत, त्यानंतर उच्च न्यायालयात यांनी दिलेल्या आदेशाची शासनास प्राप्त झालेली आदेशाची साक्षांकित प्रत.

गैरतक्रारदाराने मागणीप्रमाणे माहिती पुरविली नसल्याच्या कारणावरून तक्रारदाराने माहितीच्या अधिकारातील तरतुदीनुसार प्रथम अपील दाखल न करता राज्य माहिती आयोगाकडे तक्रार दाखल केली.

प्रस्तुत प्रकरणी तक्रारदार दि.२२.०१.२०१० रोजी मंत्रालयात गैरतक्रारदारास प्रत्यक्ष भेटले असता हवी असलेली माहिती गैरतक्रारदाराने तक्रारदारास पुरविली. यास्तव सदर तक्रार अर्जाची सुनावणी करणे आवश्यक नाही. सदरची सुनावणी रद्द करावी असे तक्रारदाराने आयेागास लेखी पत्र दिले. गैरतक्रारदाराने आयेागास लेखी अहवाल सादर करून तक्रारदारास माहिती पुरविली असल्याचे प्रतिपादन केले. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

आदेश

तक्रार निकाली काढण्यांत येत आहे.

मुंबई
दिनांक १५.०२.२०१०

(रामानंद तिवारी)
राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई

राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.

तक्रार क्र.२०१०/५८५/०२

श्री.सय्यद अल्ली
मोईल विला, सी.एस.टी.नं.८५३,
फ्लॅट नं.३०१, हॉल रोड,
कुर्ला (प), मुंबई ४०० ०७०. **.... तक्रारदार**

विरूध्द

जन माहिती अधिकारी,
धर्मादाय आयुक्त कार्यालय,
वरळी, म्युनिसिपल विभाग,
मुंबई ४०० ०१८. **.... उत्तरवादी**

विवेचन

तक्रारदार श्री.सय्यद अल्ली यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयोगाकडे दि.२३.१२.२००९ रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.०५.०२.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता तक्रारदार तसेच गैरतक्रारदार हजर होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच तक्रारीवरील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे अर्ज करून, हाजी अब्दूल रहीम सदरीयावाला ट्रस्ट पीटीआर क्र.बी.३६९ (बी) बाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. गैरतक्रारदाराने सदर प्रकरणी तक्रारदारास विहित कालावधीत मागणीप्रमाणे माहिती पुरविली नसल्याने आयेागाकडे क्र.२००९/१३२९/०२ हे व्दितीय अपील दाखल केले होते. सदर प्रकरणी तक्रारदारास ३० दिवसाचे आत माहिती पुरवावी असे दि.२७.०२.२००९ रोजी आयेागाने आदेश पारित केले होते. त्यानंतरही गैरतक्रारदाराने माहिती पुरविली नाही. यामुळे व्यथीत होउन तक्रारदाराने राज्य माहिती आयेागाकडे तक्रार दाखल केली.

तक्रारदाराने मागणी केलेल्या माहिती संबंधीची कागदपत्र गैरतक्रारदाराकडे कार्यालयात उपलब्ध नाहीत. सर्व संबंधीत कागदपत्र वक्फ बोर्डाकडे हस्तांतरित केली आहेत. हस्तांतरणासंबधीची नोंद गैरतक्रारदाराने आयेागास दाखवून प्रतिपादन केले. त्या नोंदीसंबंधीची प्रत तक्रारदारास देण्यात आली. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

<u>आदेश</u>

तक्रार निकाली काढण्यांत येत आहे.

मुंबई
दिनांक १५.०२.२०१०

(रामानंद तिवारी)
राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई

राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.

तक्रार क्र.२०१०/५८३/०२

श्रीमती.तारूलता डी.शहा
शॉप नं.१०, तळ मजला,
शक्ती प्रोडयुक्ट, मार्केट मंजिल,
एम.जी.रोड, लोनावळा (पू),
मुंबई ४१० ४०१. **.... तक्रारदार**

विरूध्द

जन माहिती अधिकारी तथा मुख्य अभियंता
एम.बी.आर.आर.बी, दुसरा मजला,
रूम नं.३७२, गृहनिर्माण भवन,
कलानगर, बांद्रा (पू), मुंबई ४०० ०५१. **.... उत्तरवादी**

विवेचन

तक्रारदार श्रीमती. तारूलता शहा यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयेागाकडे दि.२८.१२.२००९ रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.०५.०२.२०१० रोजी सुनावणी आयेाजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता तक्रारदार हजर होते. गैरतक्रारदार हजर नव्हते. सुनावणीचेवेळी तक्रारदार यांचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच तक्रारीवरील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे दि.११.०८.२००८ रोजी अर्ज करून, कामाठीपुरा मुंबई येथील ११ व्या गल्लीतील पुनर्रविकसित इमारत क्र.१२ मधील व्यापारी गाळे वाटपाबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. गैरतक्रारदाराने माहिती पुरविली नसल्याने तक्रारदाराने राज्य माहिती आयेागाकडे क्र.२००९/१८८६/०२ हे व्दितीय अपील दाखल केले होते. तक्रारदारास सदर प्रकरणी १५ दिवसाचे आत माहिती पुरवावी असे आयेागाने दि.१२.०२.२००९ रोजी आदेश पारित केले होते. १० महितन्याहून अधिक कालावधी उलटून गेला तरी गैरतक्रारदाराने

माहिती पुरविली नसल्याच्या कारणावरून तक्रारदाराने राज्य माहिती आयेागाकडे तक्रार दाखल केली.

गैरतक्रारदाराने सदर प्रकरणी तक्रारदारास मागीतलेली माहिती पुरविण्यात यावी असे राज्य माहिती आयेागाने दि.१२.०२.२००९ रोजी आदेश पारित केले. सदर प्रकरणी आयेागाच्या आदेशाचे गैरतक्रारदाराने पालन केलेले नाही. याकरिता गैरतक्रारदारास जबाबदार धरून त्यांच्या विरूध्द माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम २० अनुसार शास्ती लादण्याची कारवाई का? सुरू करू नये याबाबत गैरतक्रारदाराने हे आदेश प्राप्त झाल्यापासून ४ आठवडयाचे आत आयेागाकडे प्रत्यक्ष भेटून लेखी खुलासा सादर करावा.

आदेश

तक्रार मान्य करण्यांत येत आहे.

मुंबई
दिनांक १५.०२.२०१०

(रामानंद तिवारी)
राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई

राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.

तक्रार क्र.२०१०/५८२/०२

श्री.चंद्रकात अमृतलाल मर्चंट
राणे बिल्डींग, डॉ.ई.मोझेस रोड,
वरळी, मुंबई ४०० ०१८. **.... तक्रारदार**

विरुध्द

जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता
रेसिडेंन्ट कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,
मुंबई इमारत, दुरुस्ती व पुनर्वसन प्राधिकरण,
रुम नं.४०८, तिसरा मजला, गृहनिर्माण भवन,
बांद्रा (पू), मुंबई ४०० ०५१. **.... उत्तरवादी**

विवेचन

तक्रारदार श्री.चंद्रकांत मर्चंट यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयेागाकडे दि.०४.०१.२०१० रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.०५.०२.२०१० रोजी सुनावणी आयेाजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता तक्रारदार तसेच गैरतक्रारदार हजर होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच तक्रारीवरील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे दि.०५.०३.२००९ रोजी अर्ज करून, वरळी लोअर परेल विभागामधील सी.टी.सर्व्हे क्र.११२/११३ प्लॉट क्र.१५३ वरळी मुंबई १८ येथील खैबर प्रॉपर्टीच्या प्रस्तावामध्ये गडगंज लक्षणीय भ्रष्टाचार झाला आहे. त्यासंबंधी दि.१६.०१.२००९ रोजी केलेल्या तक्रारीवरील कारवाईची माहिती मागीतली होती. गैरतक्रारदाराने पुरविलेल्या माहितीने समाधान झाले नसल्याने तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे क्र.२००९/३२४२/०२ हे व्दितीय अपील दाखल केले होते. सदर प्रकरणी अपीलकारास ३० दिवसाचे आत माहिती पुरविली असे

आयोगाने दि.२९.०९.२००९ रोजी आदेश पारित केले होते. त्यानंतरही तक्रारदारास माहिती पुरविण्यात आली नसल्याने तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे तक्रार दाखल केली.

दक्षता पथकाकडून सदर प्रकरणी चौकशी अहवाल प्राप्त झालेला नाही. त्यामुळे तक्रारदारास माहिती पुरविता आली नसल्याचे गैरतक्रारदारानी आयोगासमोर प्रतिपादन केले. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, सदर प्रकरणी दक्षता पथकाकडून चौकशी अहवाल प्राप्त झाल्यानंतर गैरतक्रारदारांनी, तक्रारदारास माहिती पुरवावी.

आदेश

तक्रार निकाली काढण्यांत येत आहे.

मुंबई
दिनांक १५.०२.२०१०

(रामानंद तिवारी)
राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई

राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.

तक्रार क्र.२०१०/५८१/०२

श्री.के.डी.गावंड
लेकच्चरल इन टेकस्टाईल विभाग,
व्ही.जे.टी.आय, माटुंगा, मुंबई ४०० ०१९. .... तक्रारदार

विरुध्द

जन माहिती अधिकारी,
व्ही.जे.टी.आय,
माटुंगा, मुंबई ४०० ०१९. .... उत्तरवादी

विवेचन

तक्रारदार श्री.के.डी.गावंड यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयेागाकडे दि.३०.०९.२००९ रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.०५.०२.२०१० रोजी सुनावणी आयेाजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता तक्रारदार तसेच गैरतक्रारदार हजर होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच तक्रारीवरील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे दि.३०.१०.२००७ रोजी अर्ज करून, विरमाता जिजाबाई टेक्नॉलॉजिकल इन्स्टिटयूट, माटुंगा या संस्थेच्या स्वायत मंडळाच्या बैठकीचे विषय तसेच बैठकाच्या इतिवृत्ताची प्रत इत्यादी एकूण ४ मुद्यावर अनुषंगीक माहिती मागीतली होती. सदर प्रकरणी अपीलकारास सर्व संबंधीत कागदपत्र निरीक्षणाकरिता उपलब्ध करून द्यावीत. त्यानंतर निवडक कागदपत्राच्या छायाप्रती तक्रारदारास उपलब्ध करून द्याव्यात असे व्दितीय अपील क्र.२००९/२८६७/०२ संबंधी दि.१४.०७.२००९ रेाजी आयेागाने आदेश पारित केले होते. त्यानंतरही माहिती पुरविली नसल्याने तक्रारदाराने राज्य माहिती आयेागाकडे तक्रार दाखल केली.

तक्रारीवरील सुनावणीचेवेळी गैरतक्रारदाराने आयोगा समक्ष तक्रारदारास माहिती दिली. परंतू तक्रारदाराने माहिती घेण्यास नकार दिला, माहिती स्विकारली नाही. सदर प्रकरणी तक्रारदाराने माहिती स्विकारली नसल्याने या प्रकरणी मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

आदेश

तक्रार निकाली काढण्यांत येत आहे.

मुंबई
दिनांक १५.०२.२०१०

(रामानंद तिवारी)
राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई

राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.

तक्रार क्र.२०१०/५७७/०२

श्री.राम.आर.समुद्रे
सेंट्रल रेल्वे कॉलनी,
एमएस/एमए/१११/९-१०,
आर.पी.एस.बॅरॅक्स,
माटुंगा, मुंबई ४०० ०१९. **.... तक्रारदार**

विरूध्द

जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव
नियोजन विभाग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२. **.... उत्तरवादी**

विवेचन

तक्रारदार श्री.राम समुद्रे यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयेागाकडे दि.२३.१०.२००८ रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.०५.०२.२०१० रोजी सुनावणी आयेाजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता तक्रारदार हजर होते. गैरतक्रारदार हजर नव्हते. सुनावणीचेवेळी तक्रारदार यांचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच तक्रारीवरील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे अर्ज करून, मंत्रालयाच्या नियोजन विभागातील सर्व अधिका-यांच्या दि.०१.०१.२००५ ते दि.३०.०४.२००७ या कालावधीतील कार्ड पंचिंगचे संगणकीय अभिलेख सी.डी.च्या स्वरूपात मिळण्याची मागणी केली होती. गैरतक्रारदाराने दिलेल्या माहितीने समाधान झाले नसल्याने तक्रारदाराने राज्य माहिती आयेागाकडे क्र.२००८/७८६/०२ हे व्दितीय अपील दाखल केले होते. सदर प्रकरणी अपीलकारास १५ दिवसात माहिती पुरवावी असे आयेागाने दि.३०.०९.२००८ रोजी आदेश पारित केले होते.

तक्रारदाराने याच विषयावर आयेागाकडे क्र.२००९/३८६/०२ ही तक्रार दाखल केली होती. सदर तक्रार आयोगाने निकाली काढली आहे. कारण माहितीपोटी शुल्क भरण्याबाबत तक्रारदारास कळविण्यात आले होते. तक्रारदाराने शुल्क भरले नसल्याने गैरतक्रारदाराने माहिती पुरविली नाही. गैरतक्रारदाराने आयेागाच्या दि.०७.०८.२००९ च्या आदेशाची प्रत सुनावणीचेवेळी सादर करून सदर तक्रार बंद करण्याची आयेागास विनंती केली. तक्रारदार सुनावणीस अनुपस्थित होते. आयोगाचे दि.०७.०८.२००९ चे आदेश लक्षात घेउन सदर प्रकरणी मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

आदेश

तक्रार निकाली काढण्यांत येत आहे.

मुंबई
दिनांक १६.०२.२०१०

(रामानंद तिवारी)
राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई

राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.

तक्रार क्र.२०१०/५८७/०२

श्री.नितीन गवाणकर
०५, गवाणकर निवास,
साईकृषा इमारतीच्या विरूध्द,
श्री.वल्लभ रोड, दहिसर,
मुंबई ४०० ०६८. **.... तक्रारदार**

विरूध्द

जन माहिती अधिकारी तथा सहा.अभियंता
बृहन्मुंबई महानगरपालिका,
आर/उत्तर विभाग कार्यालय,
दहिसर रेल्वे उड़डाण पुलाखाली,
जयवंत सावत मार्ग, दहिसर (प),
मुंबई ४०० ०६८. **.... उत्तरवादी**

विवेचन

तक्रारदार श्री.नितीन गवाणकर यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयेागाकडे दि.२३.१२.२००९ रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.०५.०२.२०१० रोजी सुनावणी आयेाजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता तक्रारदार हजर नव्हते. गैरतक्रारदार हजर होते. सुनावणीचेवेळी गैरतक्रारदार यांचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच तक्रारीवरील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे दि.२१.०१.२००९ रोजी अर्ज करून, समाता नगर, गॅस गोडाउन, आव्हाड विद्यालय केतकीपाडा येथील नाल्याच्या बांधकाचा आपेक्षीत खर्च, उपलब्ध निधी याबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. गैरतक्रारदाराने माहिती पुरविली नाही. यामुळे व्यथीत होउन तक्रारदाराने आयेागाकडे क्र.२००८/३४५३/०२ हे व्दितीय अपील दाखल केले होते. तक्रारदारास ३ आठवडयाचे आत मागणीप्रमाणे माहिती पुरवावी असे आयोगाने

दि.३१.१०.२००९ रोजी आदेश पारित केले होते. त्यानंतरही गैरतक्रारदाराने माहिती पुरविली नसल्याच्या कारणावरून तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे तक्रार दाखल केली.

गैरतक्रारदाराने, तक्रारदारास विलंबाने माहिती पुरविली असल्याबाबत लेखी अहवाल सादर करून प्रतिपादन केले. तसेच माहिती पुरविण्यास झालेल्या विलंबाबत आयोगासमोर क्षमा याचना केली.

सदर प्रकरणी गैरतक्रारदाराने तक्रारदारास माहिती पुरविली आहे. माहिती पुरविण्यास झालेल्या विलंबाबत आयेागास क्षमा याचना केली आहे. तक्रारीवरील सुनावणीकरिता तक्रारदार अनुपस्थित होते. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

आदेश

तक्रार निकाली काढण्यांत येत आहे.

मुंबई
दिनांक १५.०२.२०१०

(रामानंद तिवारी)
राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई

राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.

तक्रार क्र.२०१०/५२२/०२

श्री.राजू दुदम
३ ए/६१०, कुमकुम हौ.सोसा,
प्रतिक्षा नगर, सायन (पू),
मुंबई ४०० ०२२. **.... तक्रारदार**

विरूध्द

जन माहिती अधिकारी तथा मिळकत व्यवस्थापक (५)
मुंबई मंडळ, गृहनिर्माण भवन,
म्हाडा, कलानगर, बांद्रा (पू),
मुंबई ४०० ०५१. **.... उत्तरवादी**

विवेचन

तक्रारदार श्री.राजू दुदम यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयोगाकडे दि.०६.०२.२००८ रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.०१.०२.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता तक्रारदार हजर नव्हते. गैरतक्रारदार हजर होते. सुनावणीचेवेळी गैरतक्रारदार यांचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच तक्रारीवरील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे दि.१८.१२.२००७ रोजी अर्ज करून, सायन प्रतिक्षानगर योजनेतील गाळे मालकांना / Transit Camp मधील गाळे धारकांना किती मासिक सेवा शुल्क आकारण्यात येते याबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. गैरतक्रारदाराने अपूर्ण माहिती पुरविली असल्याच्या कारणावरून तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे तक्रार दाखल केली.

तक्रारदारास मागणीप्रमाणे माहिती पुरविण्यात आली असल्याचे गैरतक्रारदाराने तक्रारीवरील सुनावणीचेवेळी प्रतिपादन केले. तक्रारदार सुनावणीकरिता हजर नव्हते. सदर प्रकरणी गैरतक्रारदाराने केलेले प्रतिपादन लक्षात घेता मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

आदेश

तक्रार निकाली काढण्यांत येत आहे.

मुंबई
दिनांक १५.०२.२०१०

(रामानंद तिवारी)
राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई

राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.

तक्रार क्र.२०१०/५२०/०२

श्री.संजय शिर्के
५४, रिज रोड, शिवा सदन,
तीन बत्ती, मलबार हिल,
मुंबई ४०० ००७. **.... तक्रारदार**

विरूध्द

जन माहिती अधिकारी तथा कुलगुरू
मुंबई विद्यापीठ, मुंबई. **.... उत्तरवादी**

विवेचन

तक्रारदार श्री.संजय शिर्के यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयेागाकडे दि.०५.११.२००८ रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.०१.०२.२०१० रोजी सुनावणी आयेाजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता तक्रारदार तसेच गैरतक्रारदार हजर होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच तक्रारीवरील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे दि.१८.०८.२००८ रोजी अर्ज करून, भवन्स महाविद्यालय चौपाटी येथील अकरावी प्रवेश प्रक्रीयाबाबत एकूण १५ मुद्याबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. गैरतक्रारदाराने माहिती दिली नसल्याच्या कारणावरून तक्रारदाराने राज्य माहिती आयेागाकडे तक्रार दाखल केली.

तक्रारीवरील सुनावणीकरिता गैरतक्रारदार तथा उप कुलसचिव मुंबई विद्यापीठ श्री.के.एल.पराड हे हजर होते. सदर प्रकरणी गैरतक्रारदाराने तक्रारदारास विहित कालावधीत माहिती पुरविली नाही. गैरतक्रारदाराची सदर कृती निश्चितच योग्य नाही. या परिस्थितीती मी असे आदेश देतो की, गैरतक्रारदाराने हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसाचे आत तक्रारदारास माहिती पुरवावी. आयेागाच्या आदेशानुसार तक्रारदारास माहिती पुरविली नाही तर माहितीचा अधिकार

अधिनियम, २००५ मधील कलम २० अनुसार गैरतक्रारदाराविरूध्द शास्ती लादण्याची कारवाई सुरू करण्यात येईल.

आदेश

तक्रार मान्य करण्यांत येत आहे.

मुंबई
दिनांक १५.०२.२०१०

(रामानंद तिवारी)
राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई

राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.

तक्रार क्र.२०१०/५१८/०२

श्री.सुरेश गावडे
दुकान क्र.४०, शास्त्री नगर,
म्युनसिपल मंडई, संत ज्ञानेश्वर मार्ग,
बांद्रा (पू), मुंबई ४०० ०५१. **.... तक्रारदार**

विरूध्द

जन माहिती अधिकारी तथा सहा अभियंता
बृहन्मुंबई महानगरपालिका, एच/पूर्व,
प्रभात कॉलनी, सांताक्रुझ (पू),
मुंबई ४०० ०५५. **.... उत्तरवादी**

विवेचन

तक्रारदार श्री.सुरेश गावडे यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयेागाकडे दि.०६.०१.२००९ रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.०१.०२.२०१० रोजी सुनावणी आयेाजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता तक्रारदार तसेच गैरतक्रारदार हजर होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच तक्रारीवरील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे दि.०९.०५.२००८ रोजी अर्ज करून, खाली नमुद केलेली माहिती मागीतली होती.

शास्त्रीनगर म्युनसीपल मंडईचा भूखंड जिल्हाधिका-याने महानगर पालीकेस केव्हा हस्तांतरीत केला आहे. किती कालावधीसाठी व केाणत्या प्रयोजनासाठी हस्तांतरीत केला आहे. तसेच जिल्हाधिकारी व महानगरपालिका यांच्याबरोबर झालेल्या कराराच्या पत्रव्यवहाराच्या लीज ॲग्रीमेटच्या नकाशाच्या प्रती संबंधीत सर्व व्यवहाराची कागदपत्राच्या प्रती पाहिजे आहेत.

शास्त्रीनगर म्युनसिपल मंडइचा पूनर्वीकासासाठी विभागाने परवानगी / एन.ओ.सी. दिली आहे किंवा नाही याची माहिती.

शास्त्रीनगर म्युनिसिपल मंडईच्या भूखंड झोपडपट्टी क्षेत्र आहे किंवा नाही.

गैरतक्रारदाराने विहित कालावधीत तक्रारदारास माहिती पुरविली नाही. यामुळे तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे तक्रार दाखल केली.

तक्रारीवरील सुनावणीकरिता गैरतक्रारदार तथा सहाय्यक आयुक्त (बाजार) हे हजर होते. तक्रारदाराने मागणी केलेली माहिती, वांद्रे (पू) येथील न.भू.क्र. ६२९ (पै) वरील शास्त्रीनगर म्युनिसिपल मंडईसंबंधी आहे. तक्रारदाराने मागणी केलेली माहिती विकास नियोजन कार्यालयात उपलब्ध नाही. याबाबतची माहिती सहाय्यक आयुक्त एच/पूर्व या कार्यालयात उपलब्ध होईल. तक्रारदाराचा अर्ज एच/पूर्व कार्यालयाकडे पाठविण्यात येत असल्याचे प्रमुख अभियंता (विकास नियोजन) यांनी तक्रारदारास दि.०२.०८.२००८ च्या पत्रान्वये कळविले आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, गैरतक्रारदार तथा सहाय्यक आयुक्त (बाजार) यांनी सदर प्रकरणी तक्रारदारास माहिती पुरविण्याच्या दृष्टीने एच/पूर्व विभाग कार्यालयाची तसेच सहाय्यक आयुक्त (इस्टेट) यांची सहाय्यक आयुक्त (बाजार) यांनी मदत द्यावी. यानुसार माहिती जमा करून तक्रारदारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसाचे आत माहिती पुरवावी.

<u>आदेश</u>

तक्रार मान्य करण्यांत येत आहे.

मुंबई **(रामानंद तिवारी)**
दिनांक १५.०२.२०१० **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.

तक्रार क्र.२०१०/५२६/०२

श्री.दिपक जाधव
रुम नं.८०२, सम्राट चाळ हौ.सोसा,
चाळ नं.४७, कामराज नगर,
वसंत नाईक मार्ग, घाटकोपर (पू),
मुंबई ४०० ०७७. **.... तक्रारदार**

विरूध्द

जन माहिती अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
एस.आर.ए. योजना,
गृहनिर्माण भवन, बांद्रा (पू),
मुंबई ४०० ०५१. **.... उत्तरवादी**

विवेचन

तक्रारदार श्री.दिपक जाधव यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयेागाकडे दि.०१.०७.२००८ रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.०१.०२.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता तक्रारदार हजर नव्हते. गैरतक्रारदार हजर होते. सुनावणीचेवेळी गैरतक्रारदार यांचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच तक्रारीवरील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे दि.०३.०६.२००८ रोजी अर्ज करून, खाली नमुद केलेली माहिती मागीतली होती.

नीलम फायनान्स बॉम्बे प्रा.लिमिटेड हया कंपनीचे मुख्य मालक व व्यवस्थापकाचे नाव ऑफिसचे पुर्ण पत्ते मिळण्याबाबत. त्यांनी एस.आर.ए.च्या योजने अंतर्गत कुठे आणि किती प्रोजेक्ट केले त्या सर्वांची सविस्तर कागदपत्रासह माहिती मिळण्याबाबत. त्यांनी हातात घेतलेल्या सर्व प्रोजेक्ट मधुन स्वत: किती पूर्ण केले की, नाही व त्या योजनेच्या अंतर्गत त्यांना FSI म्हणून किती जागा त कुठे पास करण्यात आली त्याची माहिती मिळाण्याबाबत मागणी केली होती.

गैरतक्रारदाराने माहिती पोटी शुल्क भरण्याबाबत कळविले. त्यानुसार शुल्क भरणा करूनही गैरतक्रारदार पूर्ण माहिती देत नाहीत. अपूर्ण माहिती पूरविली. मागणीप्रमाणे संपूर्ण माहिती पुरविली नसल्याच्या कारणावरून तक्रारदाराने राज्य माहिती आयेागाकडे तक्रार दाखल केली.

तक्रारीवरील सुनावणीकरिता तक्रारदार हजर नव्हते. तक्रारदारास मागणीप्रमाणे माहिती पुरविण्यात आली असल्याचे गैरतक्रारदाराने तक्रारीवरील सुनावणीचेवेळी आयेागासमोर प्रतिपादन केले. गैरतक्रारदाराने केलेले प्रतिपादन लक्षात घेता सदर प्रकरणी मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

<u>आदेश</u>

तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

मुंबई
दिनांक १५.०२.२०१०

(रामानंद तिवारी)
राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई

राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.

तक्रार क्र.२०१०/५२६/०२

श्री.दिपक जाधव
रूम नं.८०२, सम्राट चाळ हौ.सोसा,
चाळ नं.४७, कामराज नगर,
वसंत नाईक मार्ग, घाटकोपर (पू),
मुंबई ४०० ०७७. **.... तक्रारदार**

विरूध्द

जन माहिती अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
एस.आर.ए. योजना,
गृहनिर्माण भवन, बांद्रा (पू),
मुंबई ४०० ०५१. **.... उत्तरवादी**

विवेचन

तक्रारदार श्री.दिपक जाधव यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयेागाकडे दि.०१.०७.२००८ रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.०१.०२.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता तक्रारदार हजर नव्हते. गैरतक्रारदार हजर होते. सुनावणीचेवेळी गैरतक्रारदार यांचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच तक्रारीवरील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे दि.०३.०६.२००८ रोजी अर्ज करून, खाली नमुद केलेली माहिती मागीतली होती.

नीलम फायनान्स बॉम्बे प्रा.लिमिटेड हया कंपनीचे मुख्य मालक व व्यवस्थापकाचे नाव ऑफिसचे पुर्ण पत्ते मिळण्याबाबत. अजुनपर्यंत त्याने एस.आर.ए.च्या योजने अंतर्गत कुठे आणि किती प्रोजेक्ट केले त्या सर्वांची सविस्तर कागदपत्रासह माहिती मिळण्याबाबत. त्यांनी हातात घेतलेल्या सर्व प्रोजेक्ट मधुन स्वत: किती पूर्ण केले की, नाही व त्या योजनेचया अंतर्गत त्याला FSI म्हणून किती जागा त कुठे पास करण्यात आली त्याची माहिती मिळाण्याबाबत.

गैरतक्रारदाराने माहिती पोटी शुल्क भरण्याबाबत कळविले. त्यानुसार शुल्क भरणा करूनही गैरतक्रारदार पूर्ण माहिती देत नाहीत. अपूर्ण माहिती पूरविली. मागणीप्रमाणे संपूर्ण माहिती पुरविली नसल्याच्या कारणावरून अपीलकाराने राज्य माहिती आयेागाकडे तक्रार दाखल केली.

तक्रारीवरील सुनावणीकरिता तक्रारदार हजर नव्हते. तक्रारदारास मागणीप्रमाणे माहिती पुरविण्यात आली असल्याचे गैरतक्रारदाराने तक्रारीवरील सुनावणीचेवेळी आयेागासमोर प्रतिपादन केले. गैरतक्रारदाराने केलेले प्रतिपादन लक्षात घेता सदर प्रकरणी मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

<u>आदेश</u>

तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

मुंबई
दिनांक १५.०२.२०१०

(रामानंद तिवारी)
राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई

राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.

तक्रार क्र.२०१०/५२७/०२

श्री.प्रकाश सी.शेठ
११०३- सुल्सा अपार्टमेंट,
२५४-राईग रोड, मुंबई ४०० ००६. **.... तक्रारदार**

विरुध्द

जन माहिती अधिकारी तथा सचिव,
बार कौन्सील ऑफ महाराष्ट्र ॲण्ड गोवा,
मुंबई उच्च न्यायालय, मुंबई. **.... उत्तरवादी**

विवेचन

तक्रारदार श्री.प्रकाश शेठ यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयेागाकडे दि.२६.१२.२००८ रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.०१.०२.२०१० रोजी सुनावणी आयेाजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता तक्रारदार तसेच गैरतक्रारदार हजर होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच तक्रारीवरील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे दि.१३.११.२००८ रोजी अर्ज करून, ॲडव्होकेट ॲक्ट १९६१ मधील कलम १७ (१) (ब) अनुसार महाराष्ट्र बार कौन्सीलने ठेवलेल्या ॲडव्होकेट रोल रजीस्टरबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. गैरतक्रारदाराने मागणीप्रमाणे विहित कालावधीत माहिती पुरविली नाही. यामुळे व्यथीत होईन तक्रारदाराने राज्य माहिती आयेागाकडे तक्रार दाखल केली. गैरतक्रारदाराने तक्रारदारास विहित कालवधीत माहिती पुरविली नाही. गैरतक्रारदाराची सदर कृती निश्चितच योग्य नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, गैरतक्रारदारांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत तक्रारदारास मागणीप्रमाणे माहिती पुरवावी.

आदेश

तक्रार मान्य करण्यांत येत आहे.

मुंबई **(रामानंद तिवारी)**
दिनांक १५.०२.२०१० **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.

तक्रार क्र.२०१०/५२३/०२

श्री.मेहमुद शेख
रूम नं.७, दोस्त मो.चाळ,
नित्यानंद नगर, घाटकोपर (पू),
मुंबई ४०० ०८६. **.... तक्रारदार**

विरूध्द

जन माहिती अधिकारी तथा सहा. अभियंता
एच/पूर्व विभाग,
बृहन्मुंबई महानगरपालिका,
सांताक्रुझ (पू), मुंबई. **.... उत्तरवादी**

विवेचन

तक्रारदार श्री.मेहमुद शेख यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयेागाकडे दि.२३.०३.२००९ रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.०१.०२.२०१० रोजी सुनावणी आयेाजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता तक्रारदार हजर नव्हते. गैरतक्रारदार हजर होते. सुनावणीचेवेळी गैरतक्रारदार यांचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच तक्रारीवरील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे दि.२९.०१.२००९ रोजी अर्ज करून, एच/पूर्व विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका, सांताक्रुझ (पू), मुंबई येथील सहाय्यक अभियंता (Maint) विभागातील कामाबाबत एकूण १९ मुद्याबाबत माहिती मागीतली होती. गैरतक्रारदाराने मागणी केलेली माहिती पुरविली नाही. यामुळे व्यथीत होउन तक्रारदाराने राज्य माहिती आयेागाकडे तक्रार दाखल केली.

सदर प्रकरणी तक्रारदारास संबंधीत कामाची पाहणी करण्याची गैरतक्रारदाराने संधी उपलब्ध करून दिली. तक्रारदाराने स्वत: कामाची पाहणी केली असता सर्व काम ठीक असल्याने

तक्रारदाराचे समाधान झाले. यामुळे तक्रारदाराने दाखल केलेली तक्रार रद्द करून दप्तरी दाखल करावी अशी तक्रारदाराने दि.१७.०४.२००९ च्या पत्रान्वये कार्यालयास लेखी विनंती केली असल्याचे सदर पत्राची प्रत आयेागास सादर करून गैरतक्रारदाराने प्रतिपादन केले. यावरून सदर प्रकरणी तक्रारदारास माहिती पुरविण्यात आली असल्याचे दिसून येते. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

आदेश

तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

मुंबई
दिनांक १६.०२.२०१०

(रामानंद तिवारी)
राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई

राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.

तक्रार क्र.२०१०/५२४/०२

श्री.शिवानंद अकोलकर
ए-८, एम.आय.डी.सी, फ्लट्टेड फक्टर्री,
एल.बी.एस. मार्ग, वागले इस्टेट,
ठाणे (प), मुंबई ४०० ६०४. **.... तक्रारदार**

विरूध्द

जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ पोलीस निरीक्षक
मलाड पोलीस स्टेशन,
मलाड (प), मुंबई ४०० ०६४. **.... उत्तरवादी**

विवेचन

तक्रारदार श्री.शिवानंद अकोलकर यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयोगाकडे दि.२१.०२.२००९ रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.०१.०२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता तक्रारदार हजर होते. गैरतक्रारदार हजर नव्हते. सुनावणीचेवेळी तक्रारदार यांचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच तक्रारीवरील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे दि.०८.१२.२००८ रोजी अर्ज करून, भारतीय महिला फेडरेशन (ठाणे समिती) यांचे मार्फत कौटुंबिक समुपदेश केंद्र चालविण्यात येते. भारतीय महिला फेडरेशनने मालाड (पू) पोलीस स्टेशन, मुंबई येथे सौ.चैताली अवधूत साळवी यांना त्यांचे पती व कुटुंबातील सदस्य त्रास देतात म्हणून तक्रार दाखल केली होती. सदर तक्रारीवर केलेल्या कारवाईची माहिती मागीतली होती. गैरतक्रारदाराने मागणीप्रमाणे विहित कालावधीत माहिती पुरविली नाही. यामुळे व्यथीत होउन तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे तक्रार दाखल केली.

सदर प्रकरणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ६ (३) मधील कार्यपध्दतीचा गैरतक्रारदारांनी अवलंब केला नाही. कलम ६(३) मधील तरतूद पुढीलप्रमाणे आहे.

(एक) जी माहिती अन्य सार्वजनिक प्राधिकरणाकडे असेल किंवा

(दोन) ज्या माहितीचा विषय अन्य सार्वजनिक प्राधिकरणाच्या कामकाजाशी अधिक संबंधीत असेल,

अशी माहिती मिळवण्यसाठी एखाद्या सार्वजनिक प्राधिकरणाकडे अर्ज करण्यात आला असेल त्याबाबतीत, ज्याच्याकडे असा अर्ज करण्यात आला आहे ते सार्वजनिक प्राधिकरण, असा अर्ज किंवा त्यास योग्य वाटेल असा त्याचा भाग, अशा अन्य सार्वजनिक प्राधिकरणाकडे हस्तांतरित करील आणि अशा हस्तांतरणाबाबत अर्जदारास तात्काळ माहिती देईल.

परंतु या पोटकलमानुसार करावयाचे हस्तांतरण, व्यवहार्य असेल तितक्या लवकर करण्यात येईल. मात्र, कोणत्याही परिस्थितीत ते अर्ज मिळाल्याच्या तारखेपासून पाच दिवसांपेक्षा अधिक विलंबाने करण्यात येणार नाही.

गैरतक्रारदार तथा वरिष्ठ पोलीस निरीक्षक, दिंडोशी पोलीस स्टेशन यांनी गैरतक्रारदार तथा वरिष्ठ पोलीस निरीक्षक, मालाड पेालीस स्टेशन यांचेकडे तक्रारदाराचा अर्ज त्यांच्याशी संबंधीत असल्याने पुढील कारवाई करीता हस्तांतरित करून तक्रारदारास विहित कालावधीत माहिती पुरविण्याबाबत कळविणे आवश्यक आहे. परंतू तक्रारदाराचा अर्ज गैरतक्रारदाराकडून तक्रारदाराकडे परत पाठविण्यात आला. गैरतक्रारदार तथा वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन मालाड (पू) यांनी उक्त अधिनियमातील वर नमुद केलेल्या तरतुदीचा अवलंब केलेल ा दिसत नाही. तरी सदर प्रकरणी तक्रारदाराचा अर्ज उक्त अधिनियमातील तरतुदीनुसार हस्तांतरित करण्याची कारवाई करावी. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

<u>आदेश</u>

तक्रार मान्य करण्यांत येत आहे.

मुंबई
दिनांक १५.०२.२०१०

(रामानंद तिवारी)
राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई

राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.

तक्रार क्र.२०१०/४७७/०२

श्री.सुरदास डोके
शिवशक्ती सहकारी गृहनिर्माण संस्था
आगर बाजार, एस.के.बोले रोड,
दादर, मुंबई ४०० ०२८. **.... तक्रारदार**

विरूध्द

जन माहिती अधिकारी तथा सहा.अभियंता
नगर रचना (अमंलबजावणी), बृहन्मुंबई महानगरपालिका,
जी/उत्तर विभाग, मुंबई ४०० ०२८.

जन माहिती अधिकारी,
टी.पी.स्कीम, बृहन्मुंबई महानगरपालिका,
जी/उत्तर विभाग, मुंबई ४०० ०२८. **.... उत्तरवादी**

विवेचन

तक्रारदार श्री.सुरदार डोके यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयेागाकडे दि.२४.०९.२००९ रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.०८.०२.२०१० रोजी सुनावणी आयेाजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता तक्रारदार हजर नव्हते. गैरतक्रारदार हजर होते. सुनावणीचेवेळी गैरतक्रारदार यांचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच तक्रारीवरील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे दि.२७.११.२००७ रोजी अर्ज करून, सी.टी.सर्व्हे क्र.६८/६९, माहिम डीव्हीजन वरील राखीव जागेवरील हक्कदारापैकी श्री.रामदास तु.डोके यांचे नावे दुकाने कोणत्या पुराव्यावर दिली याबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. गैरतक्रारदाराने, तक्रारदारास विहित कालावधीत माहिती पुरविली नाही. यामुळे व्यथीत होउन तक्रारदाराने क्र.२००८/१०७०/०२ हे व्दितीय अपील राज्य माहिती आयेागाकडे दाखल केले होते. सदर प्रकरणी संबंधीत कागदपत्र उपलब्ध होत नसल्याबाबत जाणीवपूर्वक निर्णय घेउन तक्रारदारास

कळवावे असे राज्य माहिती आयोगाने दि.१४.११.२००८ रोजी आदेश पारित केले होते. त्यानंतर गैरतक्रारदाराने तक्रारदारास काही कळविले नाही. माहिती दिली नसल्याने राज्य माहिती आयोगाकडे तक्रार दाखल केली.

सदर प्रकरणी गैरतक्रारदार तथा सहा.अभियंता, नगर रचना (अमंलबजावणी), बृहन्मुंबई महानगरपालिका जी/उत्तर विभाग, मुंबई यांनी तक्रारदारास विहित कालावधीत माहिती दिली नाही. आयोगाच्या दि.१४.११.२००८ च्या आदेशाचे पालन केले नाही. या करिता सहा.अभियंता, नगररचना यांना जबाबदार धरून त्यांच्याविरूध्द माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम २० अनुसार शास्ती लादण्याची कारवाई का? सुरू करू नये याबाबत हे आदेश प्राप्त झाल्यापासून ४ आठवडयाचे आत आयोगाकडे प्रत्यक्ष भेटून लेखी खुलासा सादर करावा.

<u>आदेश</u>

तक्रार मान्य करण्यांत येत आहे.

मुंबई
दिनांक १६.०२.२०१०

(रामानंद तिवारी)
राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई

राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.

तक्रार क्र.२०१०/६१५/०२
तक्रार क्र.२०१०/५९३/०२

श्री.जनार्दन कारंडे
रूम नं.११७९/ बी/१५, मंगलधाम
निकेतन हौ.सोसा, टाटा पावर हाउस जवळ,
बोरीवली (पू), मुंबई ४०० ०६६. **.... तक्रारदार**

विरुध्द

जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (इमारत प्रस्ताव)
बृहन्मुंबई महानगरपालिका,
पी विभाग, पी / उत्तर - दक्षिण महापालिका इमारत,
डी.पी.रोड, कांदीवली (पू),
मुंबई ४०० १०१. **.... उत्तरवादी**

विवेचन

तक्रारदार श्री.जनार्दन कारंडे यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयेागाकडे दि.२१.१२.२००९ रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.१०.०२.२०१० रोजी सुनावणी आयेाजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता तक्रारदार हजर होते. गैरतक्रारदार हजर नव्हते. सुनावणीचेवेळी तक्रारदार यांचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच तक्रारीवरील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे अर्ज करून, दि.१८.०२.२००६, दि.०९.०६.२००६, दि.१८.१२.२००६ आणि दि.१६.११.२००७ च्या तक्रारीवर केलेल्या कार्यवाहीची माहिती मागीतली होती. गैरतक्रारदाराने तक्रारदारास माहिती पुरविली नसल्याने तक्रारदाराने राज्य माहिती आयेागाकडे क्र.२००८/३४८२/०२ हे व्दितीय अपील दाखल केले होते. तक्रारदारास सदर प्रकरणी ३० दिवसाचे आत माहिती पुरवावी असे आयेागाने दि.२६.१०.२००९ रोजी आदेश पारित केले होते. त्यानंतरही गैरतक्रारदाराने तक्रारदारास माहिती पुरविली नसल्याने राज्य माहिती आयेागाकडे तक्रार दाखल केली.

सदर प्रकरणी मी असे आदेश देतो की, गैरतक्रारदाराने तक्रारदाराच्या सर्व तक्रारीवर प्रथम विधी सल्लागाराचे अभिप्राय प्राप्त करून घ्यावेत. त्यानुसार तक्रारदारास माहिती पुरवावी.

<u>आदेश</u>

तक्रार मान्य करण्यांत येत आहे.

मुंबई
दिनांक १६.०२.२०१०

(रामानंद तिवारी)
राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई

राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.

तक्रार क्र.२०१०/६११/०२

श्री.किशोर काशिनाथ घोगरे
३८, तृप्ती सदर को.ऑ.हौ.सोसा,
९० फूट रोड, पोलीस चौकीच्या मागे,
काजूपाडा, कुर्ला, मुंबई ४०० ०७२. **.... तक्रारदार**

विरूध्द

जन माहिती अधिकारी तथा सहा.आयुक्त
एल विभाग, लक्ष्मणराव यादव मंडई,
कुर्ला (प), मुंबई ४०० ०७०. **.... उत्तरवादी**

विवेचन

तक्रारदार श्री.किशोर घोगरे यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयेागाकडे दि.११.०८.२००९ रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.०९.०२.२०१० रोजी सुनावणी आयेाजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता तक्रारदार तसेच गैरतक्रारदार हजर होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच तक्रारीवरील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे दि.२४.०४.२००८ रोजी अर्ज करून, खाली नमुद केलेली माहिती मागीतली होती.

१) साकीनाका जंक्शनपासून असल्फा ३४० बस स्टॉप पर्यंत रस्त्याच्या दोन्ही बाजुला झालेल्या जी + १ बांधकामाला परवानगी दिली आहे का?

२) दिली असल्यास लेखी परवानगी प्रत देण्यात यावी.

३) नसल्यास आपल्या खात्याने कोणती कारवाई केली आहे, केलेल्या कारवाईची प्रत देण्यात यावी.

४) स्थानिक लोक प्रतिनिधींनी कुरार पँटर्नच्या नावावर परवानगी घेतल्याचे बोर्ड लावले आहेत, ते खरे आहे का? कुरार पँटर्न म्हणजे नेमके काय आहे?

५) कुरार पँटर्न अंतर्गत किती उंची पर्यंत बाधकाम केले जाउ शकते? जी + १ चे बांधकाम केले जाउ शकते का?

६) शासनाच्या नियम धोरणाप्रमाणे सर्व गाळेधारकांना पर्यायी गाळे देण्यात आले असतांना सुध्दा जी + १ चे बांधकाम करण्याीच परवानगी देण्याचे कारण काय? याबाबत आता पर्यंत आलेल्या तक्रारी व विभागाने केलेली कारवाई यांची प्रत देण्यात यावी.

७) कुरार पँटर्नला महानगरपालिका सभेमध्ये परवानगी दिली आहे का? अथवा तसे परिपत्रक मा.आयुक्तांनी काढले आहे का? प्रत संलग्न करावी. ही सर्व माहिती लेखी स्वरूपात कागदपत्रांसह देण्यात यावी.

गैरतक्रारदाराने तक्रारदारास अपूर्ण माहिती पुरविली. म्हणून तक्रारदारास, अनधीकृत बांधकावर केलेली कारवाई, तसेच कुरार पॅटर्नबाबत ३० दिवसाचे आत माहिती पुरवावी असे क्र.२००९/२२९८/०२ या व्दितीय अपीलावर दि.२८.०४.२००९ रोजी आदेश पारित केले. त्यानंतरही गैरतक्रारदाराने तक्रारदारास आवश्यक माहिती पुरविली नाही. यामुळे व्यथीत होउन तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे तक्रार दाखल केली.

सदर प्रकरणी गैरतक्रारदार तथा सहाय्यक अभियंता (र व का) एल विभाग बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी आयोगाच्या आदेशाचे पालन केले नाही. तक्रारदारास माहिती पुरविली नाही. यासाठी गैरतक्रारदार तथा सहाय्यक अभियंता (र व का) एल विभाग श्री.प्र.कृ.कांबळे यांना जबाबदार धरून त्यांच्या विरूध्द माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम २० अनुसार शास्ती लादण्याची कारवाई का? करण्यात येउ नये याबाबत हे आदेश प्राप्त झाल्यापासून ४ आठवडयाचे आत आयोगात प्रत्यक्ष भेटून गैरतक्रारदाराने लेखी खुलासा सादर करावा. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

आदेश

तक्रार मान्य करण्यांत येत आहे.

मुंबई **(रामानंद तिवारी)**

दिनांक १७.०२.२०१० **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.

तक्रार क्र.२०१०/६१४/०२

श्री.मनोज कुमार जयवंत सामंत
४/४०, गणेश बिल्डींग, पांडुरंगवाडी रस्ता क्र.३
गोरंगांव (पू), मुंबई ४०० ०६३. **.... तक्रारदार**

विरूध्द

जन माहिती अधिकारी तथा उप निबंधक
सहकारी संस्था ३१६/ए इमारत,
३ रा मजला, ट्रक टर्मिनल, आर.टी.ओ.ऑफीसजवळ,
वडाळा (पू), मुंबई ४०० ०३७. **.... उत्तरवादी**

विवेचन

तक्रारदार श्री.मनोजकुमार सामंत यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयोगाकडे दि.०५.१२.२००९ रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.१०.०२.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता तक्रारदार हजर होते. गैरतक्रारदार हजर नव्हते. सुनावणीचेवेळी तक्रारदार यांचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच तक्रारीवरील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे दि.०४.०३.२००९ रोजी अर्ज करून, निलेश सहाकारी गृहनिर्माण संस्था पांडुरंगवाडी, गोरेगांव (पू) मुंबई यांनी सन १९८५ ते २००८ या कालावधीत केलेल्या लेखापरिक्षणाच्या विवरणपत्राची प्रत व इतर अनुषंगीक माहिती मागीतली होती. गैरतक्रारदाराने तक्रारदारास विहित कालावधीत माहिती पुरविली नाही. त्यामुळे तक्रारदाराने क्र.२००९/३२८८/०२ हे व्दितीय अपील राज्य माहिती आयोगाकडे दाखल केले होते. तक्रारदारास ३० दिवसाचे आत मागणीप्रमाणे माहिती पुरवावी असे राज्य माहिती आयोगाने दि.०५.१०.२००९ रोजी आदेश पारित केले होते. त्यानंतरही गैरतक्रारदाराने तक्रारदारास माहिती पुरविली नाही. यामुळे तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे तक्रार दाखल केली.

सदर प्रकरणी गैतक्रारदाराने तक्रारदारास माहिती पुरविली नाही. यामुळे राज्य माहिती आयेागाच्या दि.०५.१०.२००९ च्या आदेशाचे गैरतक्रारदाराने पालन केले नाही. यासाठी गैरतक्रारदारास जबाबदार धरून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम २० अनुसार गैरतक्रारदाराविरूध्द शास्ती लादण्याची कारवाई का? सुरू करू नये याबाबत हे आदेश प्राप्त झाल्यापासून ४ आठवडयाचे आत राज्य माहिती आयोगाकडे, गैरतक्रारदारांनी आयेागात प्रत्यक्ष भेटून लेखी खुलसा सादर करावा. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

आदेश

तक्रार मान्य करण्यांत येत आहे.

मुंबई
दिनांक १७.०२.२०१०

(रामानंद तिवारी)
राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई

राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.

तक्रार क्र.२०१०/६१६/०२

श्री.विजय पांडे
मुंबई मोटर ट्रेंनिग स्कुल,
कमलेश बिल्डींग, शॉप नं.४५,
शेर-ए-पंजाब, अंधेरी (पू),
मुंबई ४०० ०९३. **.... तक्रारदार**

विरुध्द

जन माहिती अधिकारी तथा सहा.अभियंता
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
५ वा मजला, गृहनिर्माण भवन,
बांद्रा (पू), मुंबई ४०० ०५१. **.... उत्तरवादी**

विवेचन

तक्रारदार श्री.विजय पांडे यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयेागाकडे दि.१०.१२.२००८ रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.१०.०२.२०१० रोजी सुनावणी आयेाजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता तक्रारदार हजर होते. गैरतक्रारदार हजर नव्हते. सुनावणीचेवेळी तक्रारदार यांचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच तक्रारीवरील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे अर्ज करून, प्राजक्ता एस.आर.ए. सहकारी गृहनिर्माण संस्था अंधेरी (पू) मुंबई येथील सदनिका क्र.१०१ च्या वाटपाबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. गैरतक्रारदाराने तक्रारदारास विहित कालावधीत मागणीप्रमाणे माहिती पुरविली नाही. म्हणनू तक्रारदाराने राज्य माहिती आयेागाकडे क्र.१७१/०२ ही तक्रार दाखल केली होती. तक्रारदारास सदर प्रकरणी ३० दिवसाचे आत माहिती पुरवावी असे आयेागाने दि.२५.०९.२००९ रोजी आदेश दिले होते. त्यानंतरही गैरतक्रारदाराने तक्रारदारास माहिती पुरविली नाही. यामुळे व्यथीत होउन तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे तक्रार दाखल केली.

उपजिल्हाधिकारी यांनी दि.०४.१०.२००९ च्या पत्रान्वये तक्रारदारास खरी माहिती न देता गोल गोल फिरविले आहे अशी तक्रारदाराची तक्रार आहे. श्री.शिवाराम भारव्दाज यांना झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडून पुनर्वसन इमारतीमधील अे बिल्डींगमध्ये १०१ ची सदनिका वाटप केली आहे. या प्रकरणी मी असे आदेश देतो की, सदर प्रकरणी श्री.एस.भारव्दाज यांनी सादर केलेल्या शपथपत्राची प्रत आणि पुरवणी परिशिष्ट-II ची प्र तक्रारदारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसाचे आत पुरवावी.

आदेश

तक्रार अंशतः मान्य करण्यांत येत आहे.

मुंबई
दिनांक १६.०२.२०१०

(रामानंद तिवारी)
राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई

राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.

तक्रार क्र.२०१०/६१८/०२

श्री.इ.ए.मेंडीस
१०७, निभाना पाली हिल,
बांद्रा, मुंबई ४०० ०५०. **.... तक्रारदार**

विरूध्द

जन माहिती अधिकारी तथा उप निबंधक
सहकारी संस्था, एच/पश्चिम वॉर्ड,
बांद्र, मुंबई ४०० ०५०. **.... उत्तरवादी**

विवेचन

तक्रारदार श्री.इ.ए.मेंडीस यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयेागाकडे दि.१०.१२.२००८ रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.१०.०२.२०१० रोजी सुनावणी आयेाजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता तक्रारदार हजर नव्हते. गैरतक्रारदार हजर होते. सुनावणीचेवेळी गैरतक्रारदार यांचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच तक्रारीवरील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे दि.०७.११.२००७ रोजी अर्ज करून, निमाना सहकारी गृहनिर्माण संस्था लि.नर्गीस दत्त रोड, बांद्रा (प) मुंबई या संस्थेने दि.२५.०३.१९९३ च्या विशेष सर्वसाधारण सभेमध्ये मंजूर केलेल्या ठरावानुसार करण्यात आलेल्या इमारत दुरूस्ती कामामध्ये तात्कालीन व्यवस्थापक समितीने वेळोवेळी अवलंबिलेल्या पध्दतीमुळे संस्थेचे आर्थिक नुकसान झाले किंवा कसे याबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. गैरतक्रारदाराने तक्रारदारास विहित कालावधीत माहिती पुरविली नाही. यामुळे तक्रारदाराने आयेागाकडे क्र.२००९/२८९३/०२ हे व्दितीय अपील दाखल केले होते. सदर प्रकरणी तक्रारदारास १५ दिवसाचे आत माहिती पुरवावी असे दि.२८.१०.२००९ रोजी आयोगाने आदेश पारित केले होते. त्यानंतरही गैरतक्रारदाराने तक्रारदारास माहिती पुरविली नाही. यामुळे व्यथीत होउन तक्रारदाराने राज्य माहिती आयेागाकडे तक्रार दाखल केली. श्री.मल्लेवार, सहाय्यक निबंधक सलग्न विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था,

मुंबई यांनी सादर केलेल्या अहवालाची अमंलबजावणी सुरू झाली असल्याचे गैरतक्रारदाराने सुनावणीचेवेळी प्रतिपादन केले. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

<u>आदेश</u>

तक्रार निकाली काढण्यांत येत आहे.

मुंबई
दिनांक १७.०२.२०१०

(रामानंद तिवारी)
राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई

राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.

तक्रार क्र.२०१०/५९५/०२

श्री.विजय त्र्यंबक गोखले
पार्वति निवास, सावरकर रोड,
डोंबिवली (पू) ४२१ २०१. **.... तक्रारदार**

विरुध्द

जन माहिती अधिकारी,
पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई
बृहन्मुंबई. **.... उत्तरवादी**

विवेचन

तक्रारदार श्री.विजय गोखले यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयेागाकडे दि.३१.०५.२००९ रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.०९.०२.२०१० रोजी सुनावणी आयेाजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता तक्रारदार हजर नव्हते. गैरतक्रारदार हजर होते. सुनावणीचेवेळी गैरतक्रारदार यांचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच तक्रारीवरील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे दि.२८.१२.२००८ रोजी अर्ज करून, राज्यातील पोलीसांना दिलेल्या बुलेटप्रुफ जॅकेटबाबत एकुण १३ मुद्यावर अनुषंगीक माहिती मागीतली होती. अपीलकाराने मागीतलेली माहिती पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई तसेच पेालीस आयुक्त, बृहन्मुंबई यांचेशी संबंधीत आहे. तक्रारदाराचा अर्ज त्यांचेकडे पाठविला आहे. पुढील पत्रव्यवहार त्यांचेकडे करावा असे गैरतक्रारदार तथा कक्ष अधिकारी, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई (श्री.सिध्दार्थ चौरे) यांनी तक्रारदारास दि.०३.०१.२००९ च्या पत्रान्वये कळविले. तक्रारदाराने मागीतलेली माहिती पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांचेशी संबंधीत असल्याने त्यांचेकडे पुढील पत्रव्यवहार करावा असे गैरतक्रारदार तथा उप सहाय्यक पोलीस महानिरीक्षक (र व का) पोलीस महासंचालकाकरिता यांनी तक्रारदारास दि.०७.०१.२००९ च्या पत्रान्वये कळविले. गैरतक्रारदाराने माहिती पुरविली नाही तर आवश्यक माहिती प्राप्त करून घेण्यासाठी प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे

प्रथम अपील दाखल करण्याची तक्रारदारास अधिनियमातील कलम १९ (१) अनुसार एक संधी आहे. परंतू सदर प्रकरणी गैरतक्रारदाराने प्रथम अपील दाखन न करता राज्य माहिती आयेागाकडे थेट व्दितीय अपील दाखल केले आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, तक्रारदाराने सदर प्रकरणी प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे प्रथम अपील दाखल करावे. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी ४५ दिवासाचे आत प्रथम अपीलावर सुनावणी आयेाजित करून आदेश पारित करावेत. यामुळे समाधान झाले नाही तर तक्रारदाराचा राज्य माहिती आयेागाकडे व्दितीय अपील दाखल करण्याचा हक्क अबाधीत राहील.

आदेश

तक्रार निकाली काढण्यांत येत आहे.

मुंबई
दिनांक १७.०२.२०१०

(रामानंद तिवारी)
राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई

राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.

तक्रार क्र.२०१०/५९४/०२

श्री.रमेशचंद्रण चंद्रण
७, उषा अपार्टमेंट, महंत रोड,
विलेपार्ले (पू), मुंबई ४०० ०५७. **.... तक्रारदार**

विरूध्द

जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (इ प्र)
बृहन्मुंबई महानगरपालिका,
उप मुख्य अभियंता यांचे कार्यालय,
पहिला मजला, आर.एल. पाटकर मार्ग,
बांद्रा (प), मुंबई ४०० ०५०. **.... उत्तरवादी**

विवेचन

तक्रारदार श्री.रमेशचंद्रण चंद्रण यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयेागाकडे दि.१९.०१.२०१० रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.०८.०२.२०१० रोजी सुनावणी आयेाजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता तक्रारदार हजर तसेच गैरतक्रारदार हजर होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच तक्रारीवरील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे अर्ज करून, प्लॉट क्र. ७ TPS II महंत रोड, विलेपार्ले (पू), मुंबई येथील मालमत्तेसंबंधीचे भोगवटा प्रमाणपत्र, आय.ओ.डी, सी.सी. आणि अंतीम मंजूरी नकाशाच्या प्रतीची मागणी केली होती. गैरतक्रारदाराने तक्रारदारास विहित कालावधीत माहिती पुरविली नाही. यामुळे व्यथीत होउन तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे क्र.२००९/३०५७/०२ हे व्दितीय अपील दाखल केले होते. सदर प्रकरणी तक्रारदारास ४५ दिवसाचे आत माहिती पुरवावी असे आयोगाने दि.१८.०८.२००९ रोजी आदेश पारित केले होते. त्यानंतरही तक्रारदारास माहिती पुरविली नाही. यामुळे व्यथीत होउन तक्रारदाराने राज्य माहिती आयेागाकडे तक्रार दाखल केली.

तक्रारीवरील सुनावणीचेवेळी गैरतक्रारदाराने लेखी अहवाल सादर करून खालीलप्रमाणे प्रतिपादन केले.

दि.१८.०८.२००९ रोजी राज्य माहिती आयोगासमोर झालेल्या सुनावणीनुसार तक्रारदारास उपलब्ध माहिती देण्याबाबत सांगितले होते. त्यानुसार कार्यालयीन पध्दतीनुसार दि.२१.०९.२००९ रोजी गहाळ फाईल उपलब्धतेसाठीचे परिपत्रक काढण्यात आले. तसेच उपलब्ध माहिती देण्याबाबत वास्तुविशारद श्री.ए.वाय.सबनीस, महानगरपालिकेची इतर कार्यालये, उदा.सहाय्यक अभियंता (जलकामे), के /पूर्व विभाग कार्यालय, के/पूर्व सहा.करनिर्धारक व संकलक, के/पूर्व यांना पत्राने कळविले आहे.

अद्यापर्यंत या कार्यालयाकडे, वर नमूद स्तोत्रांकडून कोणतीही माहिती उपलब्ध झालेली नाही. वास्तुविशारदांशी दूरध्वनीवरून संपर्क केला असता त्यांनी तक्रारदारास आवश्यक असलेली फाईल व कागदपत्रे त्यांच्याकडे उपलब्ध नसून त्यांनी ती कागदपत्रे तात्कालीन विकासकास दिल्याचे सांगितले.

गैरतक्रारदाराने केलेले प्रतिपादन लक्षात घेता असे दिसून येते की, तक्रारदाराने मागणी केलेल्या माहिती संबंधीची फाईल सापडली नाही. यामुळे तक्रारदारास मागणीप्रमाणे माहिती पुरविता आली नाही असे दिसते. सदर प्रकरणी गैरतक्रारदाराने आयेागाच्या आदेशानुसार विशेष मोहीम राबवून संबंधीत फाईल शोधण्याचा प्रयत्न केले असल्याचे दिसून येते. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

आदेश

तक्रार निकाली काढण्यांत येत आहे.

मुंबई
दिनांक १७.०२.२०१०

(रामानंद तिवारी)
राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई

राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.

तक्रार क्र.२०१०/४४०/०२

श्री. मच्छिंद्र करळकर
हजाराबाई हाउस, रूम नं.५,
इरला सोसा., विलेपार्ले (प),
मुंबई ४०० ०५६. **.... तक्रारदार**

विरूध्द

जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त
बृहन्मुंबई महानगरपालिका,
के/पश्चिम विभाग, अंधेरी (प),
मुंबई ४०० ०५८. **.... उत्तरवादी**

विवेचन

तक्रारदार श्री.मच्छिंद्र करळकर यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयेागाकडे दि.२२.१२.२००८ रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.०८.०२.२०१० रोजी सुनावणी आयेाजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता तक्रारदार हजर होते. गैरतक्रारदार हजर नव्हते. सुनावणीचेवेळी तक्रारदार यांचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच तक्रारीवरील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे दि.२४.०९.२००७ रोजी अर्ज करून, एस.व्ही.रोड, कांदिवली, मुंबई येथील डीलीकॅशी हॉटेल, शुध्द शाकाहारीच्या मालकाने नियमानुसार जी जागा मोकळी ठेवणे आवश्यक आहे. त्याजागेत अवैद्यरित्या बांधकाम केलेल्या भिंतीबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. गैरतक्रारदाराने सदर प्रकरणी तक्रारदारास विहित कालावधीत माहिती पुरविली नसल्याने तक्रारदाराने क्र.२००८/९८३/०२ हे व्दितीय अपील राज्य माहिती आयेागाकडे दाखल केले होते. गैरतक्रारदाराने अवैद्यबांधकामाबाबत तपासणी करून खात्री करून द्यावी. त्यावर योग्यती कारवाई करावी. त्यानंतर गैरतक्रारदाराने तक्रारदारास माहिती पुरवावी असे आयेागाने दि.१०.१०.२००८ रोजी आदेश पारित केले. राज्य माहिती आयेागाच्या दि.१०.१०.२००८

च्या आदेशाचे तक्रारदाराने पालन केले नाही. तक्रारदारास माहिती पुरविली नाही. यासाठी तक्रारदारास जाबाबदार धरून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम २० अनुसार गैरतक्रारदाराविरूध्द शास्ती लादण्याची कारवाई का? सुरू करू नये याबाबत हे आदेश प्राप्त झाल्यापासून ४ आठवडयाचे आत आयेागाकडे प्रत्यक्ष भेटून लेखी खुलासा सादर करावा. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

आदेश

तक्रार मान्य करण्यांत येत आहे.

मुंबई
दिनांक १७.०२.२०१०

(रामानंद तिवारी)
राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई

राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.

तक्रार क्र.२०१०/५९०/०२

श्रीमती.सायराबानो अन्वर शेख व इतर
रूम नं.९२, मरी अम्मा नगर,
डॉ.ए.बी.मार्ग, वरळी,
मुंबई ४०० ०१८. **.... तक्रारदार**

विरूध्द

जन माहिती अधिकारी तथा कॉलनी अधिकारी
बृहन्मुंबई महानगरपालिका,
जी/दक्षिण विभाग, न.म.जोशी मार्ग,
परेल, मुंबई ४०० ०१३. **.... उत्तरवादी**

विवेचन

तक्रारदार श्रीमती. सायराबानो अन्वर शेख व इतर यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयेागाकडे दि.३०.१०.२००९ रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.०८.०२.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता तक्रारदार तसेच गैरतक्रारदार हजर होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच तक्रारीवरील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे दि.२१.०२.२००९ रोजी अर्ज करून, शासनाच्या गृहनिर्माण योजनेमध्ये सदनिका वाटपाच्या पात्र व्यक्तीच्या यादीत तक्रारदाराच्या नावाचा समावेश करावा अशी मागणी केली होती. गैरतक्रारदाराने तक्रारदारास माहिती पुरविली नाही. यामुळे तक्रारदाराने राज्य माहिती आयेागाकडे क्र.२००९/३१०९/०२ हे व्दितीय अपील दाखल केले होते. तक्रारदाराच्या दि.२१.०२.२००९ च्या अर्जावर केलेल्या कार्यवाहीची माहिती ३० दिवसाचे आत तक्रारदारास पुरवावी असे आयोगाने दि.३१.०८.२००९ रोजी आदेश पारित केले होते.

त्यानंतरही गैरतक्रारदाराने माहिती पुरविली नसल्याच्या कारणावरून तक्रारदाराने राज्य माहिती आयेागाकडे तक्रार दाखल केली.

तक्रारीवरील सुनावणीचेवेळी गैरतक्रारदाराने असे प्रतिपादन केले की, तक्रारदारास आयेागाच्या आदेशानुसार दि.०६.०२.२०१० च्या पत्रान्वये सदर प्रकरणी सद्यस्थितीबाबत सविस्तर माहिती खालीलप्रमाणे कळविली आहे.

मरिअम्मा नगर सह.गृह.नि.संस्थेच्या परिशिष्ट-II मध्ये तक्रारदाराच्या नावाची नोंद करण्याबाबतचा तक्रारदाराचा दि.२१.०२.२००९ रोजीचा अर्ज कार्यालयात प्राप्त झालेला आहे. तकारदाराच्या अर्जाची छाननी करताना असे निदर्शनास आले की, मरिअम्मा नगर सह.गृह.नि.संस्थेच्या परिशिष्ट-II मध्ये तक्रारदाराचे नाव अंतर्भुत नाही. परिशिष्ट-II मध्ये समाविष्ट नसलेल्या झोपडीधारकांची नावे पुरवणी परिशिष्ट-II व्दारे नव्याने समाविष्ट करण्याबाबतचा प्रस्ताव उपजिल्हाधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांचे मार्फत दि.०६.०९.२००८ रोजीच्या पत्राव्दारे कार्यालयास प्राप्त झाला आहे. सदर प्रस्तावाची छाननी सुरू आहे. सदर प्रस्तावासोबत वास्तूविशारद यांनी तयार केलेला झोपडीस्थित नकाशा प्राप्त झाला असून त्यामध्ये तक्रारदाराची झोपडी क्र.८४७ वर दर्शविण्यात आली आहे. त्यानुसार तक्रारदाराच्या झोपडीचे सर्वेक्षणही करण्यात आले आहे. परंतु पुरवणी परिशिष्ट-II अंतिम स्वरूपात तयार झालेले नसल्यामुळे पात्रतेबाबतचा निर्णय घेण्यात आलेला नाही. तरी शासनाच्या प्रचलित धोरणानुसार व नियमानुसार तक्रारदाराचा पात्रतेबाबतचा निर्णय सक्षम प्राधिकारी म्हणून सहाय्यक आयुक्त, जी/दक्षिण हे परिशिष्ट-II मध्ये घेतील व त्याचप्रमाणे झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण व गृहनिर्माण संस्था यांना कळविण्यात येईल असे तक्रारदारास गैरतक्रारदाराने कळविले असल्याचे गैरतक्रारदाराने आयोगासमोर प्रतिपादन केले.

यावरून पुरवणी परिशिष्ट-II अद्याप तयार नाही. पुरवठी परिशिष्ट-II तयार केल्यानंतर तक्रारदारास माहिती पुरवावी. सदर प्रकरणी आयोगाच्या आदेशाचे पालन गैरतक्रारदाराने केले आहे. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

आदेश

तक्रार निकाली काढण्यांत येत आहे.

मुंबई
दिनांक १७.०२.२०१०

(रामानंद तिवारी)
राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई

राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.

तक्रार क्र.२०१०/४६८/०२

श्री.प्रकाश गो.नवाथे
दलुचंद को.हौ.सो.लि.,
२०४/ राजबाग, भालचंद्र मार्ग,
माटुंगा, मुंबई ४०० ०१९. **.... तक्रारदार**

विरूध्द

जन माहिती अधिकारी तथा सहा.अभियंता (इ व का)
बृहन्मुंबई महानगरपालिका,
एफ/उत्तर विभाग कार्यालय,
९६, भाउ दाजी मार्ग, माटुंगा,
मुंबई ४०० ०१९. **.... उत्तरवादी**

विवेचन

तक्रारदार श्री.प्रकाश नवाथे यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयेागाकडे दि.१२.१०.२००९ रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.०८.०२.२०१० रोजी सुनावणी आयेाजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता तक्रारदार तसेच गैरतक्रारदार हजर होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच तक्रारीवरील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे दि.२७.११.२००७ रोजी अर्ज करून, राजबागमधील बेसमेंट कारपार्कींग आणि बिल्डींग कंम्पलीशन प्रमाणपत्राबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. सदर प्रकरणी गैरतक्रारदाराने तक्रारदारास विहित कालावधीत माहिती पुरविली नसल्याने राज्य माहिती आयेागाकडे क्र.२००८/१३४५/०२ व क्र.२००९/३६९७/०२ ही व्दितीय अपीले दाखल केली होती. तक्रारदारास १५ दिवसाचे आत माहिती पुरवावी असे आयेागाने दि.१९.१२.२००८ व दि.२७.०२.२००९ रोजी आदेश पारित केले होते. त्यानंतरही आवश्यक माहिती मिळाली नसल्याच्या कारणावरून तक्रारदाराने राज्य माहिती आयेागाकडे तक्रार दाखल केली.

या परिस्थितीत सदर प्रकरणी मी असे आदेश देतो की, गैरतक्रारदाराने हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसाचे आत तक्रारदारास अद्यावत माहिती पुरवावी.

<u>आदेश</u>

तक्रार मान्य करण्यांत येत आहे.

मुंबई
दिनांक १७.०२.२०१०

(रामानंद तिवारी)
राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई

राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.

तक्रार क्र.२०१०/५३१/०२

श्री. कमलाकर शेणॉय
२/१३, आदिनाथ हौ.सो.,
माझगांव, मुंबई ४०० ०१०. **.... तक्रारदार**

विरूध्द

जन माहिती अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
५ वा मजला, गृहनिर्माण भवन,
बांद्रा (पू), मुंबई ४०० ०५१. **.... उत्तरवादी**

विवेचन

तक्रारदार श्री.कमलाकर शेणॉय यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयेागाकडे दि.१६.०३.२००९ रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.०२.०२.२०१० रोजी सुनावणी आयेाजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता तक्रारदार हजर होते. गैरतक्रारदार हजर नव्हते. सुनावणीचेवेळी तक्रारदार यांचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच तक्रारीवरील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे दि.२७.११.२००७ रोजी अर्ज करून, शिवालीक व्हेन्चरने सादर केलेल्या प्रस्तावांच्या तारखा, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या योजनेबाबत शिवालीक व्हेंन्चरने केलेल्या कारवाईची माहिती इत्यादी अनुषंगीक एकूण २९ मुद्याबाबत माहिती मागीतली. गैरतक्रारदाराने / प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी माहिती पुरविली नसल्याने तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे तक्रार दाखल केली.

सदर प्रकरणी गैरतक्रारदाराने तक्रारदारास विहित कालावधीत माहिती पुरविली नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, गैरतक्रारदाराने सदर प्रकरणी तक्रारदारास हे आदेश प्राप्त झ ाल्यापासून १५ दिवसाचे आत माहिती पुरवावी.

गैरतक्रारदाराने सदर प्रकरणी तक्रारदारास विहित कालावधीत माहिती पुरविली नाही. यामुळे उक्त अधिनियमातील कलम ७ चा भंग झाला आहे. यासाठी गैरतक्रारदारास जबाबदार धरून त्यांच्या विरूध्द माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम २० अनुसार शास्ती लादण्याची कारवाई का? सुरू करू नये याबाबत गैरतक्रारदाराने १५ दिवसाचे आत आयेागाकडे प्रत्यक्ष भेटून लेखी खुलासा सादर करावा.

आदेश

तक्रार मान्य करण्यांत येत आहे.

मुंबई
दिनांक १७.०२.२०१०

(रामानंद तिवारी)
राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई

राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.

तक्रार क्र.२०१०/४३८/०२

श्री. साईप्रिया नामदेव मलिक
११/५५३, सरदार नगर नंबर-१,
सरदार नगर प्राजंल को.ऑ.हौ.सो.लि.,
सायन कोळीवाडा, मुंबई ४०० ०२२. **.... तक्रारदार**

विरूध्द

जन माहिती अधिकारी तथा उप निबंधक (सहकारी संस्था)
गृह निर्माण भवन, रूम नं.३६९,
२ रा मजला, बांद्रा (पू), मुंबई ४०० ०५१.

जन माहिती अधिकारी तथा प्राधिकृत अधिकारी
गृह निर्माण भवन, रूम नं.३६९,
२ रा मजला, बांद्रा (पू), मुंबई ४०० ०५१. **.... उत्तरवादी**

विवेचन

तक्रारदार श्री.साईप्रिया मलिक यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयेागाकडे दि.०२.०१.२०१० रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.०३.०२.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता तक्रारदार तसेच गैरतक्रारदार हजर होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच तक्रारीवरील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे अर्ज करून, म्हाडाच्या सरदार नगर क्र.१ मधील इमारत क्र.११, सरदार नगर, प्रांजल सहकारी गृहनिर्माण संस्था, सायन कोळीवाडा या संस्थेची अनुषंगीक माहिती मागीतली होती. गैरतक्रारदार तथा उप निबंधक, सहकारी संस्था आणि प्राधिकृत अधिकारी, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळ, मुंबई यांनी तक्रारदारास विहिती कालावधीत माहिती पुरविली नाही. याबाबत तक्रारदाराकडून लेखी खुलासा मागविण्यात आला

होता. गैरतक्रारदाराने आयोगास खुलासा सादर केला नाही. माहिती मिळाली नसल्याच्या कारणावरून तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे तक्रार दाखल केली.

तक्रारदाराने, प्राजंल सहकारी गृहनिर्माण संस्थेबाबत तक्रार केली आहे. सदर प्रकरणी चौकशी करून अहवाल सादर करण्याकरिता उपनिबंधक, सहकारी संस्था यांनी एक विशेष अधिका-याची नेमणूक केली. सदर विशेष अधिका-यांनी आद्याप काही कार्यवाही केलेली नाही. सदर अधिका-याविरूध्द खातेनिहाय चौकशी प्रस्तावित करण्यात आली आहे असे गैरतक्रारदाराने आयेागासमोर प्रतिपादन केले. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, तक्रारदाराने संस्थेविरूध्द केलेल्या तक्रारीची चौकशी करण्याकरिता अन्य अधिका-याची नेमणूक करावी व तक्रारीनुसार संस्थेची चौकशी करून अहवाल प्राप्त करावा. त्यानंतर तक्रारदारास माहिती पुरवावी.

<u>आदेश</u>

तक्रार मान्य करण्यांत येत आहे.

मुंबई **(रामानंद तिवारी)**
दिनांक १७.०२.२०१० **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.

तक्रार क्र.२०१०/५९१/०२

श्री. सुरेश बलदेव रहेजा
१६, शालीमार इमारत,
९१, मरीन ड्रायव,
मुंबई ४०० ००२. **.... तक्रारदार**

विरूध्द

जन माहिती अधिकारी,
सहकारी संस्था, सी विभाग, मुंबई,
मल्होत्रा हाउस, ६ वा मजला,
जी.पी.ओ समोर, फोर्ट,
मुंबई ४०० ००१. **.... उत्तरवादी**

विवेचन

तक्रारदार श्री.सुरेश रहेजा यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयेागाकडे दि.०८.१२.२००९ रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.०८.०२.२०१० रोजी सुनावणी आयेाजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता तक्रारदार तसेच गैरतक्रारदार हजर होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच तक्रारीवरील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे दि.०१.०९.२००८ रोजी अर्ज करून, अखील भारतीलय सहकारी गृहनिर्माण संस्था लि. यांनी दि.१५.०८.२००१ पासून संस्थेच्या Bye-laws मध्ये मान्यतेने दुरूस्ती केली याबाबत तसेच संस्थेच्या व्यवस्थापकीय समितीच्या बैठकीचे इतिवृत्त इत्यादी अनुषंगीक माहिती मागीतली हेाती. सदर प्रकरणी गैरतक्रारदाराने काही माहिती पुरविली. उर्वरित माहिती महत्वाची असल्याने संस्थेने सदस्यांना माहिती पुरविणे बांधील आहे. म्हणून अपीलकारास ३० दिवसाचे आत माहिती पुरवावी असे आयेागाने क्र.२००९/२२८४/०२ हया व्दितीय अपीलावर दि.२७.०४.२००९ रेाजी आदेश पारित केले. त्यानंतर माहिती मिळाली नसल्याच्या कारणावरून तक्रारदाराने राज्य माहिती आयेागाकडे तक्रार दाखल केली.

तक्रारीवरील सुनावणीकरिता गैरतक्रारदार तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, सी.विभाग, मुंबई श्री.आर.के.भास्कर हे हजर होते. तक्रारदारास मागणीप्रमाणे माहिती पुरविण्यात आली असल्याचे गैरतक्रारदाराने आयेागासमोर प्रतिपादन केले. यावरून सदर प्रकरणी आयेागाच्या दि.२७.०४.२००९ च्या आदेशाचे पालन केले असल्याचे दिसून येते. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

आदेश

तक्रार निकाली काढण्यांत येत आहे.

मुंबई
दिनांक १७.०२.२०१०

(रामानंद तिवारी)
राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई

राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.

तक्रार क्र.२०१०/५३८/०२

श्री. झफार हुसेन सय्यद
नंदादिप, बी/१, एन.जी.आचार्य रोड,
खारदेव नगर, चेंबूर,
मुंबई ४०० ०७१. **.... तक्रारदार**

विरूध्द

जन माहिती अधिकारी तथा मुख्य लेखापाल
बृहन्मुंबई महानगरपालिका मुख्यालय,
जुने इमारत, पहिला मजला,
महापालिका मार्ग, फोर्ट,
मुंबई ४०० ००१. **.... उत्तरवादी**

विवेचन

तक्रारदार श्री.झफार हूसेन सय्यद यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयेागाकडे दि.०१.०५.२००९ रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.०२.०२.२०१० रोजी सुनावणी आयेाजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता तक्रारदार हजर नव्हते. गैरतक्रारदार हजर होते. सुनावणीचेवेळी गैरतक्रारदार यांचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच तक्रारीवरील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे दि.२७.०१.२००९ रोजी अर्ज करून, वैद्यकीय प्रमाणपत्र मिळण्याबाबत मागणी केली होती. सवलतीच्या दरात महानगरपालिकेच्या दवाख्रान्यात वैद्यकीय सेवा मिळण्याकरिता ओळख्रपत्राची तक्रारदाराने मागणी केली होती. गैरतक्रारदाराने तक्रारदारास मागणीनुसार ओळख्रपत्र दिले नसल्याने राज्य माहिती आयेागाकडे तक्रार दाखल केली.

मुंबई महानगरपालिकेच्या दवाख्रान्यात सवलतीच्या दराने वैद्यकीय सेवा महानगरपालिकेतील सेवेत असलेल्या कर्मचा-यांना अनुज्ञेय आहेत. सेवानिवृत्त कर्मचा-यांना मुंबई महानगरपालिकेच्या दवाख्रान्यात सवलतीच्या दराने वैद्यकीय सेवा पुरविण्यासाठी ओळख्रपत्र देण्यात

येत अनुज्ञेय नाही असे गैरतक्रारदाराने आयेागासमोर तक्रारीवरील सुनावणीचेवेळी प्रतिपादन केले. मुंबई महानगरपालिकेतून सेवानिवृत्त झालेल्या कर्मचा-यांना निवृत्तीवेतन पुस्तिकेच्या आधारे स्वत: कर्मचारी आणि कर्मचा-याच्या पत्नीला वैद्यकीय सेवांचा लाभ घेता येईल असे ही गैरतक्रारदाराने आयेागासमोर प्रतिपादन केले. तसेच सदर माहिती तक्रारदारास दि.२८.०४.२००९ च्या पत्रान्वये पुरविली असल्याचे सदर पत्राची प्रत आयेागास सादर करून प्रतिपादन केले. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

आदेश

तक्रार निकाली काढण्यांत येत आहे.

मुंबई
दिनांक १७.०२.२०१०

(रामानंद तिवारी)
राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई

राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.

तक्रार क्र.२०१०/४८५/०२

श्री. अन्वर बागबान
बी/२/४०२, अबावाटीका
NIMB रोड, कोंडवा,
पुणे ४११ ०४८. **.... तक्रारदार**

विरूध्द

जन माहिती अधिकारी,
धर्मादाय आयुक्त
डॉ.ॲनी बेझंट मार्ग,
वरळी, मुंबई ४०० ०१८. **.... उत्तरवादी**

विवेचन

तक्रारदार श्री.अन्वर बागवान यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयेागाकडे दि.१०.११.२००९ रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.०८.०२.२०१० रोजी सुनावणी आयेाजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता तक्रारदार तसेच गैरतक्रारदार हजर होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच तक्रारीवरील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे दि.०९.०७.२००७ रोजी अर्ज करून, मलबारहील, मुंबई येथील करिमभाई इब्राहिम खोजा अनाथालयाच्या बाय-लॉजची प्रत व इतर अनुषंगीक एकूण ११ मुद्याबाबत माहिती मागीतली होती. गैरतक्रारदाराने मागणीप्रमाणे माहिती पुरविली नसल्याने तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे क्र.२००९/२१८/०२ ही तक्रार दाखल केली होती. तक्रारदारास सदर प्रकरणी ३० दिवसाचे आत माहिती पुरवावी असे आयेागाने दि.१६.०६.२००९ रोजी आदेश पारित केले होते. आयेागाच्या सदर आदेशानुसार संस्थेने तक्रारदारास संबंधीत कागदपत्र निरीक्षणाकरिता उपलब्ध करून दिली. तक्रारदाराने संबंधीत

कागदपत्राचे निरीक्षण केले. तक्रारदारास हव्या असलेल्या कागदपत्राच्या प्रती आढळून आल्या नाहीत. यामुळे व्यथीत होउन तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे तक्रार दाखल केली.

संस्थेची मालमत्ता हस्तांतरित करण्यास ना-हरकत प्रमाणपत्र दिल्या संबंधीची कागदपत्र तक्रारदारास हवी आहेत. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, गैरतक्रारदाराने हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसाचे आत तक्रारदारास हव्या असलेल्या कागदपत्राच्या छायाप्रती पुरवाव्यात.

आदेश

तक्रार मान्य करण्यांत येत आहे.

मुंबई
दिनांक १७.०२.२०१०

(रामानंद तिवारी)
राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई

राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.

तक्रार क्र.२०१०/३९८/०२

श्री. हरीबा महादेव चोपडे
सावित्रिबाई माळीव चाळ,
परिघवाडी वसाहत,
एल.बी.एस.मार्ग, सुधाकर स्टोअर्स मागे,
कुर्ला (प), मुंबई ४०० ०७०. **.... तक्रारदार**

विरुध्द

जन माहिती अधिकारी तथा सहा.पोलीस आयुक्त
झोन-३, सेंट्रल कंट्रोल डेस्क,
पोलीस उपायुक्त यांचे कार्यालय,
बावला कंम्पाउंड, डॉ.बी.ए.रोड,
भायखळा (पू), मुंबई. **.... उत्तरवादी**

विवेचन

तक्रारदार श्री.हरीबा चोपडे यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयेागाकडे दि.०१.०६.२००९ रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.०८.०२.२०१० रोजी सुनावणी आयेाजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता तक्रारदार हजर होते. गैरतक्रारदार पुन्हा हजर नव्हते. सुनावणीचेवेळी तक्रारदार यांचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच तक्रारीवरील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे अर्ज करून, दि.०८.०७२००८ रोजी केलेल्या तक्रारीवरील कारवाईची माहिती मागीतली होती. गैरतक्रारदाराने मागणीप्रमाणे आवश्यकती माहिती विहित कालावधीत तक्रारदारास पुरविली नाही. यामुळे व्यथीत होउन तक्रारदाराने राज्य माहिती आयेागाकडे क्र.२००८/२४०१/०२ हे व्दितीय अपील दाखल केले होते. पोलीसांनी नोंदविलेल्या तक्रारदाराच्या विवरणपत्राच्या (Statement) प्रती पोलीसांना तक्रारदाराने दिल्या असल्याची बाब तक्रारदाराने आयोगासमोर प्रतिपादन केले होते. गैरतक्रारदार व्दितीय अपीलावरील सुनावणीकरिता हजर नव्हते. तक्रारदारास त्यांच्या दि.०८.०७.२००८ च्या तक्रारीवरील

कारवाईची माहिती ३० दिवसाचे आत पुरवावी असे आयेागाने दि.२३.०४.२००९ रोजी आदेश पारित केले होते. त्यानंतरही गैरतक्रारदारांनी तक्रारदारास माहिती पुरविली नाही. यामुळे व्यथीत होउन तक्रारदाराने राज्य माहिती आयेागाकडे तक्रार दाखल केली.

सदर प्रकरणी गैरतक्रारदाराने राज्य माहिती आयेागाच्या दि.२३.०४.२००९ च्या आदेशाचे पालन केले नाही. तक्रारदारास विहित कालावधीत माहिती पुरविली नाही यामुळे उक्त अधिनियमातील कलम ७ चा भंग झाला आहे. याकरिता गैरतक्रारदारास जबाबदार धरून त्यांच्या विरूध्द माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम २० अनुसार शास्ती लादण्याची कारवाई का? सुरू करू नये याबाबत हे आदेश प्राप्त झाल्यापासून ४ आठवडयाचे आत आयेागाकडे लेखी खुलासा प्रत्यक्ष भेटून सादर करावा. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

आदेश

तक्रार मान्य करण्यांत येत आहे.

मुंबई
दिनांक १७.०२.२०१०

(रामानंद तिवारी)
राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई

राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.

तक्रार क्र.२०१०/४५४/०२

श्री. अरूण वसंत कोंडविलकर
लक्ष्मी कॉटेज, रूम नं.८३,
अ पूर्व, २ रा मजला, डॉ.आंबेडकर रोड,
परेल (पू), मुंबई ४०० ०१२. **.... तक्रारदार**

विरूध्द

जन माहिती अधिकारी तथा वसाहत अधिकारी
बृहन्मुंबई महानगरपालिका, जी/उत्तर विभाग,
हरीषचंद्र येलवे मार्ग, दादर (पू), मुंबई ४०० ०२८.

जन माहिती अधिकारी,
यांत्रिकी विभाग,
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण
५ वा मजला, गृहनिर्माण भवन,
वांद्रे (पू), मुंबई ४०० ०५१.

जन माहिती अधिकारी तथा उप जिल्हाधिकारी
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण
५ वा मजला, गृहनिर्माण भवन,
वांद्रे (पू), मुंबई ४०० ०५१. **.... उत्तरवादी**

विवेचन

तक्रारदार श्री.अरूण कोंडविलकर यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयेागाकडे दि.०२.०३.२००९ रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.०८.०२.२०१० रोजी सुनावणी आयेाजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता तक्रारदार तसेच गैरतक्रारदार हजर होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच तक्रारीवरील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे दि.३१.०५.२००७ रोजी अर्ज करून, सहाय्यक आयुक्त, जी/उत्तर विभागाने तयार केलेल्या निवासी-अनिवासी गाळेधारकांनी परिशिष्ट I,

II, III तयार केले सदर परिशिष्टाची छायाप्रतीची मागणी केली होती. गैरतक्रारदाराने तक्रारदारास माहिती विहित कालावधीत पुरविली नाही. यामुळे व्यथीत होउन तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे क्र.२००८/९१९/०२ हे व्दितीय अपील दाखल केले होते. तक्रारदारास सुधारित केलेल्या परिशिष्ट-II ची छायाप्रत पुरवावी असे दि.३०.०९.२००८ रोजी आदेश पारित केले. त्यानंतरही गैरतक्रारदाराने तक्रारदारास माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होउन तक्रारदाराने राज्य माहिती आयेागाकडे तक्रार दाखल केली.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर नगर (एस.आर.ए) गृहनिर्माण संबंधी सदर एस.आर.ए.योजनेतंर्गत जिल्हाधिका-यांनी झोपडपट्टीचे पुर्नसर्वेक्षण करण्यास सांगीतले आहे. सदरच्या गृहनिर्माण संस्थेचे मुख्य प्रवर्तक / विकासक संस्थेतील संबंधीत झोपडीधारक / सभासद हयांचे कागदोपत्री पुरावे उपलब्ध करण्याबाबतही जिल्हाधिका-यांनी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणास सांगीतले आहे. पुर्नसर्वेक्षण झाल्यानंतर तक्रारदारास माहिती पुरविण्यात येईल असे गैरतक्रारदाराने तक्रारदारास कळविले आहे. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

आदेश

तक्रार निकाली करण्यांत येत आहे.

मुंबई
दिनांक १७.०२.२०१०

(रामानंद तिवारी)
राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई

राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.

तक्रार क्र.२०१०/५९२/०२

श्री.भाग्यवान आनंदा पवार
२/८, जुनी बैठी चाळ, हाफकिन परिसर,
डॉ.अर्नेस्ट बोर्जेस रोड, परळ,
मुंबई ४०० ०१२. **.... तक्रारदार**

विरूध्द

जन माहिती अधिकारी,
हाफकिन बार्ड,
आर्चाय दोंडे मार्ग,
परल, मुंबई ४०० ०१२. **.... उत्तरवादी**

विवेचन

तक्रारदार श्री.भाग्यवान पावर यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयेागाकडे दि.०३.१०.२००९ रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.०८.०२.२०१० रोजी सुनावणी आयेाजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता तक्रारदार हजर होते. गैरतक्रारदार हजर नव्हते. सुनावणीचेवेळी तक्रारदार यांचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच तक्रारीवरील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे अर्ज करून, गट क आणि गट ड मधील मंजूर पदे, गट क व गट ड मधील कर्मचा-यांची जेष्ठता यादी किती कर्मचा-यांना प्रयोगशाळा सहाय्यक, प्रयोगशाळा परिचर, कनिष्ठ तांत्रिक सहाय्यक इत्यादी अनुषंगीक माहिती मागीतली होती. गैरतक्रारदाराने तक्रारदारास मागणीप्रमाणे माहिती पुरविली नसल्याने व्यथीत होउन तक्रारदाराने राज्य माहिती आयेागाकडे क्र.२००९/३००१/०२ हे व्दितीय अपील दाखल केले होते. तक्रारदारास सदर प्रकरणी ३० दिवसाचे आत माहिती पुरवावी असे आयोगाने दि.०७.०८.२००९ रोजी आदेश पारित केले होते.

राज्य माहिती आयोगाच्या दि.०७.०८.२००९ च्या आदेशानुसार गैरतक्रारदाराने तक्रारदारास दि.१७.०९.२००९ च्या पत्रानुसार अपीलकारास माहिती पुरविली असल्याचे तक्रारीतील कादपत्रावरून दिसून येते. सदर माहितीने तक्रारदाराचे समाधान झाले नसल्याचे तक्रारदाराने तक्रारीवरील सुनावणीचेवेळी प्रतिपादन केले. सदर प्रकरणी गैरतक्रारदाराने तक्रारदारास माहिती पुरवून आयोगाच्या आदेशाचे पालन केले असल्याने मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

आदेश

तक्रार निकाली करण्यांत येत आहे.

मुंबई
दिनांक १८.०२.२०१०

(रामानंद तिवारी)
राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई

राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.

तक्रार क्र.२०१०/५७८/०२

श्री.शेख नसिबुल्ला
रूम नं.१, मजार चाळ,
हरी मस्जिद, घाडूप देव,
मोदी परिसर, मुंबई ४०० ०१०. **.... तक्रारदार**

विरूध्द

जन माहिती अधिकारी,
जिल्हाधिकारी व जिल्हाधिकारी कार्यालय,
मुंबई शहर, जुने जकार घर,
शहीद भगतसिंग मार्ग,
फोर्ट, मुंबई. **.... उत्तरवादी**

विवेचन

तक्रारदार श्री.शेख नसिबुल्ला यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयेागाकडे दि.२९.१२.२००९ रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.०५.०२.२०१० रोजी सुनावणी आयेाजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता तक्रारदार तसेच गैरतक्रारदार हजर होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच तक्रारीवरील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे दि.२५.०६.२००९ रोजी अर्ज करून, इतर मागास वर्गाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. गैतक्रारदाराने तक्रारदारास विहित कालावधीत माहिती पुरविली नाही. यामुळे व्यथीत होउन तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे क्र.२००९/३४४७/०२ हे व्दितीय अपील दाखल केले होते. सदर प्रकरणी तक्रारदारास १५ दिवसाचे आत माहिती पुरवावी असे आयेागाने दि.३१.०१.२००९ रोजी आदेश पारित केले होते. त्यानंतरही गैरतक्रारदाराने, तक्रारदारास माहिती पुरविली नसल्याने व्यथीत होउन राज्य माहिती आयोगाकडे तक्रार दाखल केली.

तक्रारदारास इतर मागास वर्गाचे "धुनिया" जातीचे प्रमाणपत्र हवे आहे. इतर राज्यातील इतर मागासवर्ग जातीप्रमाणपत्र तक्रारदाराने धारण केले आहे. तक्रारदाराच्या महाराष्ट्रात जन्म झालेल्या मुला / मुलीस महाराष्ट्रात इतर मागासवर्गाचे जाती प्रमाणपत्र मिळण्यास पात्र आहेत का इत्यादी तक्रारदारास माहिती हवी आहे. सदर प्रकरणी तक्रारदारास इतर मागास वर्गाचे प्रमाणपत्र मिळण्याची मागणी करता येणार नाही. त्यांना इतर मागासवर्गाचे प्रमाणपत्र देता येणार नाही असे गैरतक्रारदार तथा करमणूक कर अधिकारी श्री.रमेश हुबवे यांनी तक्रारीवरील सुनावणीचेवेळी प्रतीपादन केले. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, गैरतक्रारदारांनी सदर प्रकरणी हे आदेश प्राप्त झाल्यापासून एका आठवडयाचे आत वस्तुस्थितीवर आधारित तक्रारदारास माहिती पुरवावी.

आदेश

तक्रार मान्य करण्यांत येत आहे.

मुंबई
दिनांक १८.०२.२०१०

(रामानंद तिवारी)
राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई

राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.

तक्रार क्र.२०१०/४४७/०२

श्रीमती.शुभा राजन देसाई
२ बी /१३, इंडियन एअर लाईन्स स्टाफ कॉलनी नं.२,
AI गेट नं.१ विरुध्द,
जुने एअरपोर्ट, कालिना,
सांताक्रुझ (प), मुंबई ४०० ०२९. **.... तक्रारदार**

विरुध्द

जन माहिती अधिकारी तथा उप निबंधक
सहाकारी संस्था, म्हाडा,
गृहनिर्माण भवन, बांद्रा,
मुंबई ४०० ०५१. **.... उत्तरवादी**

विवेचन

तक्रारदार श्रीमती. शुभा देसाई यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयेागाकडे दि.२८.०५.२००९ रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.०८.०२.२०१० रोजी सुनावणी आयेाजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता तक्रारदार तसेच गैरतक्रारदार हजर होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच तक्रारीवरील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे अर्ज करून, वरसोवा ऐश्वर्या सहाकारी संस्था लि., कालिना कुर्ला रोड, मुंबई या संस्थेच्या व्यवस्थापकीय समितीच्या सदस्यांना एम-२० बंधपत्र सादर करण्याची अमंलबजावणी केली नसल्याबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. गैरतक्रारदाराने तक्रारदारास विहित कालावधीत माहिती पुरविली नाही. यामुळे व्यथीत होउन तक्रारदाराने क्र.२००९/२३३१/०२ हे व्दितीय अपील राज्य माहिती आयेागाकडे दाखल केले होते. सदर प्रकरणी तक्रारदारास १५ दिवसाचे आत माहिती पुरवावी असे आयोगाने दि.२०.०४.२००९ रोजी आदेश पारित केले. त्यानंतरही तक्रारदारास गैरतक्रारदाराने मागणीप्रमाणे माहिती पुरविली नाही. यामुळे तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे तक्रार दाखल केली.

सदर प्रकरणी गैरतक्रारदाराने राज्य माहिती आयोगाच्या दि.२०.०४.२००९ च्या आदेशाचे पालन केले नाही. तक्रारदारास माहिती पुरविली नाही. यामुळे उक्त अधिनियमातील कलम ७ चा गैरतक्रारदाराने भंग केला आहे. याकरिता गैरतक्रारदार तथा उप निबंधक, सहाकारी संस्था म्हाडा गृहनिर्माण भवन, बांद्रा, मुंबई यांना जबाबदार धरून त्यांच्याविरूध्द माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम २० अनुसार शास्ती लादण्याची कारवाई का? सुरू करू नये याबाबत हे आदेश प्राप्त झाल्यापासून ४ आठवडयाचे आत गैरतक्रारदाराने लेखी खुलासा सादर करावा. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

आदेश

तक्रार मान्य करण्यांत येत आहे.

मुंबई
दिनांक १८.०२.२०१०

(रामानंद तिवारी)
राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई

राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.

तक्रार क्र.२०१०/४७६/०२

श्री.विजय हरिदज तांदळे
बी-६०२ संस्कार गणेश पेठ लेन,
दादर (प), मुंबई ४०० ०२८. **.... तक्रारदार**

विरूध्द

जन माहिती अधिकारी तथा सहा.निबंधक
बृहन्मुंबई महानगरपालिका,
जी/उत्तर विभाग, दादर (प),
मुंबई ४०० ०२८. **.... उत्तरवादी**

विवेचन

तक्रारदार श्री.विजय तांदळे यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयेागाकडे दि.०९.०८.२००९ रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.०८.०२.२०१० रोजी सुनावणी आयेाजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता तक्रारदार हजर नव्हते. गैरतक्रारदार हजर होते. सुनावणीचेवेळी गैरतक्रारदार यांचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच तक्रारीवरील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे दि.२६.०४.२००५ रोजी अर्ज करून, टीपीएस IV माहिम भंत्तेवाडी कॉलेज लेन दादर (प) मुंबई येथील प्लॉट क्र.७७३, ७७६ (part) च्या पुनर्विकासाच्या प्रस्तावाबाबतची माहिती मागीतली होती. गैरतक्रारदाराने तक्रारदारास विहित कालावधीत माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होउन तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे क्र.२००८/८०४/०२ हे व्दितीय अपील दाखल केले. तक्रारदारास संबंधीत फाईल निरीक्षणाकरिता उपलब्ध करून द्यावी. तक्रारदाराने फाईलचे निरीक्षण करून निवडक कागदपत्राची मागणी करावी. गैरतक्रारदाराने निवडक कागदपत्राच्या छायाप्रती तक्रारदारास ३० दिवसाचे आत पुरवाव्यात. अन्यथा गैरतक्रारदाराविरूध्द माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम २० अनुसार शास्ती लादण्याची कारवाई सुरू करण्यात येईल असे आयोगाने दि.१४.०९.२००८ रोजी आदेश

पारित केले. त्यानंतरही गैरतक्रारदाराने तक्रारदारास माहिती पुरविली नसल्याने राज्य माहिती आयोगाकडे तक्रार दाखल केली.

तक्रारदाराने विविध मुद्यावर माहिती मागीतली होती. यामुळे सदर प्रकरणी तक्रारदारास माहिती पुरविणे सोईचे व्हावे म्हणून संबंधीत फाईल निरीक्षणाकरिता तक्रारदारास प्रथम उपलब्ध करून द्यावी. त्यानंतर निव.डणूक कागदपत्राच्या छायाप्रती तक्रारदारास पुरवाव्यात असे आयेागाने आदेश पारित केले होते. त्यानुसार गैरतक्रारदाराने तक्रारदारास दि.०७.१०.२००८ रोजी पत्र पाठवून संबधीत फाईलचे निरीक्षण करण्याकरिता कार्यालयात उपस्थित राहण्याची संधी उपलब्ध करून दिली आहे. यावरून सदर प्रकरणी गैरतक्रारदाराने राज्य माहिती आयोगाच्या दि.१४.०९.२००८ च्या आदेशाचे पालन केले आहे असे दिसून येते. तक्रारदाराने माहिती प्राप्त करून घेण्याकरिता कार्यालयात उपस्थित राहून फाईलचे निरीक्षण करून माहिती प्राप्त करून घ्यावी. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

आदेश

तक्रार निकाली काढण्यांत येत आहे.

मुंबई
दिनांक १८.०२.२०१०

(रामानंद तिवारी)
राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई

राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.

तक्रार क्र.२०१०/५५३/०२

श्री. रविंद्र मारुती बेलोसे
३२४, पिंपळेश्वर कृपा,
स्वा.सै.सखाराम बा.पवार मार्ग,
करीरोड, मुंबई ४०० ०१३. **.... तक्रारदार**

विरूध्द

जन माहिती अधिकारी तथा उप मुख्य अधिकारी
मुंबई इमारत दुरुस्ती व पुनवर्सन प्राधिकारी
गृहनिर्माण भवन, बांद्रा (पू),
मुंबई ४०० ०५१. **.... उत्तरवादी**

विवेचन

तक्रारदार श्री.रविंद्र बेलोसे यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयेागाकडे दि.२२.०७.२००९ रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.०३.०२.२०१० रोजी सुनावणी आयेाजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता तक्रारदार हजर होते. गैरतक्रारदार हजर नव्हते.. सुनावणीचेवेळी तक्रारदार यांचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच तक्रारीवरील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे अर्ज करून, श्री.गजानन विठ्ठल चांदवीदकर यांना खारवा चाळ जे.एस.एस.रोड, मुंबई येथील घर क्र.१५, १९४ के खाली करण्याबाबत नोटीस दिली होती. याबाबत माहिती मागीतली होती. त्यांचे पुनर्वसन केले किंवा कसे याबाबत तक्रारदारास माहिती हवी आहे. गैरतक्रारदाराने मागणीप्रमाणे विहित कालावधीत माहिती पुरविली नाही. यामुळे व्यथीत होउन तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे क्र.२००९/२३३०/०२ हे व्दितीय अपील दाखल केले. सदर प्रकरणी गैरतक्रारदाराने माहिती गोळाकरून तक्रारदारास माहिती पुरवावी असे आयोगाने दि.२०.०४.२००९ रोजी आदेश पारित केले. त्यानंतरही तक्रारदारास

गैरतक्रारदाराने माहिती पुरविली नाही. यामुळे व्यथीत होउन तक्रारदाराने राज्य माहिती आयेागाकडे तक्रार दाखल केली.

गैरतक्रारदाराने राज्य माहिती आयोगाच्या दि.२०.०४.२००९ च्या आदेशाचे पालन केले नाही. तक्रारदारास माहिती पुरविली नाही. यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ७ चा भंग झाला आहे. याकरिता गैरतक्रारदार तथा उप मुख्य अधिकारी मुंबई घरदुरूस्ती आणि पुनर्वसन मंडळ, गृहनिर्माण भवन, बांद्रा (पू), मुंबई यांना जबाबदार धरून त्यांच्या विरूध्द माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम २० अनुसार शास्ती लादण्याची कारवाई का? सुरू करू नये याबाबत हे आदेश प्राप्त झाल्यापासून ४ आठवडयाचे आत आयेागाकडे लेखी खुलासा गैरतक्रारदाराने सादर करावा. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

आदेश

तक्रार मान्य करण्यांत येत आहे.

मुंबई
दिनांक २०.०२.२०१०

(रामानंद तिवारी)
राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई

राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.

तक्रार क्र.२०१०/५५६/०२

श्री. नरेश कुमार सराफ
सचिव, ब्ल्यू हेवन को.ऑप.हौ.सोसा.लि.,
१४, भाउसाहेब हिरे मार्ग, (माउंट प्लेझंट रोड),
मुंबई ४०० ००६. **.... तक्रारदार**

विरूध्द

जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक
सहकारी संस्था, डी विभाग, मुंबई,
मल्होत्रा हाउस, ६ वा मजला,
जी.पी.ओ.समोर, फोर्ट, मुंबई ४०० ००१. **.... उत्तरवादी**

विवेचन

तक्रारदार श्री. नरेद्र कुमार सराफ यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयेागाकडे दि.११.०२.२००९ रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.०३.०२.२०१० रोजी सुनावणी आयेाजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता तक्रारदार तसेच गैरतक्रारदार हजर होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच तक्रारीवरील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे दि.१२.१०.२००९ रोजी अर्ज करून, ब्ल्यू हेवन सहकारी गृहनिर्माण संस्थेने श्री.हसमुख शहा यांच्याकडून महाराष्ट्र सहकारी संस्थाच्या कायद्यानुसार प्रलंबित रू.४५, ४९८.५०/- इतकी रक्कम वसूलीबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. गैरतक्रारदाराने विहित कालावधीत माहिती पुरविली नसल्याने तक्रारदाराने व्यथीत होउन राज्य माहिती आयेागाकडे तक्रार दाखल केली.

मागणीप्रमाणे माहिती प्राप्त करून घेण्याकरिता उक्त अधिनियमातील कलम १९(१) अनुसार प्रथम अपील दाखल करण्याची, कलम १९(३) अनुसार आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करण्याची तक्रारदारास संधी उपलब्ध आहेत. परंतू सदर प्रकरणी तक्रारदाराने प्रथम / व्दितीय

अपील दाखल केले नाही. सदर प्रकरणी लक्ष देउन तक्रारदाराचा प्रश्न सोडविण्याचे सुनावणीचेवेळी आयोगास आश्वासन दिले. त्यानुसार गैरतक्रारदारांनी तक्रारदाराची मागणी लक्षात घेउन आवश्यकती कारवाई करावी. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

आदेश

तक्रार निकाली काढण्यांत येत आहे.

मुंबई
दिनांक २०.०२.२०१०

(रामानंद तिवारी)
राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई

राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.

तक्रार क्र.२०१०/५६५/०२

श्री. अरूण गणपत भोवर
अे/६०३ साई आशिष,
रिलायन्स फ्रेशच्या बाजूला,
विक्रोळी स्टेशन रोड, विक्रोळी (पू),
मुंबई ४०० ०८३. **.... तक्रारदार**

विरूध्द

जन माहिती अधिकारी तथा विभागीय सहाय्यक निबंधक
सहकारी संस्था, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,
गृहनिर्माण भवन, बांद्रा (पू), मुंबई ४०० ०५१. **.... उत्तरवादी**

विवेचन

तक्रारदार श्री. अरूण भोवर यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयेागाकडे दि.१९.११.२००९ रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.०४.०२.२०१० रोजी सुनावणी आयेाजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता तक्रारदार तसेच गैरतक्रारदार हजर होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच तक्रारीवरील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे दि.२२.०४.२००७ व दि.२७.०४.२००७ रोजी अर्ज करून, तक्रारदार अरूण निवारा सहकारी गृहनिर्माण संस्थेचे मुळ सभासद असूनही मागणी करून सुध्दा त्यांना संस्थेने भागपत्र (Share Certificate) दिले नाही याबाबत अनुषंगीक एकूण ८ मुद्यावर माहिती मागीतली होती. गैरतक्रारदाराने तक्रारदारास विहित कालावधीत माहिती पुरविली नाही. त्यामुळे व्यथीत होउन तक्रारदाराने राज्य माहिती आयेागाकडे क्र.२००८/६६६/०२ हे व्दितीय अपील दाखल केले होते. सदर प्रकरणी तक्रारदारास ३० दिवसाचे आत माहिती पुरवावी असे आयेागाने दि.२९.०८.२००८ रोजी आदेश पारित केले होते. त्यानंतरही

गैरतक्रारदाराने तक्रारदारास माहिती पुरविली नसल्याने व्यथीत होउन राज्य माहिती आयेागाकडे तक्रार दाखल केली.

सदर प्रकरणी माहिती मिळण्याच्या दृष्टीने माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(१) अनुसार तक्रारदाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे दि.२७.०४.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले होते. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. सदर प्रकरणी प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयेाजित करून आवश्यकते आदेश पारित करावेत. तक्रारदारास माहिती द्यावी. संस्थेविरूध्द महाराष्ट्र सहकार कायद्यानुसार कारवाई करावी असे आयोगाने दि.२९.०८.२००८ रोजी आदेश पारित केले होते. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी प्रथम अपीलावर सुनावणी आयोजित केली नाही. माहिती पुरविली नाही. राज्य माहिती आयेागाच्या दि.२९.०८.२००८ च्या आदेशाचे पालन केले नाही. याकरिता प्रथम अपिलीय प्राधिका-यांना जबाबदार धरून उक्त अधिनियमातील कलम २०(२) अनुसार त्यांच्या विरूध्द शिस्तभंगाच्या कारवाईची शिफारस आपल्या संबंधीत प्रशासकीय विभागाकडे का करण्यात येउ नये याबाबत हे आदेश प्राप्त झाल्यापासून ४ आठवडयाचे आत आयेागाकडे लेखी खुलासा सादर करावा. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

आदेश

तक्रार मान्य करण्यात येत आहे.

मुंबई
दिनांक १८.०२.२०१०

(रामानंद तिवारी)
राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई

राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.

तक्रार क्र.२०१०/५७३/०२

श्री. महेंद्र चव्हाण
८५/२, चाळके चाळ,
ताडवाडी, स्वदेशी मिल,
शिव, चुनाभट्टी, मुंबई ४०० ०२२. **.... तक्रारदार**

विरूध्द

जन माहिती अधिकारी तथा उप सचिव
महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय,
विधान भवन, विधान भवन मार्ग,
मुंबई ४०० ०३२. **.... उत्तरवादी**

विवेचन

तक्रारदार श्री.महेंद्र चव्हाण यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयेागाकडे दि.१९.११.२००९ रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.०४.०२.२०१० रोजी सुनावणी आयेाजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता तक्रारदार तसेच गैरतक्रारदार हजर होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच तक्रारीवरील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे दि.१८.०२.२००९ रोजी अर्ज करून, माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ४ अनुसार माहिती मागीतली होती. गैरतक्रारदाराने तक्रारदारास विहित कालावधीत माहिती पुरविली नसल्याने तक्रारदाराने आयेागाकडे क्र.२००९/३१२२/०२ हे व्दितीय अपील दाखल केले होते. सदर प्रकरणी तक्रारदारास ३० दिवसाचे आत माहिती पुरवावी असे आयेागाने दि.२८.०८.२००९ रोजी आदेश पारित केले. त्यानंतरही माहिती प्राप्त झाली नसल्याच्या कारणावरून तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे तक्रार दाखल केली.

गैरतक्रारदाराने, माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ४ अनुसार उपलब्ध असलेली माहिती निशुल्करित्या तक्रारदारास दि.२४.११.२००९ च्या पत्रान्वये पुरविली. यावरून सदर

प्रकरणी गैरतक्रारदाराने राज्य माहिती आयेागाच्या दि.२८.०८.२००९ च्या आदेशाचे पालन केले असल्याचे दिसून येते. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

आदेश

तक्रार निकाली काढण्यांत येत आहे.

मुंबई
दिनांक १८.०२.२०१०

(रामानंद तिवारी)
राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई

राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.

तक्रार क्र.२०१०/५७४/०२

श्री. महेंद्र चव्हाण
८५/२, चाळके चाळ,
ताडवाडी, स्वदेशी मिल,
शिव, चुनाभट्टी, मुंबई ४०० ०२२. **.... तक्रारदार**

विरूध्द

जन माहिती अधिकारी,
रोजगार व स्वयंरोजगार विभाग,
नवीन प्रशासकीय भवन, १४ वा मजला,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२. **.... उत्तरवादी**

विवेचन

तक्रारदार श्री.महेंद्र चव्हाण यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयेागाकडे दि.१९.११.२००९ रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.०४.०२.२०१० रोजी सुनावणी आयेाजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता तक्रारदार तसेच गैरतक्रारदार हजर होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच तक्रारीवरील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे दि.१८.०२.२००९ रोजी अर्ज करून, रोजगार व स्वंयरोजगार विभागातील उक्त अधिनियम, २००५ मधील कलम ४ बाबतची माहिती. आयोगाच्या अहवालात समावेश करण्याकरिता सन २००५, २००६, २००७ आणि २००८ या वर्षाची माहिती मागीतली होती. मागणी केलेली पूर्ण माहिती मिळाली नसल्याच्या करणावरून तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे क्र.२००९/३१३७/०२ हे व्दितीय अपील दाखल केले होते. सदर प्रकरणी तक्रारदारास ३० दिवसाचे आत माहिती पुरवावी असे आयोगाने दि.३१.०८.२००९ रोजी आदेश पारित केले होते.

सदर प्रकरणी आयेागाचे दि.३१.०८.२००९ चे आदेश गैरतक्रारदारास विलंबाने प्राप्त झाले. म्हणून तक्रारदारास आयेागाच्या दि.३१.०८.२००९ च्या आदेशानुसार दोन मुद्याबाबतची माहिती दि.२७११.२००९ च्या आदेशान्वये लेखी अहवाल आयेागास सुनावणीचेवेळी सादर करून प्रतिपादन केले. सदर प्रकरणी आयेागाच्या आदेशाचे गैरतक्रारदाराने पालन केले असल्याचे दिसते. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

आदेश

तक्रार निकाली काढण्यांत येत आहे.

मुंबई
दिनांक १८.०२.२०१०

(रामानंद तिवारी)
राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई

राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.

तक्रार क्र.२०१०/६१२/०२

श्री. प्यारेलाल एच.करोतिया
एच.५०१, सिध्दिविनायक रेसीडेंसी,
कल्याण शीळ रोड, टाटा पावर जवळ,
देशमुख होम्स, कल्याण (पू) ४२१ ३०४. **.... तक्रारदार**

विरूध्द

जन माहिती अधिकारी,
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
५ वा मजला, गृहनिर्माण भवन,
बांद्रा (पू), मुंबई ४०० ०५१. **.... उत्तरवादी**

विवेचन

तक्रारदार श्री.प्यारेलाल करोतिया यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयेागाकडे दि.२४.०८.२००९ रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.०९.०२.२०१० रोजी सुनावणी आयेाजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता तक्रारदार तसेच गैरतक्रारदार हजर नव्हते. सुनावणीचेवेळी तक्रारीवरील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे अर्ज करून, झोपडी धारकांना सादर केलेली इतर पुरावे, परिशिष्ट-II ची प्रत तसेच संस्था आणि विकासक यांच्यामध्ये झालेल्या करारपत्रांची प्रत इत्यादी अनुषंगीक माहिती मागीतली होती. गैरतक्रारदारांने तक्रारदारास विहित कालावधीत माहिती पुरविली नसल्याने तक्रारदाराने व्यथीत होउन राज्य माहिती आयेागाकडे क्र.२००८/९३२/०२ हे व्दितीय अपील दाखल केले. परिशिष्ट-II ज्या कागदपत्राच्या आधारे तयार करण्यात आले ती सर्व कागदपत्र प्रथम तक्रारदारास गैरतक्रारदाराने निरीक्षणाकरिता उपलब्ध करून द्यावीत. तक्रारदाराने कागदपत्राचे निरीक्षण केल्यानंतर निवडक कागदपत्राच्या प्रती तक्रारदारास

पुरवाव्यात. झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने तक्रारदारास मागणीप्रमाणे आवश्यक कागदपत्राच्या प्रती पुरवाव्यात असे आयेागाने दि.०१.१०.२००८ रोजी आदेश पारित केले.

राज्य माहिती आयेागाच्या आदेशानुसार गैरतक्रारदाराने तक्रारदारास दि.२६.०६.२००९ रोजी कागदपत्र निरीक्षणाकरिता उपलब्ध करून दिली. त्यामध्ये एल.ओ.आय.फाईलची पान जोडली नव्हती. देण्यासाठी तयार ठेवलेल्या कागदपत्रावर शिक्का सही नव्हती. सदर माहिती प्राप्त करून घेण्याकरिता रू.२५००/- (१२०० पानाकरिता) इतके शुल्क भरण्याबाबत तक्रारदारास कळविण्यात आले. गैरतक्रारदाराने मुळप्रत निरीक्षणाकरिता दिली नाही असे तक्रारदाराने तक्रारीत नमुद केले आहे. गैरतक्रारदाराने पूर्वी रू.३८६/- इतके शुल्क आकारून तक्रारदारास एक CD आणि १२ पाने नकाशाची दिली आहेत. आणखी रू.३२/- शुल्क आकारून चुकीची माहिती दिली. सदर प्रकरणी विलंब झाला असल्याने निशुल्करित्या माहिती गैरतक्रारदाराने पुरविली पाहिजे असाही तक्रारदाराने तक्रारीत मुध्दा उपस्थित केला आहे. यावरून सदर प्रकरणी गैरतक्रारदाराने तक्रारदारास पूर्वी वेळोवेळी माहिती पुरविली असल्याचे दिसून येते. सदर प्रकरणी तक्रारीवरील सुनावणीकरिता तक्रारदार / गैरतक्रारदार हजर नव्हते. तक्रारदारास मागणीप्रमाणे माहिती पुरविण्यास विलंब झाला तर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ६(३) अनुसार गैरतक्रारदारने तक्रारदारास निशुल्करित्या माहिती पुरविणे बंधनकारक आहे. तरी सदर प्रकरणी तक्रारदारास माहिती पुरविण्यास विलंब झाला असल्याने गैरतक्रारदाराने तक्रारदारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसाचे आत निशुल्करित्या माहिती पुरवावी. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

आदेश

तक्रार मान्य करण्यांत येत आहे.

मुंबई
दिनांक १८.०२.२०१०

(रामानंद तिवारी)
राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई

राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

अपील क्र.२०१०/४३२३/०२

श्री.अब्दुल गफूर का.हुणशाळ
हॉटेल प्रेसिडेंन्ट, महाराष्ट्र नगर,
बांद्रा (पू), मुंबई ४०० ०५१. **.... अपीलकार**

विरुध्द

प्रथम अपिलीय प्राधिकारी,
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
५ वा मजला, गृहनिर्माण भवन,
बांद्रा (पू), मुंबई ४०० ०५१.

जन माहिती अधिकारी,
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
५ वा मजला, गृहनिर्माण भवन,
बांद्रा (पू), मुंबई ४०० ०५१. **.... उत्तरवादी**

विवेचन

अपीलकार श्री.अब्दुल हुणशाळ यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१३.१२.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.३०.०७.२००९ रोजी अर्ज करुन, महाराष्ट्र नगर / आंबेडकर नगर सी.टी.एस.क्र.६३९ येथील एस.आर.ए. योजनेत तोडल्या गेलेल्या झोपडयाबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती पुरविली नसल्याने अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-यांकडे दि.१४.०९.२०२०९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी दि.०७.१०.२००९ रोजी सुनावणी आयोजित केली. काही कारणास्तव अपीलकार सुनावणीकरिता दि.०७.१०.२००९ रोजी हजर राहू शकले नाही. अपीलकाराने सुनावणीची दुसरी तारीख मागीतली. अपीलकारास सुनावणीची तारीख दिली नाही. माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होउन राज्य माहिती आयेागाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१०.०२.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी उपस्थित नव्हते. अपीलकार उपस्थित होते. अपीलकार यांचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करून, महाराष्ट्र नगर/ आंबेडकर नगर सी.टी.सर्व्हे क्रक.६२९ येथील एस.आर.ए.योजनेत तोडलेल्या झोपडयाबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. सदर प्रकरणी जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी अपीलकारास माहिती पुरविली नाही. सदर दोन्ही अधिका-यांची कृती निश्चितच योग्य नाही. राज्यात माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची काटेकोरपणे अमंलबजावणी करणे आवश्यक आहे. या प्रकरणी मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसाचे आत अपीलकारास माहिती पुरवावी.

<u>आदेश</u>

अपील मान्य करण्यांत येत आहे.

मुंबई
दिनांक २०.०२.२०१०

(रामानंद तिवारी)
राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई

राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

अपील क्र.२०१०/४३१४/०२

श्री.आनंद सोपान पारगांवकर
महात्मा फुले नगर, आय.आय.टी मार्केट,
पवई, मुंबई ४०० ०७६. **.... अपीलकार**

विरुध्द

प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता
बृहन्मुंबई महानगरपालिका,
एल विभाग, लक्ष्मणराव यादव मंडई इमारत,
१ ला मजला, स.गो.बर्वे मार्ग,
कुर्ला (प), मुंबई ४०० ०७०.

जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता
बृहन्मुंबई महानगरपालिका,
एल विभाग, लक्ष्मणराव यादव मंडई इमारत,
१ ला मजला, स.गो.बर्वे मार्ग,
कुर्ला (प), मुंबई ४०० ०७०. **.... उत्तरवादी**

विवेचन

अपीलकार श्री.आनंद पारगावकर यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०४.०१.२०१० रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे अर्ज करुन, दि.१३.०७.२००९ रोजी सहाय्यक अभियंता (इ व का) यांच्या नावे एकूण ५ तक्रार अर्ज देण्यात आले त्या तक्रारीवर केलेल्या कार्यवाईची माहिती, किती दिवसात अनधीकृत बांधकामावर कारवाई करणार, अनधीकृत बांधकामाबाबत कलम ३५१ अनुसार नोटीसीची अमंलबजावणी केली आहे का? इत्यादी एकूण ६ मुद्यावर माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती पुरविली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे दि.२६.११.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी दि.११.१२.२००९ रोजी अपीलकारास पत्र पाठवून दि.२६.११.२००९ रोजी प्रथम अपीलावर सुनावणी आयोजित केल्याचे कळविले.

अपीलकाराने जन माहिती अधिका-याकडे सादर केलेल्या तक्रारीसोबत मुळ तक्रारीची प्रत जोडून दिली नाही. त्यामुळे माहिती पुरविता आली नाही. असे जन माहिती अधिका-यांनी प्रथम अपीलावरील सुनावणीचेवेळी सांगीतले. मुळ तक्रार अर्जाची प्रत जन माहिती अधिका-यांना द्यावी असे प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी अपीलकारास सांगीतले व तसे दि.२१.१२.२००९ रोजी आदेश पारित केले. त्यानंतरही माहिती मिळाली नसल्याने अपीलकाराने व्यथीत होउन राज्य माहिती आयेागाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१०.०२.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपीलकार उपस्थित नव्हते. जन माहिती अधिकारी यांचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-याकडे माहितीच्या अधिकारात अर्ज करून दि.१३.०७.२००९ रोजी सादर केलेल्या तक्रारीवरील कार्यवाहीची माहिती मागीतली होती. दि.१३.०७.२००९ च्या तक्रारीसोबत मुळ तक्रार अर्ज जोडला नव्हता. त्यामुळे अपीलकारास माहिती पुरविण्यास अडचण झाली. मुळ तक्रार अर्जाची प्रत जन माहिती अधिका-यांना द्यावी असे प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी अपीलकारास प्रथम अपीलावरील सुनावणीचेवेळी सांगीतले होते. अपीलकाराने ते मान्य केले होते. परंतू मुळ तक्रार अर्जाची प्रत अपीलकाराने कार्यालयात सादर केली नाही. यामुळे माहिती पुरविता आली नसल्याचे जन माहिती अधिका-यांनी व्दितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी प्रतिपादन केले. अपीलकार सुनावणीकरिता हजर नव्हते. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

आदेश

अपील निकाली काढण्यांत येत आहे.

मुंबई
दिनांक २०.०१.२०१०

(रामानंद तिवारी)
राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई

राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

अपील क्र.२०१०/४३२२/०२

श्री.अब्दुल गफूर का.हुणशाळ
हॉटेल प्रेसिडेंन्ट, महाराष्ट्र नगर,
बांद्रा (पू), मुंबई ४०० ०५१. **.... अपीलकार**

विरूध्द

प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा अप्पर जिल्हाधिकारी
जिल्हाधिकारी, पश्चिम उपनगरे यांचे कार्यालय,
प्रशासकीय इमारत, ७ वा मजला,
बांद्रा (पू), मुंबई ४०० ०५१.

जन माहिती अधिकारी,
जिल्हाधिकारी, पश्चिम उपनगरे यांचे कार्यालय,
प्रशासकीय इमारत, ७ वा मजला,
बांद्रा (पू), मुंबई ४०० ०५१. **.... उत्तरवादी**

विवेचन

अपीलकार श्री.अब्दुल हुणशाळ यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.३१.१२.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.३१.०७.२००९ रोजी अर्ज करून, शासन निर्णय क्र.जमिन-२६०५/प्र.क्र.२३०६/ज-३ महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई ३२, दि.०८.०८.२००६ बाबत २ मुद्यावर माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी दिलेल्या माहितीने समाधान झ-ाले नसल्याने अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे दि.२४.१०.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होउन राज्य माहिती आयेागाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१०.०२.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करून, सी.टी.सर्व्हे क्र.३४१ सी.टी.सर्व्हे क्र.६२९ पैकी जमीनीवर विकासक मे गजराज हौसिंग निर्माता यांनी एस.आर.ए. योजनेच्या मान्यतेने सादर केलेल्या प्रस्तावाची प्रत, दि.०८.०८.२००६ च्या शासन निर्णयातील अट क्र.४ अंतर्गत विकासात जिल्हाधिका-याकडून ना हरकत प्रमाणपत्र देता येत नसल्याचे कळविल्याबाबतचे पत्राची सुस्पष्ट छायांकित प्रत मिळावी इत्यादी माहिती मागीतली होती. सदर प्रकरण जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग यांचेशी संबंधीत असल्याने माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ६(३) अनुसार अपीलकाराचा अर्ज जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग यांचेकडे हस्तांतरित केला असल्याचे उत्तरवादीने सुनावणीचेवेळी आयेागासमोर प्रतिपादन केले. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

आदेश

अपील निकाली काढण्यांत येत आहे.

मुंबई
दिनांक २०.०२.२०१०

(रामानंद तिवारी)
राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई

राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

अपील क्र.२०१०/४३२१/०२

श्री.अब्दुल गफूर का.हुणशाळ
हॉटेल प्रेसिडेंन्ट, महाराष्ट्र नगर,
बांद्रा (पू), मुंबई ४०० ०५१. **.... अपीलकार**

विरूध्द

प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा अप्पर जिल्हाधिकारी
जिल्हाधिकारी, पश्चिम उपनगरे यांचे कार्यालय,
प्रशासकीय इमारत, ७ वा मजला,
बांद्रा (पू), मुंबई ४०० ०५१.

जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार
जिल्हाधिकारी, पश्चिम उपनगरे यांचे कार्यालय,
प्रशासकीय इमारत, ७ वा मजला,
बांद्रा (पू), मुंबई ४०० ०५१. **.... उत्तरवादी**

विवेचन

अपीलकार श्री.अब्दुल हुणशाळ यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.३१.१२.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२४.०७.२००९ रोजी अर्ज करून, हनुमान प्रसाद सैनि यांचे उक्त श्रेणीतील परिशिष्ट-II मधून नाव काढण्यात आल्याबध्दलची कागदोपत्री पुराव्यात छायाप्रती इत्यादी अनुषंगीक माहिती मागीतली होती. मागणीप्रमाणे माहिती मिळाली नसल्याने अपीलकाराने दि.२८.०८.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी दि.३१.१०.२००९ रोजी सुनावणी आयोजित केली. आदेश पारित केले नाहीत. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयेागाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१०.०२.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करून, हनुमान प्रसाद सैनि यांचे परिशिष्ट-II मधून नाव काढून टाकल्याबाबत माहिती मागीतली होती. सदर प्रकरण झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे शिफारस केल्यानुसार हनुमान प्रसाद सैनि यांचे नाव परिशिष्ट-II मधून रद्द करण्यात आले असल्याचे उत्तरवादीने आयोगासमोर प्रतिपादन केले. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

आदेश

अपील निकाली काढण्यांत येत आहे.

मुंबई
दिनांक २०.०२.२०१०

(रामानंद तिवारी)
राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई

राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

अपील क्र.२०१०/३५७९/०२

श्री.जिवाभाई जे.दिवेचा
माता फुलवंती सेवा मंडळ,
घर नं.१०३, दांडा रोड, मधलापाडा,
मुंबई ४०० ०५२. **.... अपीलकार**

विरुध्द

प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता
बृहन्मुंबई महानगरपालिका,
एच/पश्चिम विभाग कार्यालय,
सेंट मार्टिन्स रोड, बांद्रा (प),
मुंबई ४०० ०५०.

जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इ व का)
बृहन्मुंबई महानगरपालिका,
एच/पश्चिम विभाग कार्यालय,
सेंट मार्टिन्स रोड, बांद्रा (प),
मुंबई ४०० ०५०. **.... उत्तरवादी**

विवेचन

अपीलकार श्री.जिवाभाई दिवेचा यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.३०.०९.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१२.०३.२००९ रोजी अर्ज करून, पाहणी अहवालाची प्रत, पोलीस ठाण्यास एम.आर.टी.पी कायद्यानुसार देण्यात आलेल्या मान्यता पत्राची प्रत, अनधिकृत बांधकामाचा केलेला पंचनामाची प्रत, न्यायालयात दाखल केलेल्या कोर्ट केस क्रमांक व सुनावणी तारिख इत्यादि माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी दि.१६.०४.२००९ रोजी अपीलकारास पत्र पाठवून शुल्क भरून माहिती प्राप्त करून घ्यावी असे कळविले. उत्तरवादीने थातूर मातूर उत्तर दिल्याने दि.०५.०५.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले.

दरम्यान अपीलकाराने मागणी केलेल्या माहिती पैकी मुध्दा क्र.१ ची माहिती, कार्यालयात रू.२/ शुल्क भरून प्राप्त करून घ्यावी. मुध्दा २ विषयी माहिती उपलब्ध नाही. मुध्दा क्र.३ व ४ बाबतची माहिती पोलीस खात्याशी संबंधीत असून त्या खात्याकडे संपर्क साधावा असे उत्तरवादीने अपीलकारास दि.२९.०७.२००९ च्या पत्रान्वये कळविले. अर्जातील माहिती पोलीस खात्याशी संबंधीत असेल तर अर्ज पोलीस खात्याकडे पाठवावा असे प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी दि.०७.०८.२००९ रोजी आदेश पारित केले होते.

सदर अपीलावर दि.१०.०२.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी उपस्थित नव्हते. अपीलकार उपस्थित होते. सुनावणीच्यावेळी अपीलकार यांचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

या परिस्थितीत या प्रकरणी मी असे आदेश देतो की, सदर प्रकरणी जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास अद्यावत माहिती पुरवावी.

<u>आदेश</u>

अपील मान्य करण्यांत येत आहे.

मुंबई
दिनांक २०.०२.२०१०

(रामानंद तिवारी)
राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई

राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

अपील क्रमांक २००९/४३१६/०२

श्री.प्रदीप अंबादास हिंगोले,
द्वारा- रिअल व्हॅल्यू,१०२,श्री सहाय्य ईलाईट गार्डन हॉटेलच्या मागे,
ठाणा नाका,पनवेल(प.),जि.रायगड, पिन -४१०२०६ .... अपीलकार

विरुध्द

प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सचिव(टी.एम.वाडिले),
महाराष्ट्र राज्य व्यवसाय शिक्षण परीक्षा मंडळ, शासकीय तंत्र निकेतन इमारत,
क विभाग, २रा मजला, ४९,खेरवाडी, वांद्रे(पू.),
मुंबई-४०००५१

जन माहिती अधिकारी तथा
महाराष्ट्र राज्य व्यवसाय शिक्षण परीक्षा मंडळ, शासकीय तंत्र निकेतन इमारत,
क विभाग, २रा मजला, ४९,खेरवाडी, वांद्रे(पू.),
मुंबई-४०००५१ ..... उत्तरवादी

विवेचन

अर्जदार श्री.प्रदिप अंबादास इंगोले यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. २४.९.२००९ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२७.७.०९ रोजी अर्ज करुन दिनांक २२ जुलै,२००९ रोजी दाखल केलेल्या तक्रार अर्जावर केलेल्या कार्यवाहीबाबतची माहिती संबंधित कागदपत्रांच्या सत्यप्रती मिळणेबाबत मागणी केली होती.

जन माहिती अधिकारी यांनी विहित कालावधील अपीलकारास माहिती दिली नसल्याने अपीलकाराने प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे दि.२९.८.०९ रोजी प्रथम अपील दाखल केले. दरम्यानच्या कालावधीत जनमाहिती अधिका-यांनी अपीलकारास दिनांक १३.८.०९च्या पत्रान्वये असे कळविले की, दि.२२ जलै,२००९ रोजीचा कोणाता तक्रार अर्ज आहे, त्या तक्रार अर्जामध्ये कोणत्या स्वरुपाचा तपशील आहे याबाबतचा बोध कार्यालयास होत नाही. त्यामुळे दि.२२ जुलै,०९ च्या तक्रार अर्जाची प्रत कार्यालयास पाठविल्यास त्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीचा तपशील अपीलकारास कळविण्यात यईल. प्रथम अपीलीय अधीका-यांनी सुनावणी आयोजित करुन आदेश

पारीत केले नाहीत, माहिती दिली नाही. त्यामुळे व्यथित होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१०.२.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी उपस्थित होते.अपिलकार उपस्थित नव्हते.

सुनावणीचे वेळी जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन,दिनांक २२ जुलै,२००९ रोजी दाखल केलेल्या तक्रार अर्जावर घेतलेल्या हरकती व कार्यवाही याच्या तपशीलाच्या सर्व सत्यप्रती मिळणेबाबत मागणी केली होती. अपीलकारास मागणीप्रमाणे आवश्यक ती माहिती दि.३.१२.०९ च्या पत्रासोबत पुरवण्यिात आली असल्याने जन माहिती अधिका-यांनी सदरपत्राची प्रत आयोगास सादर करन प्रतिपादन केले. यावरुन सदर प्रकरणी अपीलकारास माहिती पुरविण्यात आली असल्याने मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

<u>आदेश</u>

अपील निकाली काढण्यात येत आहे.

मुंबई
दिनांक:२६.२.२०१०

(रामानंद तिवारी)
राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई

राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर
माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

अपील क्रमांक २००९/३४९३/०२

श्रीमती धाफणे मर्लिन वारापेन,
५,स्कायलार्क अपार्टमेंट, ६-डी युनियन पार्क रोड,
खार(प.), मुंबई-४०००५२ ..... अपीलकार

विरुध्द

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा सहाय्यक पालीका आयक्त,
बृहन्मुंबई महानगरपालिका एच(पश्चिम) वार्ड ऑफीस,
सहाय्यक पालिका आयुक्त यांचे कार्यालय,
सेंट मार्टीन्स रोड,
वांद्रे(प.), मुंबई-५०

जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता(कार्यशाळा)
बृहन्मुंबई महानगरपालिका एच(पश्चिम) वार्ड ऑफीस,
सहाय्यक पालिका आयुक्त यांचे कार्यालय,
सेंट मार्टीन्स रोड,
वांद्रे(प.), मुंबई-५० **..... उत्तरवादी**

विवेचन

अर्जदार श्रीमती धाफणे मर्लिन वारापेन यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. २९.९.२००९ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे २४.६.२००९ रोजी अर्ज करुन डॉ.आंबेडकर रोड,सी.डी.मार्ग पर्यंत रुंदीकरण करण्याबाबत सहाय्यक म.न.पा. आयुक्त यांना लिहिलेल्या पत्राच्या संदर्भात उत्तराच्या प्रती इत्यादी विविध मुद्यांवर अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास विहित कालावधीत माहिती पुरविली नाही. त्यामुळे अपीलकाराने प्रथम अपीलीय अधिका-यांकडे दि.२८.७.०९ रोजी प्रथम अपील दाखल केले. अपीलकारास जनमाहिती अधिका-यांनी माहिती पुरवावी असे दि.१७.८.०९ रोजी आदेश पारित केले. त्यानंतरही अपीलकारास माहिती पुरविण्यात आली नाही. त्यामुळे व्यथीत होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१०.२.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी तसेच अपिलकार उपस्थित होते.

सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन डॉ.आंबेडकर रोड रंदीकरणबाबत माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती पुरविली नाही. पथम अपीलीय अधिका-यांच्या आदेशाचे पालन केले नाही. अपीलकारास माहिती पुरविली नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांच्या आत अपीलकारास माहिती पुरवावी.

आदेश

अपील मान्य करण्यात येत आहे.

मुंबई
दिनांक २६.२.२०१०

(रामानंद तिवारी)
राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई

राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर
माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

अपील क्रमांक २००९/४३१५/०२

श्री.प्रशांत जयमल्हार बिडवई,
श्रीराम दर्शन अपार्टमेंट,२ रामाळा शनीनगर,
बदलापूर(प.),ता.अंबरनाथ, जि.ठाणे ..... अपीलकार

विरुध्द

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा पोलीस उपायुक्त,
परिमंडळ-२,
मुंबई.

जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त,
दक्षिण प्रादेशिक विभाग,
मुंबई. ..... उत्तरवादी

<u>विवेचन</u>

अर्जदार श्री.प्रशांत जयमल्हार बिडवई यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ३.११.२००९ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे १.९.२००९ रोजी अर्ज करुन श्री.चंद्रकांत जाधव यांना एका टॅक्सीवाल्याने उजव्या पायाला ठोकर मारली होती. त्यांना जे.जे. रुग्णालयात दाखल केले होते. सदर टॅक्सी चालकावर वि.प.मार्ग पोलीस ठाणे गु.र.क्रमांक १००/०९ कलम २७९,३३८ भा.द.वि.अन्वये गुन्हा दाखल केला. सदर अपधातामधील टॅक्सी ड्रायव्हरच नाव, पत्ता न्यायालयीन प्रकरण क्रमांक, न्यायालयीन प्रकरणी सुनावणीची पुढील तारीख, कुठले कलम लावले ते लेखी स्वरुपात द्यावे. ड्रायव्हींग लायसनची प्रत,दोषारोपपत्र, गाडीचे पेपर, एफ.आय.आर.ॲक्सीडेंट रिपोर्ट फॉर्म आणि ड्रायव्हरच्या जाबजबाबाची साक्षांकित प्रत इत्यादी माहिती मागितली होती. मागणीप्रमाणे विहित कालावधीत माहिती प्राप्त झाली नसल्याने अपीलकाराने प्रथम अपीलीय अधिका-याकडे दि.१.१०.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी दि.९.१०.०९ रोजी आदेश पारित केले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१०.२.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपिलकार उपस्थित नव्हते.

सुनावणीचे वेळी जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, अपघातामधील ड्रायव्हरचे नाव, पत्ता कोर्ट केस नंबर, पुढील तारीख, कुठले कलम लावले, इत्यादी अनुषंगिक माहिती मागितली होती. अपीलकाराने त्रयस्थ पक्ष म्हणजे श्री.चंद्रकांत जाधव, सहाय्यक पोलीस उपनिरिक्षक सर जे.जे. मार्ग पोलीस ठाणे यांना झालेल्या अपघाताबाबतची माहिती अपीलकाराने मागीतली आहे. सदर प्रकरणी अपीलकार श्री.बिडवई यांना कोणतेही कागदपत्र देण्यास त्रयस्थ पक्षाने तीव्र आक्षेप घेतला असल्याने माहिती पुरविता आली नसल्याचे जन माहिती अधिका-यांनी आयोगासमोर प्रतिपादन केले. सदर प्रकरणी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ११ अनुसार त्रयस्थ पक्षाची माहिती, त्रयस्थ पक्षाच्या संमतीशिवाय पुरविता येत नाही. सदर प्रकरणी अपीलकारास माहिती पुरविण्यास त्रयस्थ पक्षाने आक्षेप घेतला आहे. यामुळे सदर प्रकरणी अपीलकारास माहिती पुरविण्यात आली नाही. जन माहिती अधिका-यानी अर्जावर नियमानुसार अपीलकारास समर्पक उत्तर दिले आहे. यामुळे प्रथम अपीलीय अधिका-यांनी दिनांक ९.१०.२००९ रोजी पारित केलेल्या आदेशात कोणताही फेरबदल करण्याची आवश्यकता वाटत नाही. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

मुंबई
दिनांक २६.२.२०१०

(रामानंद तिवारी)
राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई

राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर
माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

अपील क्रमांक २००९/३५४६/०२

श्री.सोअेब उर्फ रिची सिक्वेरा,
प्रोटेक्शन ऑफ राईट्स असोसिएशन,
रोढा आणि कृष्णा को.ऑप.हौ.सो.,कृष्णा बिल्डिंग,
के-००२, तळ मजला,लिंक रोड, कांदरपाडा,
दहिसर(प.), मुंबई-६८. **..... अपीलकार**

विरुध्द

प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा
श्री. एस.एन.साबदे,
पोलीस उपायुक्त,
पोलीस उपायुक्त यांचे कार्यालय,
शिवाजी मंडई, मुंबई-४०० ००१.

जन माहिती अधिकारी तथा
श्री.के.पी. गावित,
डिटेक्शन क्राईम ब्रांच,
पोलीस उपायुक्त,
पोलीस उपायुक्त यांचे कार्यालय,
शिवाजी मंडई, मुंबई-४०० ००१. **.... उत्तरवादी**

विवेचन

अर्जदार श्री.सोअेब उर्फ रिची सिक्वेरा यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १४.९.२००९ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे २५.५.२००९ रोजी अर्ज करुन गु.प्र.शा.गु.अ.वि,गु.र.क्र.५३/०६ च्या संदर्भात विविध मुद्यांवर माहिती मागितली होती. जनमाहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.५.६.२००९ च्या पत्रान्वये माहिती पुरविली. यामुळे समाधान झाले

नसल्याने अपीलकाराने प्रथमअपीलीय अधिका-याकडे दि.२३.६.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-याने दि.२२.७.२००९ रोजी आदेश पारित केले. यामुळे व्यथीत होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१०.२.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपिलकार उपस्थित होते

सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन,गु.प्र.शा.गु.अ.वि,गु.र.क्र.५३/०६ बाबत अनुषंगीक विविध मुद्यांवर माहिती मागितली होती. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ८(१)(ज)मधील तरतुदीप्रमाो ज्या माहितीमुळे अपराधाचा तपास करणे किंवा त्यांना अटक करणे किंवा त्यांच्यावर खटला दाखल करणे या प्रक्रियेमध्ये अडथळा निर्माण होईल तसेचकलम ८(१)(छ)मधील तरतुदीप्रमाणे जी माहिती उघड केल्याने कोणत्याही व्यक्तीने जीवन व शारिरिक सुरक्षितता धोक्यात येईल म्हणून ही माहिती जन माहिती अधिका-यांनी नाकारली. यावरुन सदर प्रकरणी जन माहिती अधिका-यांनी अर्जावर नियमानुसार समर्पक उत्तर दिले असल्याने प्रंथम अपीलीय अधिका-यांनी दि.२२.७.२००९ रोजी पारित केलेल्या आदेशात कोणताही फेरबदल करण्याची आवश्यकता वाटत नाही. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

<u>आदेश</u>

अपील निकाली काढण्यात येत आहे.

मुंबई
दिनांक २६.२.२०१०

(रामानंद तिवारी)
राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई

राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर
माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.
अपील क्रमांक २००९/४३४६/०२

श्री. वसंत शामराव उटीकर,
तिरंगा को.ऑप.हौ.सोसायटी लि.,
डी-२०/०.३, तळमजला, सेक्टर-२५,
जईनगर(प.), नवी मुंबई-४०० ७०५ .... अपीलकार

विरुध्द

प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा
श्री.जी.बी. इंदूरकर,
विक्रीकर सहआयुक्त,
मुख्यालय-१.

जन माहिती अधिकारी तथा
विक्रीकर आयुक्त कार्यालय,
मुख्यालय-१,
मुंबई .... उत्तरवादी

विवेचन

अर्जदार श्री.वसंत उटीकर यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२१.१२.९ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे अर्ज करुन विविध विषयावर/मुद्यावर माहिती मागीतली होती. सदर प्रकरणी अपीलकारास माहिती पुरविण्यात आली आहे. परंतू अपीलकाराने दि.२९.७.०९, ३०.७.०९, १८.८.०९ रोजी दाखल केलेल्या प्रथम अपीलावर विहित कालावधीत सुनावणी आयोजित करुन आदेश पारित केले नाहीत. विलंबाने आदेश पारित केले असल्याच्या कारणावरुन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२०.२.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी तसेच अपिलकार उपस्थित होते.

सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

सदर प्रकरणी अपीलकाराच्या प्रथम अपीलावर विलंबाने आदेश पारित केले असल्याचा मुद्दा द्वितीय अपीलात उपस्थित करण्यात आला आहे. अपीलकाराच्या प्रथम अपीलावर प्रथम अपीलीय अधिका-यांनी विहित वेळेत सुनावणी आयोजित केली नाही. विलंबाने सुनावणी

आयोजित करुन विलंबाने आदेश पारित केले आहेत. याकरिता प्रथम अपीलीय अधिका-यांना जबाबदार धरुन माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २०(२) अनुसार प्रथम अपीलीय अधिका-यांविरुध्द शिस्तभंगाची कारवाई करण्याबाबत प्रशासकीय विभागाकडे का शिफारस करण्यात येऊ नये याबाबत ४ आठवडयाचे आत प्रत्यक्ष आयोगात भेटून लेखी खुलासा सादर करावा.

आदेश

अपील मान्य करण्यात येत आहे.

मुंबई
दिनांक २६.२.२०१०

(रामानंद तिवारी)
राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई

राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर
माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.
अपील क्रमांक २००९/४३४६/०२

श्री. झाकीर बुरुदगार,
हाजी सिद्दीक बिल्डिंग,
१ला मजला, डी.एम.रोड,वाकोला पाइप लाईन,
सांताक्रूझ(पू.), मुंबई-४०००५५. **.... अपीलकार**

विरुध्द

प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा
कार्यकारी अभियंता,
म्युनिसिपल कॉर्पोरेशन ग्रेटर मुंबई,
एच/वेस्ट वार्ड ऑफीस,सेंट मार्टीन्स रोड,
बांद्रा(प.), मुंबई-४०००५०.

जन माहिती अधिकारी तथा
सहाय्यक अभिग्रता,
म्युनिसिपल कॉर्पोरेशन ग्रेटर मुंबई,
एच/वेस्ट वार्ड ऑफीस,सेंट मार्टीन्स रोड,
बांद्रा(प.), मुंबई-४०००५०. **.... उत्तरवादी**

विवेचन

अर्जदार श्री.झाकीर बुरुदगार यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.४.१२.०९ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१.९.२००९ रोजी अर्ज करुन सी.टी.सर्व्हे क्र.१०२५ डी राहत मंझील इमारतीच्या पूर्वेकडील तळमजल्यावर नीरमल प्लाय भाडेकरने कायमस्वरुपी अतीक्रमण केले असल्याबाबत विविध मुद्यावर अनुषंगीक माहिती मागीतली होती. मागणी केलेली माहिती प्राप्त करण्याकरीता कार्यालयात कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी दुपारी ३.०० ते ५.०० या वेळेत येऊन खुलासा करावा त्यानुसार माहिती पुरविण्यात येईल असे जन माहिती अधिका-यांनी दि.१७.१०.०९ च्या पत्रान्वये अपीलकारास कळविले. माहिती मिळाली नसल्याने अपीलकाराने दि.११.१०.०९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. प्रथम अपीलावर दि.६.११.०९ रोजी आदेश पारित केल.त्यानंतरही

माहिती मिळाली नसल्याने व्यथीत होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

२. सदर अपीलावर दि.२२.२.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी तसेच अपिलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलाती कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

३. वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून यते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन राहत मंझील इमारतीच्या पूर्वेकडील तळमजल्यावर व्यापारी कारणाकरीता नीरमल प्लाय भाडेकरुने कायमस्वरुपात अतिक्रमण केले असल्याबाबत विविध मुद्यांवर अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी आवश्यक ती माहिती पुरविली नाही. जन माहिती अधिका-यांची सदर कृती निश्चीतच योग्य नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, अतिक्रमण काढण्याबाबत काय कार्यवाही करण्यात आली याबाबतची माहिती हे आदेश प्राप्त झ ाल्यापासून ३० दिवसांचे आत अपीलकारास जन माहिती अधिका-यांनी पुरवावी. अन्यथा माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० अनुसार जन माती अधिका-यांविरुध्द शास्ती लादण्याची कारवाई सुरु करण्यात येईल.

<u>आदेश</u>

अपील मान्य करण्यात येत आहे.

मुंबई
दिनांक २६.२.२०१०

(रामानंद तिवारी)
राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई

मुद्दा क्र.७ ची माहिती कार्यालयाच्या कार्यकक्षेत येत नाही. मुद्दा क्र.८ बाबतची माहिती G/North Department संबंधी असल्याने अपीलकाराच्या अर्जाची प्रत त्या कार्यालयाकडे पाठविली. तसेच याबाबत अपीलकारास जन माहिती अधिका-यांनी दि.२.१२.०९च्या पत्रान्वये कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने दि.७.१.०९ रोजी प्रथम अपील दाखल केले. उपलब्ध माहिती अपीलकारास पुरवावी असे प्रथम अपीलीय अधिका-यांनी दि.४.१.२०१० रोजी आदेश पारित केले. त्यानंतरही माहिती मिळाली नसल्याने अपीलकाराने आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२३.२.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपिलकार उपस्थित होते. सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विविचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-याांकडे अर्ज करुन, अवैधरित्या दुकानाचे पक्के बांधकाम केल्याबाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. सदर प्रकरणी मी असे आदेश देतो की, जन माती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसांचे आत अपीलकारास कलम ३५७ अनुसार अवैधरित्या नाल्यावर मेसर्स साक्षी ज्वेलर्स यांनी केलेल्या पक्क्या बांधकामाविरुध्द निर्गमित केलेल्या नोटीसची प्रत निशुल्करित्या उपलब्ध करुन द्यावी.

आदेश

अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

मुंबई
दिनांक २६.२.२०१०

(रामानंद तिवारी)
राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई

राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

अपील क्रमांक २००९/४३२९/०२

श्री.लवाटे नारायण कृष्णाजी,
२१ बी, झावबावाडी, ठाकूरद्वार,
मुंबई-४०० ००२. ..... अपीलकार

विरुध्द

प्रथम अपीलीय अधिकारी तथा,
महाव्यवस्थापक(क. व औ. सं.),
महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ,
मध्यवर्ती कार्यालय, महाराष्ट्र वाहतूक भवन,
डॉ.आनंदराव नायर मार्ग, मुंबई-४०० ००८.

जन माहिती अधिकारी तथा
कर्मचारी वर्ग अधिकारी(सम),
महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ,
मध्यवर्ती कार्यालय, महाराष्ट्र वाहतूक भवन,
डॉ.आनंदराव नायर मार्ग, मुंबई-४०० ००८. ..... उत्तरवादी

विवेचन

अर्जदार श्री.लवाटे नारायण कृष्णाजी यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १७.९.२००९ रोजी अर्ज करुन सेवानिवृत्त झालेल्या कोणत्याही शासकीय अधिका-यास मा.उच्च न्यायालयाच्या पूर्व परवानगीशिवाय सेवेत मुदतवाढ देण्यास अथवा पुर्ननियुक्ती देण्यास मा.उच्च न्यायालयाने निर्बंध घातलेले आहेत. तसेच शासनाने याबाबत परिपत्रकही प्रसारित केलेले आहे. मा.उच्च न्यायालयाच्या आदेशाची व शासनपरिपत्रकाची अंमलबजावणी राज्य परिवहन महामंडळात केली जाते किंवा कसे याबाबत संबंधित कागदपत्रांची तपासणी करण्याची अपीलकाराने मागणी केली होती. अपीलकाराने केलेल्या मागणीमुळे कोणतेही व्यापक जनहीत साध्य होणार नसल्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ८ नुसार अपीलकारास संबंधित कागदपत्र तपासण्याकरीता देण्याची आवश्यकता भासत नाही असे जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास

दिनांक १२ ऑक्टोबर,२००९ च्या पत्रान्वये कळविले. यामुळे अपीलकाराने प्रथम अपीलीय अधिका-याकडे दिनांक २३.१०.०९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित कली. अपीलकाराने सेवेत वाढ/पुर्ननियुक्ती प्रकरणाच्या तपासणीसाठी केलेली मागणी ही व्यापक जन हीताच्या संज्ञेत बसत नसल्याने ती तपासणीसाठी अपीलकारास उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता वाटत नाही असे नमूद करुन दिनांक ३०.११.०९ रोजी आदेश पारित करुन प्रथम अपील निकालात काढले. त्यामुळे व्यथित होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२२.२.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता उत्तरवादी तसेच अपीलकार हजर होते.

सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. अपीलकाराने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी/प्रथम अपीलीय अधीकारी यांनी उपलब्ध करुन दिली नाही. सदर दोन्ही अधिका-यांची कृती निश्चितच योग्य नाही. राज्यात माहितीचा अधिकार अधिनियम २००५ची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांच्या आत अपीलकारास माहिती उपलब्ध करुन द्यावी.

आदेश

अपील मान्य करण्यात येत आहे.

मुंबई
दिनांक: २२.२.२०१०

(रामानंद तिवारी)
राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई

राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

अपील क्रमांक २००९/४३३८/०२

श्री.अरुण लोभनाथ रायबोले,
वरळी बी.डी.डी.चाळ क्र.४०,
खोली क्र.२,
मुंबई-४०००१८. ..... **अपीलकार**

विरुध्द

प्रथम अपीलीय अधिकारी तथा,
गृह निर्माण विभाग,
मंत्रालय, मुंबई-३२

जन माहिती अधिकारी तथा
गृह निर्माण विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०००३२. ..... **उत्तरवादी**

विवेचन

अर्जदार श्री.अरुण रायबोले यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ३१.१२.०९ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे १८.९.२००९ रोजी अर्ज करुन खाली नमूद कलेली माहिती मीतली होती.

मा.लोक आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडे वरळी येथील बी.डी.डी.चाळ क्र.४०/४ मुंबई नं.१८ या खोलीच्या हस्तांतरणामध्ये झालेल्या गैरप्रकाराविषयी तक्रार दाखल केली होती. सदर तक्रारीची चौकशी होऊन त्याचे कार्यालयीन पत्र क्र.उलोआ/कॉम/२९४६/२००३(टे.१९) दि.२९.९.२००७ (सोबत प्रत जोडली आहे) ने मा.सचिव, महाराष्ट्र शासन, गृह निर्माण विभाग, मंत्रालय मुंबई-३२ यांना सादर केलेला आहे. सदर प्रकरणी शासनाकडून संबंधित प्रकरणावर काय कारवाई चालू आहे याबाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती.

जन माहिती अधिका-यांनी आवश्यक ती माहिती विहित कालावधीत दिली नाही. यामुळे अपीलकाराने दि.२७.१०.०९ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर प्रकरणी प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. अपीलकाराने मागणी केलेली माहिती प्रश्नार्थक स्वरुपाची आहे. उपलब्ध माहितीचे पृथ:करण वा त्यात संस्करण करुन देणेबाबत अधिनियमामध्ये तरतूद नाही. त्यामुळे अपीलकारास माहिती उपलब्ध करुन देता येत नाही असे अपीलकारास

दि.८.१०.०९च्या पत्रान्वये कळविले असल्याचे जन माहिती अधिका-यांनी प्रथम अपीलावरील सुनावणीचेवेळी प्रतीपादन केले. तसेच कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती अपीलकारास पुरविण्यात आल्याचे जन माहिती अधिका-यांनी प्रतिपादन केले. सदर प्रकरणी जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास उपलब्ध माहिती पुरविली असल्याचे नमूद करुन प्रथम अपीलीय अधिका-यांनी दि.२३.१०.०९ रोजी आदेश पारित करुन प्रथम अपील निकाली काढले. यामुळे व्यथीत होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२२.२.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता अपीलकार उपस्थित होते. जन माहिती अधिकारी उपस्थित नव्हते. सुनावणीचेवेळी अपीलकाराचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

सदर प्रकरणी अपीलकार श्री.अरुण लोभनाथ रायबोले यांचे मयत वडील कै.लोभनाथ रायबोले यांचे नांवे असलेली बी.डी.डी.चाळ क्र.४० खोली क्र.४ ही खोली त्यांचे नावे हस्तांतरीत करणेसाठी संबंधितांकडे अर्ज/पत्रव्यवहार करुनही सदर खोली त्यांच्या आई श्रीमती चंद्रभागा लोभनाथ रायबोले अथवा त्यांच्या स्वत:च्या नावे न करता प्रथम सन १९७७ मध्ये त्यांचे जवळचे अथवा लांबचे नातेवाईक नसलेल्या श्री.आनंदा मारुती वन्ने यांचे नावे हस्तांतरीत करण्यात आली व त्यांच्या मृत्यूनंतर त्यांची पत्नी श्रीमती इंदूबाई आनंदा वन्ने यांचे नावे हस्तांतरीत केली.(त्यांचेही आता दि.२९.५.२००७ रोजी निधन झाले आहे). मात्र तक्रारदार अथवा त्यांच्या आईस सदर खोलीपासून वंचित ठेवले आहे. या प्रकरणी अपीलकाराने मा.उप लोकायुक्त यांचेकडे विनंती अर्ज सादर केला असता सदर प्रकरण गृह निर्माण विभागामार्फत शासनाच्या विधी व न्याय विभागाकडे सादर करुन त्यावर त्या विभागाचे अभिप्राय प्राप्त करुन त्यानुसार नियमाच्या आधारे न्यायिक बाबी तपासण्याबाबत मा.उप लोकायुक्त यांनी आदेश दिले होते. या प्रकरणी मा. उप लोकायुक्त यांच्या आदेशाचे पालन झालेले दिसून येत नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, सदर प्रकरणी मा.उप लोकायुक्त यांच्या आदेशानुसार आवश्यक ती कार्यवाही हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांच्या आत पूर्ण करावी व याबाबत अपीलकारास अवगत करावे.

<u>आदेश</u>

अपील मान्य करण्यात येत आहे.

मुंबई
दिनांक २६.२.२०१०

(रामानंद तिवारी)
राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई

राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

अपील क्रमांक २००९/४३३९/०२

श्री.संजय गंगाराम पवार,
अंबा चाळ वाडी,
जहाँगिर मेरवानजी पथ,
परळ, मुंबई-१२. ..... अपीलकार

विरुध्द

प्रथम अपीलीय अधिकारी तथा,
गृह निर्माण विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०००३२.

जन माहिती अधिकारी तथा
गृह निर्माण विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०००३२. ..... उत्तरवादी

विवेचन

अर्जदार श्री.संजय गंगाराम पवार यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.८.१२.०९ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे १७.९.०९ रोजी अर्ज करुन जागतीक बँकेच्या अर्थ सहाय्याने महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण यांनी निवारा अथवा मुंबई नागरी विकास प्रकल्प क्र.१या नावाचा प्रकल्प हाती घेतलेला आहे. सदर प्रकरल्पाबाबत मा.मुख्यमंत्री महोदयांना सादर केलेल्या अर्जाच्या सद्यस्थितीची अ,ब,क,व ड अशा एकूण ४ मुद्यांबाबत माहिती मागीतली होती. मागणीप्रमाणे आवश्यक ती माहिती विहित कालावधीत प्राप्त झाली नसल्याने अपीलकाराने दि.२७.१०.०९ रोजी प्रथम अपीलीय अधिका-याकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. मा.मुख्यमंत्री सचिवालयाकडून आलेला संदर्भ म्हाडा कार्यालयाशी संबंधितअसल्याने म्हाडा कार्यालयाकडे पाठविण्यात आला असल्याचे तसेच कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती अपीलकारास पुरविण्यात आली असल्याचे नमूद करुन दि.१०.११.०९ रोजी आदेश पारित कले. यामुळे व्यथीत होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२२.२.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता अपिलकार उपस्थित होते. जन माहिती अधिकारी उपस्थित नव्हते. सुनावणीचेवेळी अपीलकाराचे म्हणण ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, निवारा अथवा मुंबई नागरी विकास प्रकल्पाबाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. अपीलकाराने मागणी केलेली माहिती म्हाडा कार्यालयाशी संबंधीत आहे. त्यामुळे जन माहिती अधिका-यांनी अपीलकाराचा माहितीच्या अधिकारातील अर्ज त्या कार्यालयाकडे म्हणजे म्हाडाकडे उक्त अधिनियमातील कलम ६(३) अनुसार हस्तांतरित केला. सदर प्रकरणी माहिती प्राप्त करुन घेण्याकरीता अपीलकाराने म्हाडाकडे संपर्क साधणे आवश्यक आहे. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

मुंबई
दिनांक २६.२.२०१०

(रामानंद तिवारी)
राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई

राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

अपील क्रमांक २००९/४३३१/०२

श्री.विनोद भगवंत भोसले,
पोना क्र.२५४९३/एमएचबी पोलीस ठाणे,
मुंबई. **.... अपीलकार**

विरुध्द

प्रथम अपीलीय अधिकारी तथा,
श्री.संजय शिंत्रे, पोलीस उप आयुक्त,
संरक्षण व सुरक्षा विभाग,
२८,वजुकोटक मार्ग, बेलार्ड पियर,
मुंबई.

जन माहिती अधिकारी तथा
सहाय्यक पोलीस आयुक्त(प्रशासन),
संरक्षण व सुरक्षा विभाग,
२८,वजुकोटक मार्ग, बेलार्ड पियर,
मुंबई. **.... उत्तरवादी**

विवेचन

अर्जदार श्री.विनोद भगवंत भोसले यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये अर्ज करुन एकूण १२ मुद्यांबाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिकारी यांनी अपीलकारास दि.८.७.०९ च्या पत्रान्वये कळविले की, अपीलकाराने मागणी केलेली माहिती व्यापक स्वरुपाची असल्याने संकलीत करण्यास कालावधी लागणार आहे. संबंधितांकडून माहिती प्राप्त होताच अपीलकारास माहिती कळविण्यात येइल. त्यानंतर दिनांक १६.७.२००९ च्या पत्रान्वये जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास माहिती पुरविली. सदर माहिती त्रोटक व मुद्देसूद नसल्याच्या कारणावरुन अपीलकाराने प्रथम अपीलीय अधिका-यांकडे दिनांक १२.८.२००९ रोजी प्रथम अपील सादर केले. सदर अपीलावर प्रथम अपीलीय अधिका-यांनी दि.२०.८.२००९ रोजी सुनावणी आयोजित केली. प्रथम अपीलीय अधिका-यांनी १४.९.२००९ रोजी आदेश पारित केले. यामुळे व्यथित होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दिनांक २२.२.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली सुनावणीकरीता उत्तरवादी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली. अपीलकाराच्या रजारोखीकरण, प्रवास सवलत इत्यादीबाबतची कागदोपत्री नोंद दिसून येत नाही. रजा रोखीकरणाची रक्कम/प्रवास सवलतीची रक्कम किती दिवसात अदा करणे अपेक्षित आहे, सदर रक्कम अदा करण्यास विलंब झाला असल्यास त्याची कारणे, विलंबाबाबत व्याजाची रक्कम इत्यादी माहिती मागण्यात आली होती. सदर प्रकरणी जन माहिती अधिकारी/प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अपीलकारास विहित कालावधीत माहिती पुरविली नसल्याचे दिसून येते. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसांचे आत अपीलकारास मागणीप्रमाणे आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन द्यावी.

आदेश

अपील मान्य करण्यात येत आहे.

मुंबई
दिनांक २६.२.२०१०

(रामानंद तिवारी)
राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई

राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

अपील क्रमांक २००९/३६९८/०२

श्री. प्रशांत गणपतराव कायन्दे,
अ/७, अमोघ, श्रीनगर,
वागळे इस्टेट,
ठाणे-४ ..... अपीलकार

विरुध्द

प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा,
उप सचिव(आस्थापना),
कृषि विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०००३२.

जन माहिती अधिकारी तथा
कक्ष अधिकारी/१५अे,
कृषि विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०००३२ ..... उत्तरवादी

विवेचन

अर्जदार श्री.प्रशांत कायंदे यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.४.५.०९ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे १४.११.०८ रोजी अर्ज करुन खाली नमूद केलेली माहिती मागीतली होती.

१) सन २००६,२००७,२००८ या वर्षाच्या नियतकालीन बदल्या
२) सामान्य प्रशासन विभागाच्या दि.१.४.०८ च्या पत्रानुसार आरक्षित पदावरील पदोन्नतीबाबत
३) वर्ग-१ मधील मानीव दिनांक मिळणेबाबतच्या अपीलकाराच्या दि.२५.४.०७च्या पत्रावरील कार्यवाहीबाबत
४) डॉ.प्रशांत निचळ,कृ.स.स.(वि.प्र.)व श्री.वाय.बी. साळुंखे, कृ.स.स.पुणे यांच्याबाबत केलेल्या दिनांक १०.४.२००६ रोजी केलेल्या तक्रारीवरील कार्यवाहीबाबत
५) श्री.जी.ए.देवळीकर,जिल्हा अधिक्ष्क कृषि अधिकारी यांची पदोन्नती, विभागीय चौकशी प्रकरणे व स्वेच्छा निवृत्तीबाबत
६) शासनाच्या कृषि विभागाने दिनांक ८मे,२००८ रोजी एकाच पदी दोन अधिका-यांची पदस्थापना केल्याबाबत

७) अनिवार्य प्रतिक्षा कालावधी हा कार्यकाल कालावधी समजणेबाबत
इत्यादी एकूण ३० मुद्यांवर माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी दि.२३.१२.०८च्या पत्रानुसार अपीलकारास माहिती पुरविली. उत्तरवादीने माहिती ७ दिवस विलंबाने पुरविली. माहितीपोटीअवाजवी शुल्क आकारण्यात आले. माहिती अपुरी व अर्धवट देण्यात आली. ज्यादा आकारलेले रु.३५१/- शुल्क परत करावे. अर्जातील मुद्दा क्र.२ , ११ ते ३०बाबतची माहिती मिळावी अशी अपीलकाराने दि.५.१.०९ च्या प्रथम अपीलात मागणी केली. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. कार्यालयात उपलब्ध असलेली अर्जातील मुद्दा क्र.१६.१७ व १८ ची माहिती अपीलकारास उपलब्ध करुन द्यावी. जादा आकारणी केलेली रक्कम रु.३५१/- अपीलकारास परत करण्यात यावी असे प्रथम अपीलीय अधिका-यांनी दि.६.२.०९ रोजी आदेश पारित केल. त्यानंतरही माहिती प्राप्त झाली नसल्याच्या कारणावरन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२३.२.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी, प्रथम अपीलीय अधिकारी उपस्थित होते. अपीलकार उपस्थित नव्हते. सुनावणीचेवेळी उत्तरवादीचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

उत्तरवादीने विलंबाने माहिती पुरविली, रु.३५१/- अधिक शुल्क घेतले, अपूर्ण माहिती पुरविली, डाक शुल्क, एकूण प्रती, प्रती प्रत आकारलेला दर कळविण्यात आला नाही. माहिती देण्यात आली नाही असे अपीलकारांनी द्वितीय अपीलात नमूद केले आहे. सदर प्रकरणी अपीलकारास अर्जातील मुद्दा क्र.१६,१७ व १८ बाबत माहिती पुरविण्यात आली असल्याचे उत्तरवादीने द्वितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी प्रतिपादन केले.द्वितीय अपीलावरील सुनावणीकरिता अपीलकार हजर नव्हते. माहितीपोटी उत्तरवादीने अपीलकारास रु.३५१/- इतके अधिक शुल्क आकारलेले आहे. सदर शुल्क अपीलकारास परत केलेलेनाही. यापरिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत अपीलकारास रु.३५१/- इतकी रक्कम परत करावी.

<u>आदेश</u>

अपील निकाली काढण्यात येत आहे.

मुंबई
दिनांक २६.२.२०१०

(रामानंद तिवारी)
राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई

राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

अपील क्रमांक २००९/२८८२ /०२

श्री. अरविंद भास्कर मेस्त्री,
गणनाकृत झोपडे क्र.१५,९/९,
लकडीवाला चाळ, अंतिम भूखंड क्र.२७३/२७४,
जवाहर पथ, घाटकोपर(पूर्व),
मुंबई-४०००७७. **..... अपीलकार**

विरुध्द

प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा,
सहाय्यक पालिका आयुक्त,
बृहन्मुंबई महानगरपालिका, एन वार्ड,
जवाहर पथ, घाटकोपर(पूर्व),
मुंबई-७७.

जन माहिती अधिकारी तथा
सहाय्यक अभियंता(इ.व का.),
बृहन्मुंबई महानगरपालिका, एन वार्ड,
जवाहर पथ, घाटकोपर(पूर्व),
मुंबई-७७. **..... उत्तरवादी**

विवेचन

अर्जदार श्री.अरविंद मेस्त्री यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.८.४.०९ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे १७.७.०८ रोजी अर्ज करुन अंतिम भूखंड क्र.१८५, न.भु.क्र.५८१५ आर.बी.मेहता मार्ग, घाटकोपर(पूर्व), मुंबई-७७ या जमीनीवरील खोरवाणी गल्लीतील बाजूस चालू असलेल्या अनधीकृत धार्मिक बांधकामाबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी आवश्यक ती माहिती विहित वेळेत पुरविली नाही. यामुळे अपीलकाराने दि.१८.८.०८ रोजी प्रथम अपील दाखल केले. अपीलकारास माहिती पुरवावी असे जन माहिती अधिका-याना आदेश देण्यात आले असल्याचे प्रथम अपीलीय अधिका-यांनी अपीलकारास दि.१.४.०९ रोजी कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२३.२.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, अनधीकृत धार्मिक बांधकामाबाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. कार्यालयाचे पत्र क्रमांक एसीएन २१४८/इ.व का. दिनांक १४.८.०९ अन्वये रु.४ चा शुल्क भरणा करताच अपीलकारास माहिती उपलब्ध करुन देता येईल असे अपीलकारास कळविले होते. अपीलकाराने रु.४ चा भरणा केला. उत्तरवादीने दि.२३.९.०८ व दि.२१.२.०९ रोजी डाक देय नोंद पत्राने स्टॉप वर्क नोटीसची छायाप्रत अपीलकारास पुरविली. माहितीपोटी रु.४/-शुल्क घेऊन एक पानी माहिती दिली असल्याचे अपीलकाराने आयोगासमोर प्रतिपादन कले. अपीलकारास विहित शुल्क आकारुन माहिती पुरविली असल्याचे उत्तरवादीने प्रतिपादन केले. यावरुन असे दिसून येते की, उत्तरवादीने रु.४/- शुल्क आकारुन अपीलकारास एक पानी माहिती पुरविली. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत दोन पानी माहिती पुरवावी.

<u>आदेश</u>

अपील निकाली काढण्यात येत आहे.

मुंबई
दिनांक २६.२.२०१०

(रामानंद तिवारी)
राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई

राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

अपील क्रमांक २००९/३३२९/०२

श्री. हरेश्वर जनार्दन भोईर,
१४/२३, जमनादास बिल्डिंग,
दुसरी सुतार गल्ली,डॉक यार्ड रोड,
माझगांव, मुंबई-४०० ०१०. **..... अपीलकार**

विरुध्द

प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा,
सहाय्यक आयुक्त,
बृहन्मुंबई महानगरपालिका,ई विभाग कार्यालय,
१ला मजला, भायखळा,
मुंबई-४००००८.

जन माहिती अधिकारी तथा
आरोग्य अधिकारी,
बृहन्मुंबई महानगरपालिका,ई विभाग कार्यालय,
१ला मजला, भायखळा,
मुंबई-४००००८. **..... उत्तरवादी**

विवेचन

अर्जदार श्री.हरेश्वर भोईर यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १०.७.०९ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे १७.१.०९ रोजी अर्ज करुन जयकृष्ण हॉटेल चालकाच्या अनधीकृत बांधकामाबाबत एकूण १८ मुद्यांबाबत माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.३.३.०९च्या पत्रान्वये माहिती पुरविली. जन माहिती अधिका-यांनी दिशाभूल करणारी, काही मुद्यांची अपूर्ण व चुकीची माहिती दिली असल्याचा मुद्दा उपस्थित करुन अपीलकाराने दि.२१.३.०९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी आदेश पारित केले नाहीत. यामुळे व्यथीत होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२०.२.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी, प्रथम अपीलीय अधिकारी तसेच अपिलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, जयकृष्ण हॉटेल चालकाच्या अनधिकृत बांधकामाबाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. या प्रकरणी मी असे आदेश देतो की, बृहनमुंबई महानगरपालिकेच्या आरोग्य विभाग आणि ईमारत प्रस्ताव संबंधीच्या जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसाचे आत अपीलकारास माहिती पुरवावी.

आदेश

अपील मान्य करण्यात येत आहे.

मुंबई
दिनांक २६.२.२०१०

(रामानंद तिवारी)
राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई

राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

अपील क्रमांक २००९/४३४०/०२

श्री. शेख अमजद अली नूर हुसेन(बाबुल), ... अपीलकार
प्लॉट २७/ए/४७ रोड नं.२,
शिवाजीनगर,
मुंबई-४०००४३.

विरुध्द

प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा,
पोलीस उप आयुक्त,
परिमंडळ-२, सर जे.जे. मार्ग,
नागपाडा, मुंबई.

जन माहिती अधिकारी तथा
सहाय्यक पोलीस आयुक्त,
दक्षिण प्रादेशिक विभाग, सर जे.जे.मार्ग,
नागपाडा, मुंबइ. ..... उत्तरवादी

विवेचन

अर्जदार श्री.शेख नूर हुसेन यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१८.१२.०९ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१५.६.०९ रोजी अर्ज करुन माता रमाबाई आंबेडकर मार्ग पोलीस ठाणे मुबई येथे LAC No.३३१/९५ ची सद्यस्थिती व अनुषंगिक ५ मुद्यांवर माहिती मागितली हाती. मागणीनुसार विहित कालावधीत माहिती पुरविली नसल्याने अपीलकाराने दि.४.८.०९ रोजी प्रथम अपील दाखल केले.प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. दि.२०.९.०९ रोजी प्रथम अपीलावर आदेश पारित करुन प्रथम अपील निकालात काढले. यामुळे व्यथीत होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२२.२.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपिलकार उपस्थित नव्हते.सुनावणीचे वेळी जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, माता रमाबाई आंबेडकर मार्ग पोलीस ठाणे स्थानिक गुन्हा र.क्र.३३११/९५ संबंधीत मुद्दा क्र.१ ते ५ पर्यंतची माहिती मागीतली होती. सदरची माहिती अभिलेखावर उपस्थित नसल्याबाबत सहाय्यक पोलीस आयुक्त व शासकीय माहिती अधिकारी दक्षिण प्रादेशिक विभाग, मुंबई यांनी तसे अपीलकारास कळविले असल्याचे द्वितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी प्रतिपादन केले. अपीलकाराने मा.शहर दिवाणी व सत्र न्यायालयात एस.सी.सुट क्र.९९४/९५ दाखल केले होते. अपीलकारास विदेशी नागरीक म्हणून घोषीत केल्याशिवाय तडीपार करण्यात येऊ नये असे मा.शहर दिवाणी व सत्र न्यायालयाने दि.२४.४.०३ रोजी आदेश पारित केल्याचे अपीलकाराच्या द्वितीय अपीलातील कागदपत्रावरुन दिसून येते. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

मुंबई
दिनांक २६.२.२०१०

(रामानंद तिवारी)
राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई

राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

अपील क्रमांक २००९/३५६७/०२

श्री.श्रीमंत सोपान बनसोडे, ... अपीलकार
ब्रित अशोका निवास,पंचशील नगर,
गाळेगांव,पो.मोहोने, ता.कल्याण(ठाणे).

विरुध्द

प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा,
उप सचिव(सहमुख्य निवडणूक अधिकारी),
मुख्य निवडणूक अधिकारी(म.रा.) यांचे कार्यालय,
सामान्य प्रशासन विभाग,
मंत्रालय,मुंबई-४०००३२.

जन माहिती अधिकारी तथा
अवर सचिव व उपमुख्य निवडणूक अधिकारी,
ुख्य निवडणूक अधिकारी(म.रा.) यांचे कार्यालय,
सामान्य प्रशासन विभाग,
मंत्रालय,मुंबई-४०००३२.

..... उत्तरवादी

विवेचन

अर्जदार श्री. श्रीमंत बनसोडे यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.११.५.०९ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२२.१२.०८ रोजी अर्ज करुन खाली नमूद केलेली माहिती मागीतली होती.

जानेवारी-२००५ ते डिसेंबर-०८ या कालावधीत महाराष्ट्र राज्यात वेळोवेळी झालेल्या निवडणूका/पोटनिवडणूका याकरीता मतदार याद्या, मतदान पत्रिका यावर प्रतीकागद किती खर्च झाला तसेच अनुदानांची सर्व देयके आणि संबंधित आदेश याची माहिती व छपाई बिनचूक असल्याबद्दल संबंधित मतदार नोंदणी अधिकारी अथवा तहसिलदार यांचे ना हरकत प्रमाणपत्र घेतलेअसल्यास त्याची माहिती आणि त्यांच्या प्रती.

अपीलकाराने मागणी केलेल्या माहितीचा आवाका मोठा आहे. काही बाबतीत क्षेत्रिय कार्यालयाकडून माहिती मागविलेली आहे. एकत्रित माहिती देण्यास कांही कालावधी लागण्याची शक्यता आहे. तरी मागीतलेली माहिती दि.१५.२.०९ पर्यंत पाठविण्यात येईल असे जन माहिती अधिका-यांनी दि.१६.जानेवारी,०९ च्या पत्रान्वये अपीलकारास कळविले. यामुळे समाधान झाले

नसल्याने अपीलकाराने प्रथम अपीलीय अधिका-याकडे दि.२२.१.०९ रोजी अपील दाखल केले. अपीलकाराने मागीतलेल्या माहितीची एकूण २३४७ पृष्ठे असून सदर माहिती प्राप्त करुन घेण्याकरीता प्रती पृष्ठ रु.२/- प्रमाणे रु.४६९४/- इतके शुल्क भरावे त्यानंतर माहिती पाठविण्यात येइल असे जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.५.२.०९च्या पत्रान्वये कळविले.

अपीलकाराने दि.१६.२.०९ रोजी शुल्क भरुन माहिती प्राप्त करुन घेतली. प्रथम अपीलावर दि.२१.२.०९ रोजी सुनावणी आयोजित केली. माहिती पुरविण्याचे प्रथम अपीलीय अधिकाऱ्यांनी आश्वासन दिले. मिळालेल्या माहितीने समाधान झाले नसल्याने अपीलकाराने व्यथीत होऊन राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२३.२.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपिलकार उपस्थित नव्हते. सुनावणीचे वेळी अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, जानेवारी-०५ ते डिसेंबर-०८ या कालावधीत झालेल्या निवडणूका/ पोटनिवडणूकांकरिता झालेला खर्च व इतर अनुषंगिक माहिती मागीतली होती. अपीलकारास माहितीपोटी रु.४६९४/- इतके शुल्क आकारण्यात आले. एकत्रित माहिती पुरविण्याऐवजी सुटया स्वरुपात छायांकित प्रती पुरविल्या. सदर प्रती वर्षवार,महिनावार किंवा त्या कोणत्या देयकाच्या आहेत याचा कोणताच मेळ बसत नाही. एकूण ३ मंजूरी आदेश व त्या संबंधीत देयके प्राप्त झाली आहेत. त्यामुळे माहिती मागविण्याचा उद्देश सफल झाला नाही. अनावश्यक व ज्याचा कोठेही मेळ बसत नाही अशा छायाप्रती पुरविल्या. अवास्तव शुल्क वसूल केले. कोणतीच पूर्ण माहिती पुरविली नाही असे अपीलकाराने द्वितीय अपीलात मुद्दे उपस्थित केले आहेत.

द्वितीय अपीलावरील सुनावणीकरीता तक्रारदार/गैरतक्रारदार दोघेही अनुपस्थित होते. माहितीपोटी अपीलकाराने रु.४,६९४/- इतके शुल्क भरले आहे. परतू अपीलकारास मागणीप्रमाणे माहिती पुरविल्याचे अपीलातील कागदपत्रावरुन दिसून येत नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत अपीलकारास माहिती पुरवावी.

आदेश

अपील मान्य करण्यात येत आहे.

मुंबई
दिनांक २६.२.२०१०

(रामानंद तिवारी)
राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई

राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

अपील क्रमांक २००९/४३२८/०२

श्री. सुभाष शाह, ... अपीलकार
याकुब चाळ, गोळीबार ४था रस्ता,
साताक्रुझ(पूर्व),
मुंबई-४०००५५.

विरुध्द

प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा,
उप नियंत्रक शिधावाटप यांचे कार्यालय,
ड परिमंडळ, अल्का इमारत, सहार रोड,
अंधेरी(पूर्व), मुंबई.

जन माहिती अधिकारी तथा
शिधा वाटप अधिकारी यांचे कार्यालय,
शिधा वाटप कार्यालय क्रमांक २३ ड, १ला मजला,
बिल्लवर भवन, नेहरु रोड, सांताक्रुझ(पूर्व),
मुंबई-५५. ..... उत्तरवादी

विवेचन

अर्जदार श्री. सुभाष शाह यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.८.१२.०९ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२७.२.०९ रोजी अर्ज करुन खाली नमूद केलेली माहिती मागीतली होती:-

१)सौ.छाया माणिक शाह यांना २००१ साली कोणकोणत्या पुराव्याच्या आधारावर शिधावाटप पत्रिका देण्यात आलेली आहे व त्यानी कोणकोणते पुरावे सादर केलेले आहेत त्याची साक्षांकित प्रत मिळावी.

२)शिधावाटप दुकान क्र.२३ड या दुकानातून २००१ साली किती लोकांना शिधापत्रिका देण्यात आलेली आहे.

३)कोणकोणते शिधापत्रिकेसाठी पुरावे लागतात.

४)एखाद्याची स्वत:ची खोली नसेल अशा व्यक्तीला शिधावाटप पत्रिका देता का?

शिधापत्रिकेसाठी सादर केलेले पुरावे उपलब्ध करण्याचे काम चालू असून उपलब्ध होताच साक्षांकित प्रती देण्यात येतील असे जन माहिती अधिकारी यांनी अपीलकारास दि.२०.३.२००९

च्या पत्रान्वये कळविले. अभिलेख पडताळण्यात आला असून कागदपत्र उपलब्ध झाली नाहीत असे जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.७.१०.०९च्या पत्रान्वये कळविले. यामुळे अपीलकाराने दि.२०.१०.०९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली व खालीलप्रमाणे आदेश पारित केले:-

१)सौ.छाया माणिक शहा यांना देण्यात आलेली शिधापत्रिका व त्यावरील नमूद केलेला पत्ता प्रत्यक्ष जागेवर जाऊन शिधावाटप निरिक्षकामार्फत तपासून त्याचा स्वयंस्पष्ट अहवाल दहा दिवसामध्ये परिमंडळ कार्यालयास सादर करावा.

२) तसेच वरीलबाबतची माहिती पक्षकार सुभाष शहा यांनाही देण्यात आली.

जन माहिती अधिका-यांनी प्रथम अपीलीय अधिका-याच्या सूचनानुसार खालीलप्रमाणे अपीलकारास माहिती पुरविली:-

सौ.छाया माणिक शहा यांना देण्यात आलेली शिधापत्रिका व त्यावरील नमूद केलेला पत्ता, तपासणी करण्याकरिता या कार्यालयातील शिधावाटप निरिक्षक यांनी याकुब चाळ,४था रस्ता,गोळीबार सांताक्रुझ(प.) या पत्त्यावर भेट दिली असता, सौ.छाया माणिक शहा या सहकुटुंब गेली चार वर्षे माळयावर राहत आहेत अशी माहिती मिळाली. तसेच त्यांच्या शिधापत्रिकेची छायांकित प्रत पडताळली असता, सदर शिधापत्रिका ४था रस्ता गोळीबार,सांताक्रुझ(पू.), याकूब चाळ, मुंबई-५५ या पत्त्यावर दिली असल्याचे आढळले.

यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने व्यथीत होऊन राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील केले.

सदर अपीलावर दि.२२.२.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपिलकार उपस्थित होते. सुनावणीचे वेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, सौ.छाया शाह यांना शिधापत्रिका देण्यात आली, त्यासाठी त्यांनी कोणती कागदपत्र सादर केली त्याच्या प्रती व इतर माहिती मागीतली होती. शिधा वाटप दुकान क्र.२३ ड या दुकानातून सन २००१ या वर्षी किती लोकांना शिधापत्रिका देण्यात आल्या याबाबत अपीलकारास माहिती पुरविण्यात आलेली नाही. तरी अपीलकारास मागणीप्रमाणे माहिती पुरवावी. सदर प्रकरणी चौकशी करण्याबाबत प्रथम अपीलीय अधिका-यांनी, सदर प्रकरणी चौकशी करुन अहवाल सादर करावा असे जन माहिती अधिका-यांना दि.३१.१०.०९ रोजी आदेश दिले होते. सदर चौकशीतून या प्रकरणी कोणती माहिती उघडकीस आली याबाबत अपीलकारास माहिती पुरविणे आवश्यक आहे. याबाबत केलेल्या चौकशीनुसार अपीलकारास माहिती पुरविली नाही तर श्रीम. छाया शाह यांना

आवश्यक कागदोपत्री पराव्याशिवाय शिधापत्रिका देण्यात आली असा अपीलकार अनुमान काढू शकतो. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसांच्या आत अपीलकारास मागणीप्रमाणे माहिती पुरवावी.

<u>आदेश</u>

अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

मुंबई
दिनांक २६.२.२०१०

(रामानंद तिवारी)
राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई